१९९०-
म. ग्रं. सं. ठाणे
विषय चरित्र
सं. क्र. १२९३



REFBK-0011016

# माझा देश माझा देव

—अनिरुद्ध पुनर्वसु

ग्रं. पु.
११०१५

१२८३

# माझा देश : माझे देव

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्र. क्र. ११२०१

लेखक

अनिरुद्ध पुनर्वसु

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे, स्थलांतर
अनुक्रम २७६२२ वि: चरित्र
क्रमांक ९६९ नों दि: १६/१२/६०

प्रस्तावना

एस्. एम्. जोशी

REFBK-0011016

श्रेयस प्रकाशन : मुंबई

मुद्रक :
चिं. ग. वझे
साधना प्रेस,
४३०/३१ शनिवार पेठ,
पुणें २.

चित्रकार
श्री. ओके

मूल्य २·५०

प्रकाशक :
वसंत वडके
श्रेयस प्रकाशन,
‘ सहजीवन ’ ब्लॉक नं. १९,
गोखले क्रॉस रोड नं. २,
दादर, मुंबई २८.

‘ हें सारस्वताचें गोड ।
तुम्हींचि लाविलें जी झाड ।’

गुरुवर्य डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे
यांना सादर समर्पण.

—अनिरुद्ध पुनर्वसु

# प्रस्तावना

माझे तरुण मित्र आणि सहकारी श्री. नारायण ग. आठवले यांनीं "माझा देश–माझे देव" हें पुस्तक लिहून आजच्या परिस्थितींत एक उपयुक्त आणि आवश्यक उपक्रम केला आहे. देशभक्ति, देशहित इत्यादि शब्द आपण सहज वापरतों. परंतु माझा देश म्हणजे काय ? देश या शब्दाचा आशय कोणता ? इत्यादि प्रश्न आपल्या मनांत क्वचितच उद्‌भवतात; आणि उद्‌भवले तरी त्यांचें सम्यक् उत्तर शोधून काढण्याचा प्रयत्न फारसा होत नाही. जी गोष्ट देशाची तीच देवाची. स्वतःला बुद्धिवादी म्हणून घेण्यांत ज्यांना अभिमान वाटतो, ते तर आमचा देवावर विश्वास नाहीं अशी प्रौढी मारण्यांत धन्यता मानतात. अर्थात् त्यांच्यापैकीं बहुसंख्य नैतिक-मूल्यांची आवश्यकता मान्य करतातच. कोणी म्हणतात कीं, ध्येय हाच देव. पण ध्येय म्हणजे तरी काय ? आणि त्याची उपासना करायची म्हणजे काय करायचें ? हे प्रश्न मूलग्राही आहेत आणि त्यांचीं उत्तरें शोधून काढल्या-शिवाय माणसाचें जीवन खऱ्या अर्थानें सफल होऊं शकत नाहीं.

आज आपल्या देशांत आणि महाराष्ट्रांत जी परिस्थिति आहे ती लक्षांत घेतां, या प्रश्नांचीं उत्तरें प्रत्येकानें दिलीं पाहिजेत; तरच आपला तरणोपाय आहे. स्वातंत्र्यपूर्व कालीं माझा देश म्हणजे काय, याचा फारसा विचार न करतां माझ्या देशासाठीं मीं काय केलें पाहिजे याची स्पष्ट कल्पना आम्हांला करतां येई. त्याचें सारें श्रेय, ज्या महात्म्यांचीं शब्द-चित्रें नारायण आठवले यांनीं रंगविलीं आहेत, त्या महात्म्यांना आहे.

आपला देश आतां स्वतंत्र झाला आहे आणि मराठी माणसाचे मनोरथहि पूर्ण झाले आहेत. संयुक्त महाराष्ट्राचें स्वप्न बहुतांशानें साकार झालें आहे. तरी पण एक प्रकारची न्यूनता प्रकर्षानें जाणवत आहे. आमचा देश आणि

आमचा महाराष्ट्र हे शब्द आजहि आम्ही मोठ्या अभिमानानें उच्चारतों, परंतु आपल्या देशासाठीं आणि महाराष्ट्रासाठीं आपण काय केलें पाहिजे, याची जाणीव आम्ही जनतेला आणि तरुण पिढीला करून देऊं शकत नाहीं. आम्हांलाच त्याची पुरेशी कल्पना नसावी आणि असली तरी तिचा साक्षात्कार इतरांना घडवून आणण्याचें सामर्थ्य आमच्यामध्यें नाहीं, ही गोष्ट प्रांजलपणें कबूल केली पाहिजे. लोकमान्य टिळक, महात्मा फुले, आगरकर, महात्मा गांधी, साने गुरुजी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील, यांनीं आम्हांला जीवनाचा जो साक्षात्कार घडविला, त्यामुळेंच आमच्या जीवनाला आशय प्राप्त आला. जीवन जगायचें कशाला आणि कसें तें त्यांनीं आपल्या हयातींत आम्हांला कमी अधिक प्रमाणांत शिकविलें. एक प्रकारें जीवन-धर्मच आम्हांला दिला. त्यांच्या हयातींत राष्ट्रापुढें जे प्रश्न होते ते आज बऱ्याच अंशीं सुटले आहेत. परंतु त्यानंतरचे आणि अधिक बिकट प्रश्न निर्माण झाले, आहेत. ते कसे सोडवायचे आणि त्याबाबत आपलें कर्तव्य काय आहे, याची जाणीव विद्यमान पिढीला झालेली नाहीं. स्वराज्य प्राप्त झाल्यामुळें ज्ञानार्जनाचे दरवाजे खुले झाले आहेत. संयुक्त महाराष्ट्र झाल्यामुळें श्रीमंत-गरीब, उच्च-नीच असा भेदभाव न करतां सर्वांना शिक्षणाची संधि मिळणार आहे. परंतु प्रत्येकाला शिक्षणाचा लाभ मिळाला म्हणजे समाजाचा प्रश्न सुटतोच असें नाहीं. समाजाचें दारिद्र्य नष्ट करण्यासाठीं सर्वांनीं मिळून कांहीं तरी केलें पाहिजे आणि प्रत्येकानें आपापल्या परीनें आपली समाजाबाबतचीं कर्तव्यें समजून घेऊन पूर्ण करण्यास सिद्ध झालें पाहिजे. लोकमान्यांनीं म्हटलें आहे कीं, “ ज्या ज्ञानापासून कर्तव्याची जाणीव होत नाहीं ती ज्ञानोपासनाच नव्हे. उपजीविकेचा व्यवसाय शिकण्याचा तो एक मार्ग इतकेंच त्याचें मर्यादित स्वरूप राहील ” (पा. १९). लोकमान्यांचा हा निकष विद्यमान शिक्षणाला लावला, तर त्यांतील न्यूनता सहज समजून येईल. हिंदु धर्माच्या अभिमानानें आपण नेहमीं बोलतों. धर्मरक्षणाच्या गोष्टी करतों. परंतु आगरकरांनीं त्याबाबत जो इषारा दिला तो आजहि लक्षांत ठेवला पाहिजे. धर्मरक्षणाचा ओरडा करणारांना त्यांनीं बजावलें कीं, “ ज्या दिवशीं परदुःख विमोचनासाठीं फादर डेमिअनप्रमाणें महारोगासारख्या भयंकर व्याधीस आपलीं शरीरें बळी देण्याची तुमची

तयारी होईल, त्या दिवशीं हिंदु धर्माचें संरक्षण करण्यासारखें कांहीं सामर्थ्य तुमच्या अंगांत आहे असें म्हणतां येईल." महात्मा फुले यांनीं १८७३ सालीं अस्पृश्यता निवारणाचा जाहीरनामा प्रसिद्ध करून घोषणा केली कीं, " जे अस्पृश्य बंधु परमेश्वरास मानून नीति व स्वच्छतेस अनुसरून वागतील त्यांच्याशीं मीं कुटुंबांतील माणसांप्रमाणें वागून अन्नव्यवहार करीन" (पा. ४३ ). डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीं दलितवर्गीय स्त्रियांना उपदेश केला तो मननीय आहे : " तुम्ही स्वतःला कधींहि अस्पृश्य मानूं नका. तुमचें जीवन स्वच्छ ठेवा. स्पृश्य स्त्रियांप्रमाणें स्वच्छ राहा व स्वच्छ कपडे घाला. आपण गरीब आहोंत, आपले कपडे फाटके असले तरी चालतील, पण ते धुवून स्वच्छ ठेवा. तुम्ही स्वतः शिका आणि आपल्या मुलांना शिक्षण द्या." लोकमान्य टिळक, आगरकर, महात्मा फुले आणि बाबासाहेब आंबेडकर यांनीं स्वातंत्र्य-पूर्व कालांत दिलेल्या शिकवणीची आजहि तितकीच, किंबहुना अधिक आवश्यकता आहे. या थोर विभूतींना देव म्हणायचें कीं नाहीं तें ज्यानें त्यानें ठरवावें; परंतु देवावर ज्यांचा विश्वास आहे, त्यांना एवढें तरी निश्चित म्हणतां येईल कीं, या माणसांच्या तोंडून देवच बोलत होता. श्री. नारायण आठवले यांनीं आपल्या पुस्तकाला 'माझा देश, माझे देव.' असें नांव देऊन आपल्यापुरता तो निर्णय केला आहे. कोणत्या गुणांची आपण उपासना केली पाहिजे तें त्यांनीं दाखवून दिलें आहे.

देश स्वतंत्र झाला आणि संयुक्त महाराष्ट्राचें राज्य झालें असलें तरी समाजजीवनांत न्यूनता आणि वैयक्तिक जीवनांतील रितेपणा सुज्ञ माणसाला एकसारखा जाणवत आहे. जीवनाच्या अथांग सागरावर आमची नौका तरत असली तरी आपण कोठें आहोंत, कोणत्या दिशेनें आणि कोणत्या बंदराला आपणाला पोंचावयाचें आहे, याची स्वच्छ कल्पना आम्हांला नाहीं. त्यामुळें आम्ही आपलीं कर्में करीत असलों तरी त्यांत उणेंपणा आहे. अपूर्णता आहे. हें रितेंपण जाऊन जीवनाला पूर्णता यावी म्हणून आपल्या जीवाची धडपड चालली आहे. श्री. आठवले यांनीं पुण्यश्लोक छत्रपति शिवाजीमहाराजांपासून आचार्य विनोबा भाव्यांपर्यंत त्यांना जे देवासारखे वाटतात, त्यांच्या जीवनाचें निरूपण केलें आहे. या थोर विभूति म्हणजे दीपस्तंभासारख्या आहेत. त्यांच्या जीवनापासूनच आपल्याला प्रकाश घेतला

पाहिजे. त्यांच्यापासून स्फूर्ति घेऊन आपल्या अंतःकरणांतील पणती उजळली पाहिजे. त्या प्रकाशांतच जगायचें कसें आणि कशासाठीं, त्याचा शोध घेतां येईल. आपल्या कर्तव्य-धर्माची आपल्याला ओळख होईल आणि आपल्या हातून घडणारें कर्म अधिकाधिक अर्थपूर्ण आणि मंगल होत जाईल. म्हणूनच श्री. आठवले यांनीं हें पुस्तक वाचकांना सादर करून एक स्तुत्य आणि उपयुक्त उपक्रम केला आहे, असें या प्रस्तावनेच्या आरंभीं म्हटलें. त्याबद्दल त्यांना-द्यावे तितके धन्यवाद थोडेच !


—एस्. एम्. जोशी

## माझे शब्द

'तीन कथा आणि दहा कविता' या पहिल्या पुस्तकानंतर तीन-चार वर्षांनीं हें दुसरें पुस्तक प्रसिद्ध होण्याचा योग येत आहे. या प्रसंगीं अनेक भावना मनांत दाटून आल्या आहेत. आनंदाची भावना आहे तशीच भीतीची भावनाहि मनांत आहे. फार मोठ्या जीवनांना स्पर्श करायला मिळाल्याचा हा आनंद आहे आणि या जीवनांना स्पर्श करण्यास मी पात्र आहें का नाहीं ही भीति आहे.

जनवाणी साप्ताहिकाच्या संपादकपदावर असतांना प्रसंगोपात लिहिलेल्या लेखांचें हें संकलन आहे. त्यामध्यें अपूर्णता असण्याची शक्यता आहे याची मला पूर्ण जाणीव आहे. ह्या थोर पुरुषांचीं जीवनें सागरासारखीं अथांग आहेत, तीं माझ्या ओंजळींत कशीं मावणार ? मीहि तसा प्रयत्न केलेला नाहीं. भक्तिभावानें मीं ही सुमनमाला गुंफिली आहे. जनवाणींत हे लेख ज्या सदरां-मध्यें प्रसिद्ध झाले त्या सदराचें शीर्षक 'दशदिशांत पसरो सुगंध या सुमनांचा' असेंच होतें.

यांत जें कांहीं चांगलें आहे त्याचें श्रेय या थोर पुरुषांचें आहे. त्यांच्या आशीर्वादानेंच तें निर्माण झालें आहे. जें वाईट आहे तें सारें माझें आहे. वाचकांनीं एवढें लक्षांत घ्यावें अशी नम्र विनंती आहे.



मुंबई
१६-९-६०

## चुकीची दुरुस्ती

‘अज्ञानाच्या अंधाराशीं झगडलेला ज्ञानराज भाऊ’ या लेखांत प्रारंभींच्या पुराणांतील कथेंत असुराचें नांव मयासुर पडलें आहे त्याऐवजीं **गयासुर** वाचावें.

# माझा देश : माझे देव

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| १. प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा | १ |
| २. शिवरायास आठवावें जीवित तृणवत् मानावें । | ११ |
| ३. भारताचा तेजोभास्कर लोकमान्य टिळक | १६ |
| ४. समाजानें छळलेला समाज पुरुष | २४ |
| ५. जीवन-ज्योत जाळणारा जोतिबा | ३६ |
| ६. स्मृति जाळणारा स्मृतिकार | ४९ |
| ७. त्या आत्म्याला शांति मिळालेली नाहीं | ६३ |
| ८. अज्ञानाच्या अंधाराशीं झगडलेला ज्ञानराज भाऊ | ७४ |
| ९. विधवांच्या वासुदेवा अन् महिलांच्या माधवा | ८५ |
| १०. या युगाचा ध्रुवतारा विनोबा | ९८ |

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ..........
क्रमांक ..........
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
नोंद दि: ........ 11.09.5..

# प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा!

मी महाराष्ट्रीय आहें. मी छत्रपतींच्या महाराष्ट्रांत जन्मलों. ज्ञानोबा, तुकोबांनीं पावन केलेली मराठी माझी मातृभाषा आहे. केवढें हें भाग्य आहे माझें! हा शूरांचा, वीरांचा महाराष्ट्र, हा साधूंचा-संतांचा महाराष्ट्र, हा कर्तृत्ववान् पुरुषांचा पुण्यश्लोक महाराष्ट्र, या महाराष्ट्राचा गौरव गातांना प्रत्यक्ष परमेश्वराचीहि मति कुंठित व्हावी, असा हा महाराष्ट्र! हा दगडाफुलांचा देश, हा खडकाळ काळजांत अमृताचे कुंभ वाहणारा देश!

आमच्या दुर्दम्य राष्ट्रनिष्ठेचें प्रतीक अंगोपांगीं मिरवीत उभा असलेला सह्याद्रि हा आमच्या महाराष्ट्राचा कणा. हा वांकणार नाहीं, हा खचणार नाहीं. या सह्याद्रीच्या दगडादगडांतून आमचा इतिहास गाजला. कैलासासारखें मूर्तिमंत स्वप्न या काळ्या पाषाणांतच साकार झालें. दगडांमधून इथें इतिहास घडला. तसेंच दगडांमधून इथें काव्यहि रुणझुणलें. अजिंठा, वेरूळ, कार्ली, भाज्याच्या लेण्यांमधून कोरलेलें तें जिवंत कला-सौंदर्य, ज्याकडे बघून सारें जीवन समर्पण करण्याची स्फूर्ति व्हावी, येवढा त्या शिल्पांचा प्रभाव! सह्याद्रीच्या फत्तराला इथें फुलांसारखें कोमल केलें आमच्या पूर्वजांनीं! या दगडांमध्यें प्राण ओतला आमच्या पूर्वजांनीं! या दगडांना देव बनविलें, नाचायला लावलें, डोलायला लावलें!

इथें यावें आणि सारें दुःख विसरावें. इथें यावें आणि प्रसन्न व्हावें. आम्हीं मराठी माणसें कलाहीन, रांगडीं म्हटलीं जातों; पण वेरूळच्या या कैलासाला विचारा! अरे! आम्ही दगडांमधून केवढें हें काव्य उभें केलें आहे बघा! आमच्या कलामय मनाचा हा हुंकार पाहा. ज्या कलावंतांच्या पिढ्यांनीं इथें आपली सारी कला ओतली, तें का रांगडे होते? ते का सौंदर्यहीन होते? महाराष्ट्रानें कधींच कलेचा दुस्वास केला नाहीं. आम्ही कुणाचीं मंदिरें लुटलीं नाहींत कीं, मशिदी पाडल्या नाहींत. ह्या महाराष्ट्राच्या मातीनें आम्हांला राकट बनविलें असेल, पण आमच्या काळजाचें प्रतिबिंब

या कैलासांत पाहा. हें मराठी माणसाचें कर्तृत्व, कौशल्य पाहा. ही आमची कलेची ध्वजा पाहा. ताजमहाल बनविला गेला तो संगमरवरासारख्या मृदु दगडांतून पण वज्रासारख्या काळ्या कातळांतून सलग उभें कलेलें हें स्वप्न पाहा. इथें या आणि मग म्हणा " मराठे रांगडे आहेत ! "

ताजमहाल बांधला गेला एका स्त्रीच्या प्रेमापायीं ! पण आमच्या पूर्वजांनीं हें कलेचें व्रत घेतलें होतें. आम्हांला परमेश्वरानें घडविलें. आम्ही परमेश्वराला घडवूं, अशा भावनेनें हें कार्य झालें, बापाचें अपुरें काम मुलांनीं पुढें चालविलें. ह्या कलेचा प्रवाह असा एका पिढीनें दुसरीच्यापर्यंत पोंहचवला. किती कलावंत येथें मीपणाला विसरून जगले असतील याची कल्पना करा. केवढा मोठा त्याग, कलेचें केवढें मोठें प्रेम होतें त्यांच्याजवळ ! फक्त एकच विचार त्यांच्यापुढें होता, ' हें शिल्प पुरें झालें पाहिजे. परिपूर्ण, परिशुद्ध झालें पाहिजे. यांत कुचराई होतां कामा नये. हें देवाचें काम आहे. आपलें सारें कौशल्य इथें ओतायचें. हा पाषाण आपलें काळीज खोलून उभा आहे आपली छिन्नी झेलायला. पण नुसते तुकडे पाडायचे नाहींत. घाव असा घालायचा आहे कीं, फुलपांखराच्या पंखालादेखील इजा होतां कामा नये.' अशा हळुवारपणानें इथें रांगडे मराठे वागले.

आणि महाराष्ट्रांत दगडांमधून फुलपांखरें फुललीं. कलावंताच्या कलेपुढें कातळाचें काळीजहि विरघळलें. महाराष्ट्रांत विखुरलेल्या लेण्या, मंदिरांमधून याची साक्ष अजूनहि दृष्टीस पडते. माझ्या महाराष्ट्राच्या वेरूळ, अजिंठा यांनीं उभविलेली कलेची ही ध्वजा आमची मान ताठ राहावी, एवढी धवल आहे. आम्ही सौंदर्यदृष्टि नसलेलीं राकट माणसें आहोंत, असें म्हणणाऱ्यांना गप्प करण्याएवढी शक्ति येथें दगडांतून स्फुरली आहे. हें कुणा बादशहाच्या हुकुमानें झालेलें काम नाहीं. हजारों गुलामांच्या तांड्यांनीं शिव्याशाप देत केलेली ही कलाकृति नाहीं. निष्ठेतून, भक्तींतून फुललेलें हें कलेचें नयनमनोहर रूप आहे. याला दुसरी तोड नाहीं.

या लेण्यांच्या पूर्णतेनंतर सुटकेचा निश्वास निघालेला नाहीं. समाधानाचा, तृप्तीचा आणि मानवी कर्तृत्वाच्या अचंबेचा हुंकार हें लेणें पूर्ण झाल्यानंतर प्रकटला आहे; आणि एवढें अपूर्व कार्य केल्यानंतर त्या महान् कलासेवकानें काय उद्गार काढले ? ' केवढें हें माझें कर्तृत्व, केवढा मी महान् कलाकार !'

'असें नाहीं' तो कलावंत म्हणाला. मराठी माणसाच्या मुखांतून ज्या अमोल शब्दमाला प्रकटल्या आहेत, त्यांपैकीं एक येथेंहि प्रकटली आहे. तो कलावंत म्हणाला, "केवढें हें सौंदर्य! खरोखर हें माझ्या हातून घडलेलें नाहीं. परमेश्वरानेंच हें घडविलें असलें पाहिजे." माझा महाराष्ट्र इतरांपेक्षां कांहीं वेगळा आहे असें मला वाटतें त्याचें हें देखील एक कारण आहे.

प्रत्येक चांगल्या गोष्टीमागें परमेश्वराची प्रेरणा आहे, असें येथें मानलें जातें. 'हें माझें कर्तृत्व' असा दिमाख येथें दाखवला जात नाहीं. हें परमेश्वरानें माझ्याकडून करवून घेतलें असा नम्र भावच दिसतो. परमेश्वरापुढें भेदभाव विसरण्याची शिकवण आमच्या संतांनीं आम्हांला दिली आहे. 'पंढरीचा पांडुरंग' हें आम्हां मराठ्यांचें दैवत! चंद्रभागेच्या तीरावर भक्तांसाठीं 'अठ्ठावीस युगें' उभा राहिलेला हा विठ्ठल. याच्या नांवाचा गजर करीत आम्ही मराठे ब्रह्मानंदीं टाळी लावतों. या विठोबा माऊलीच्या लेकरांमध्यें, रोहिदास होता, गोरा कुंभार होता, सेना न्हावी होता, चोखा मेळा होता, नामदेव शिंपी होता, नरहरि सोनार होता, सावता माळी होता, तुक्या वाणी होता, नाथांसारखा ब्राह्मण होता. या सर्वांनीं विठ्ठलावर सारखेंच प्रेम केलें. चंद्रभागेच्या वाळवंटांत बेहोष होऊन मराठे नाचतात, जात विसरतात, ते यांच्याच पुण्याईनें. आमच्या परमेश्वरानेंहि भक्तांसाटीं महाराचें रूप घेतलें होतें. कुणालाहि हीन मानूं नका, हें प्रत्यक्ष दाखविण्यासाठींच विठ्ठलानें हें केलें. पण आम्हांला तें कळलें नाहीं. आम्ही डोळ्यांवर कातडें ओढून जातीचीं थेरं माजवत बसलों. मग परमेश्वराला ज्योतिबांच्या तोंडून, विठ्ठल रामजींच्या तोंडून, भीमराव आंबेडकरांच्या तोंडून, साने गुरुजींच्या तोंडून पुन्हां संतांचा संदेश सांगावा लागला.

माझ्या महाराष्ट्रानें राष्ट्राला वेरूळ, अजिंठा यांसारखे कलेचे सर्वोच्च नमुने पुरविले. तसेंच राष्ट्राला इतिहासहि पुरविला. भारताच्या इतिहासांत मराठी माणसाचें नांव न घेण्याचें ठरविलें तर कांहींच शिल्लक राहणार नाहीं. मराठी माणसानें राष्ट्राला इतिहास दिला. या इतिहासाचा शोध घ्यायचा ठरविलें तर इसवी सनापूर्वीं सुमारें ५ लक्ष ते ३० लक्ष वर्षांपासून सुरुवात करावी लागेल. पृथ्वीच्या पाठीवर मानवी वंशाचे आद्य पुरुष ज्या अल्प ठिकाणीं वसति करून राहिले होते, अशा ठिकाणांमध्यें माझा महाराष्ट्रहि होता. गोदावरीच्या कांठावर या आदि मानव शाखेनें महाराष्ट्र संस्कृतीचें पहिलें

बीज पेरलें होतें, नाशिक, गंगावाडी येथील उत्खननांमध्यें याबाबतचे पुरावे मिळाले आहेत. ' महाराष्ट्र ' या नांवाचा उल्लेख बौद्धांच्या ' महावंश ' या ग्रंथांत ' महारट्ट ' असा केलेला आढळतो. वात्स्यायन, वररुचि, दंडी येवढेंच नव्हे तर ह्युएनत्संग व फहिआन या परदेशीय प्रवाशांनीहि महाराष्ट्राचें गुणवर्णन केलेलें आढळून येतें. इसवी सनापूर्वीपासूनच ही भूमि ' महाराष्ट्र ' या नांवानें ओळखली जात आहे.

महाराष्ट्रांत राज्य केलेल्या राजकुलांचा इतिहासहि असाच गौरवशाली आहे. भारताच्या इतिहासांतलें सर्वश्रेष्ठ राजकुल ' सातवाहन कुल ' महाराष्ट्रांतच नांदलें. या कुलाची राजधानी ' प्रतिष्ठान ' म्हणजे आजचें पैठण ही होती. याच कुळांतल्या राजांनीं ' शालिवाहन शक ' व ' विक्रम संवत् ' सुरू केले. सह्याद्रीच्या कुशींत फत्तरांतून फुलें फुलविणारें शिल्प याच राजकुलांच्या कारकिर्दीत खोदलें गेलें. भारताच्या इतिहासांत उत्तरेस गुप्त घराण्याचें सुवर्णयुग चालू होतें, त्याच वेळीं दक्षिणेंत महाराष्ट्रामध्यें ' वाकाटक ' कुलाचें सुवर्णयुग नांदत होतें. या कुलाचें सामर्थ्य लक्षांत घेऊन द्वितीय चंद्रगुप्तानें वाकाटक राजा प्रथम पृथ्वीषेण याला आपली मुलगी प्रभावती दिली होती. पति मेल्यानंतर ह्या प्रभावतीनेंच कर्तबगारीनें राज्यकारभार चालवून दाखविला होता. हिच्या कारकिर्दीतच महाकवि **कालिदास** महाराष्ट्रांत आले होते; आणि रामगिरीच्या टेकड्या पाहूनच त्यांना येथें महाराष्ट्रांत ' **मेघदूत** ' या अमर काव्याची स्फूर्ति झाली होती. चालुक्यांची प्रतापी राजवटहि या महाराष्ट्राच्या मातींतूनच उभारली गेली. स्वतःला ' पृथ्वीवल्लभ ' म्हणवून घेणारा प्रतापी पुरुष सत्याश्रय पुलकेशी हा येथलाच. पल्लव, हर्षवर्धन यांना खडे चारणारा दुसरा पुलकेशी हा याचाच नातू. राष्ट्रकूट कुल, गोमांतकांत गाजलेलें कदंब कुल, शिलाहार कुल आणि प्राचीन महाराष्ट्राच्या इतिहासांत गाजलेलें शेवटचें यादव कुल या महाराष्ट्राच्याच सुपुत्रांची ही कर्तृत्वशाली नामावलि आहे. या सर्वांनीं महाराष्ट्राचा इतिहास घडवला, महाराष्ट्राचें वैभव वाढविलें आणि महाराष्ट्राचा कीर्तिसुगंध सर्व देशभर पसरविला.

या इतिहासाहून अलीकडचा परंतु याहून सरस व प्रभावशाली इतिहास महाराष्ट्राच्याच मातींत घडला आहे. ज्यांनीं भारताला यावनीकरणापासून

वांचविलें, ते आमचे **छत्रपति शिवाजीमहाराज**–ते **आमचे पंचप्राण**–त्यांचा उल्लेख न केला तर सूर्याखेरीज अन्य सर्व प्रकाशकारणें वर्णिलीं असें होईल. छत्रपतींचे पवाडे गाण्यासाठीं प्रत्यक्ष सह्याद्रि जिवंत होईल. तो सांगेल: " असा पुरुष या भारताच्या मातींत आजवर झाला नव्हता व होणारहि नाहीं. माझ्या अंगाखांद्यावर मी त्यांना खेळविलें. माझ्या कडेकपारी त्यांच्या पावनस्पर्शानें कृतार्थ झाल्या. हा शिवनेरी! इथें छत्रपति जन्मले. हा रोहिडेश्वर! येथें त्यांनीं स्वराज्याची शपथ घेतली. याच रोहिडेश्वरावर स्वरक्ताची धार धरून त्यांनीं राष्ट्रांत नवें रक्त ओतलें. हा तोरणा! येथें त्यांनीं स्वराज्याचें तोरण बांधलें. हा प्रतापगड! येथें महाराजांनीं खानाचा कोथळा बाहेर काढला. हा रायगड! येथें त्यांना राज्याभिषेक झाला. " आणि मग सह्याद्रीच्या काळजांत हुंदका दाटेल, त्याच्या डोळ्यांतून अश्रू झरतील. या रायगडींच महाराष्ट्राच्या रायानें देह ठेवला. या मातींत त्यांच्या देहाची माती मिसळली. ही पावन माती! जिचें मोल आम्हां मराठ्यांना मातेयेवढें आहे. छत्रपतींना काळजांत घेऊन पहुडलेला हा रायगड हें आमचें पावनतीर्थ आहे. येथें यावें आणि आमच्या कर्तृत्वाची स्मृति होऊन नस न् नस तापावी, छाती भरून यावी, अस्मितेच्या अंगारावर बसलेली राख झटकून जावी.

या रायगडाशीं इमान राखणारे सह्याद्रीचे ते अन्य शिलेदार! हा सिंहगड! येथें आमचा तानाजी लढला. "आधीं लगीन कोंडाण्याचें, मग माझ्या रायबाचें" हा कर्तव्याचा जागता वसा देऊन हा शूर पुरुष येथें विसावला आहे.

हा पुरंदर! येथें मुरारबाजी लढला. असा लढला कीं, गर्दन तुटली पण शत्रूला चिरणारा हात थांबला नाहीं. आपल्या कार्याशीं आमरण एकरूप होण्याचा साक्षात् धडा देऊन हा रणगाजी इथें संपला.

हा विशाळगड! याच्या पायथ्याजवळच्या गजापूरच्या खिंडींत इच्छा-शक्तीनें काळाला थोपविणारा तो स्वामिभक्त बाजीप्रभु तुम्हांला दिसेल- " तोफे आधीं मरे न बाजी सांगा मृत्यूला " अशी जिद्द होती या मर्दाची! या गजापूरच्या खिंडीची पावनखिंड बनविणारा तो स्वामिभक्त! मराठ्यांच्या

राजाला वांचविण्यासाठीं छातीची ढाल केली त्यानें. मराठी माणसांच्या जिद्दीची मूर्तिमंत निशाणी म्हणजे ही पावनखिंड !

हा चाकणचा भुईकोट ! किल्ला कसला ? जेमतेम तीनशें लोक राहूं शकतील अशी छोटीशी गढीच ही. पण आमच्या फिरंगोजी नरसाळ्यानें शाहिस्तेखानाविरुद्ध तीन महिने ही लढविली.

माझ्या महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्याला असें स्वतःचें खास कर्तृत्व आहे. इथल्या मातीच्या कणाकणाला इतिहास आहे, अभिमान आहे. कण्हेरा गडाखालीं अंगावर तीसतीस जखमा असलेला रामाजी पांगरा तुम्हांला दिसेल. चौकच्या परिसरांत ढाण्या वाघ नेताजीची स्मृति तुम्हांला साथ देईल. सहा शिलेदारांसह लाख फौजेवर तुटून पडणारा अतुल पराक्रमी मराठ्यांचा सरसेनापति प्रतापराव गुजर नेसऱ्याच्या खिंडींत तुम्हांला भेटेल. स्वतःच्या प्राणाची पखरण करून स्वराज्याचें रोपटें जगविणाऱ्या या महाराष्ट्रपुत्रांनीं महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्याला जिवंत केलें आहे. त्यांचे आत्मे कोपऱ्याकोपऱ्यांतून मराठी माणसांवर लक्ष ठेवीत आहेत.

शिवरायांनीं स्वराज्याचा पाया घातला. कर्तबगार पेशव्यांनीं मराठी सत्तेची कक्षा अटकेपार नेली. भीमथडीच्या तट्टांना सिंधूचें पाणी पाजलें. मराठी समशेरीची धार पठाणांच्या पाठीवर परजून पाहिली. थोरल्या बाजीरावांनीं निजाम, बंगष, मोंगल यांना पळतां भुई थोडी केली, तर राघोबाच्या तलवारीनें अटकेपार दरारा बसविला. महाराष्ट्राच्या पुत्रांच्या या पराक्रमानें भारतीय इतिहासांत मराठ्यांना खास स्थान प्राप्त झालें आहे. मराठ्यांचें हें कर्तृत्व कुणाला पुसतां येणार नाहीं, कुणाला नाकारतां येणार नाहीं. भारताचा इतिहास हा मराठ्यांच्या कर्तृत्वाचा इतिहास आहे. इंग्रजांनीं जेव्हां 'मराठ्यांना जिंकलें' तेव्हांच भारत 'परतंत्र' झाला. 'मराठा मोडला' तेव्हां भारताचें 'स्वातंत्र्य' संपलें. 'मराठ्यांनीं तलवार खालीं ठेवली' तेव्हांच भारत 'निःशस्त्र' झाला. महाराष्ट्र हा भारताचा कणा आहे. तो ताठ असेल तेव्हां राष्ट्र ताठ ! तो मोडला तर राष्ट्र मोडलें, हें १८१८ सालीं स्पष्ट झालें.

केवळ इतिहासाच्या पुण्याईवर जगणें हें महाराष्ट्राचें ब्रीद नाहीं. महाराष्ट्राच्या हरएक पिढीनें इतिहास निर्माण केला आहे. परतंत्र झाल्यानंतर

स्वातंत्र्यासाठीं जे जे प्रयत्न झाले, त्यांत अग्रबलिदानाचा मान महाराष्ट्रानें स्वीकारला. १८५७ सालच्या स्वातंत्र्य-युद्धाची ठिणगी उडविणारा मंगल पांडे हा महाराष्ट्रीय होता. १८५७ च्या स्वातंत्र्य--युद्धांतील रणरागिणी लक्ष्मीबाई, नानासाहेब पेशवे, तात्यासाहेब टोपे हीं सारीं मराठी माणसें होतीं. एडनच्या तुरुंगांत ' हे मातृभूमि, हे मातृभूमि ' असा जप करत प्राण सोड-णारे आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांनीं महाराष्ट्राच्या माती-मातींत राष्ट्रभक्ति भरली आहे हें पटवून दिलें. वासुदेव बळवंतांनीं लाविलेली क्रांतीची ज्योत तेवती ठेवण्यासाठीं महाराष्ट्रांत अहमहमिका लागली. चाफेकर बंधु, सावरकर बंधु, अनंत कान्हेरे, राजगुरु, विष्णु गणेश पिंगळे अशी शेकडों तरुण मंडळी राष्ट्रमुक्तीसाठीं स्वप्राणाची आहुति देण्यास पुढें झाली. या वैयक्तिक प्रयत्नामागें त्यागराज महाराष्ट्राची तेजस्वी परंपरा होती.

मात्र त्यागाची परिसीमा असलेल्या या मार्गानें साराच समाज जाऊं शकत नव्हता. महाराष्ट्रांतल्या विचारवंतांनीं हें ओळखलें होतें. स्वातंत्र्य-प्राप्तीचा दुसराहि एक मार्ग होता. त्या मार्गानें सर्वांनाच जातां येणार होतें. या मार्गावर स्वतःचें जीवन जाळून सतत प्रकाश देण्यासाठीं महाराष्ट्रांतील एक पिढीच्या पिढी उभी राहिली. न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे, विष्णु-शास्त्री चिपळूणकर, गोपाळ कृष्ण गोखले, दादाभाई नवरोजी, लोकमान्य टिळक, महात्मा फुले, आगरकर असे किती तरी दीप या रस्त्यावर तेवत होते ! यांच्या प्रकाशामुळेंच स्वातंत्र्याच्या मार्गावर मराठी जनतेला मोठ्या संख्येनें चालतां आलें. महात्माजींनीं महाराष्ट्राला कार्यकर्त्यांचें मोहोळ म्हटलें. हे कार्यकर्ते एका रात्रींत तयार झाले नाहींत. महाराष्ट्रांतील आदि मानवा-पासून जो इतिहास घडला, त्या इतिहासानें इथल्या माणसांना राष्ट्रासाठीं फकिरी पत्करण्याची उपजत शिकवण दिली आहे. म्हणूनच महाराष्ट्र राष्ट्राच्या स्वातंत्र्यलढ्यांत मागें राहिला नाहीं; तो त्याचा धर्मच नव्हे !

माझ्या महाराष्ट्राचा अगदीं कालपर्यंतचा इतिहास हा असा तेजस्वी आहे आणि आज व उद्यांहि तो इतकाच तेजस्वी राहणार आहे. कारण, महाराष्ट्र विचार पारखून घेतो तसें नेतृत्वहि पारखून घेतो. आंधळेपणानें तो कुणाच्या मागें जात नाहीं. महाराष्ट्राला डोळस नेतृत्व हवें असतें. महाराष्ट्राचें नेतृत्व करणें ही कांहीं सामान्य गोष्ट नाहीं. महाराष्ट्राचें नेतृत्व करण्यासाठीं त्याग, संयम, शांति, विचार-

प्रधानता, अचूक मार्गदर्शन आणि चारित्र्य यांच्या संग्रहाची जरूरी असते. झब्बा घालून मिरविणारा नेता इथें नेता बनत नाहीं. पिसें लावून मोर बनणारे कावळे येथें झांकले जात नाहींत. महाराष्ट्राचें नेतृत्व करणें ही साधीसुधी गोष्ट आहे काय? इथल्या कर्तृत्वाला चारित्र्याचें अग्निदिव्य करूनच मान्यता मिळते. ज्ञानेश्वर, तुकाराम, रामदासांचा हा महाराष्ट्र, छत्रपति शिवाजींचा हा महाराष्ट्र, रानडे–चिपळूणकरांचा हा महाराष्ट्र, लोकमान्य टिळकांचा हा महाराष्ट्र, आगरकर, फुले यांचा हा महाराष्ट्र, भाऊराव पाटील, आंबेडकरांचा हा महाराष्ट्र. सूर्याचें तेज फिकें पडावें असे हे आमचे नेते! अग्नीची ज्वाला लाजावी अशी यांची तेजास्विता. मृत्यूला पापणी लवायला लावणारे हे सारे मार्कंडेय. यांच्या शब्दांवर मराठी मन नाचलें, झुकलें, कुर्बान झालें. यांच्यासाठीं इथें देहाचे पूल बांधले गेले. यांच्यासाठीं मुलाचें लग्न बाजूला ठेवून मृत्यूला कवटाळणारे सिंह येथें निर्माण झाले. असे हे आमचे नेते! आणि अशा नेत्यांनीं ज्यांची बुद्धि, वृत्ति, भावना घडविली, असे आम्ही मराठे! वासुदेव बळवंतापासून बंडू गोखल्यापर्यंत इथें जे जे मेले, राष्ट्रासाठीं ज्यांनीं मृत्यूला आव्हान दिलें—मृत्यूला जिंकलें त्यांनीं याच आमच्या सूर्यापासून स्फूर्ति घेतली होती. अशी स्फूर्तिप्रद परंपरा महाराष्ट्राच्या पाठीशीं आहे. म्हणूनच “ **पूर्व दिव्य ज्यांचें त्यांना रम्य भावि-काल** ” या न्यायानें महाराष्ट्राचें भविष्य नेहमींच उज्ज्वल आहे.

महाराष्ट्रानें तलवार गाजविली तशीच कलाहि सजविली. इथें हलगी-तुतारीचा मर्दानी नाद घुमला; तशीं नाचणारणींच्या पायांतलीं घुंगरेंहि मंजुळलीं. इथें पोवाड्याच्या दमदार श्रवणानें वीरांच्या छातीवरील बाराबंदीचे बंद तटतटा तुटले आणि केळीच्या गाभ्यासारख्या गोऱ्यापान गोंडस युवतींच्या गळ्यांतून गाइलेल्या लावणीनें पोलादी काळीजहि विरघळून गेलें. महाराष्ट्र हा असा आहे! तो दिलदार आहे, बेदरकार आहे. प्रेमळ आहे तसाच कर्दनकाळहि आहे. महाराष्ट्राच्या संस्कृतीची घडणच अशी आहे. निजामाला आणि बंगषाला कापणारी तलवार पकडणाऱ्या बाजीरावाच्या पंजानें मस्तानीच्या फुलपांखरी शरीराशीं खेळण्याएवढी कोमलताहि कमावली होती. महाराष्ट्राच्या पाण्याचा हाच विशेष आहे.

महाराष्ट्राची भाषा मराठी ! ती देखील अशीच ! तुकाराम महाराजांचा ' टिळा टोपी माळा देवाचें गवाळें । वागवी बोंगळें पोटासाठीं । ' असा परखड शब्द बोलायला जशी ती अडखळली नाहीं, तशीच ज्ञानेश्वरांचा " शारदेचिये चंद्रकळे । माजीं अमृतकण कोवळे । ते वेंचतीं मनें मवाळें । चकोर न लगे । " असा कोंवळा शब्द झेलतांनाहि थरथरली नाहीं. माझ्या महाराष्ट्रांत जेवढे जेवढे संत झाले, विचारवंत झाले, त्या त्या सर्वांनीं मराठीला आपल्याला हवें तसें वळविलें—खेळविलें. महाराष्ट्राची ही वाग्‌गंगा. हिच्या कांठावर ज्ञानेश्वरांनीं ज्ञानेश्वरी गाइली, तुकारामाची गाथा हिनेंच तारली, नाथांचीं भारुडें हिनेंच रंगविलीं, समर्थांचा दासबोध हिनेंच ऐकविला, चोखामेळा, रोहिदास, सावतामाळी, जनाई, नामदेव, नरहरि सोनार, सेना न्हावी हे संत याच मराठींत परमेश्वराशीं बोलले. मोरोपंत, वामन, मुक्तेश्वरांसारखे पंडित; होनाजी, रामजोशी, सगनभाऊ, प्रभाकर यांसारखे शाहीर याच मराठीनें अमर केले.

महाराष्ट्रानें आपलें नांव साऱ्याच क्षेत्रांत अग्रभागीं राखलें आहे. नाटक असो, सिनेमा असो, गायन असो, नर्तन असो, वाद्य-वादन असो, छाया-चित्रण असो, रणक्षेत्र असो वा क्रीडाक्षेत्र असो प्रत्येक ठिकाणीं महाराष्ट्राचा सुपुत्र आपल्या तेजानें तळपतांना दिसेल. महाराष्ट्र हा शूरांचा-वीरांचा आहे. कलावंतांचा—बुद्धिवंतांचा आहे. साधूंचा—संतांचा आहे. सेवानिष्ठांचा आणि निष्ठावंतांचा आहे. इथली संस्कृति घडविण्यांत सर्व जातींनीं हातभार लावला आहे. महाराष्ट्राचीं लेंकरें आपापसांत भांडलीं, एकमेकांच्या उरावर बसलीं पण अखेर मायमराठीवर संकट येतांच एकजुटीनें उभीं राहिलीं. महा-राष्ट्राच्या अस्मितेवर घाला येतांच मराठी माणूस वैयक्तिक अस्मितेला विसरला. महाराष्ट्राच्या सुपुत्रांना राष्ट्रासाठीं स्वतःच्या सुखावर, संसारावर निखारे ठेवण्याची शिकवण मिळाली आहे. हेंच महाराष्ट्राच्या मानीपणाचें प्रमुख कारण आहे.

फार पुरातनकाळीं एका महानुभावीय ग्रंथकारानें महाराष्ट्राचा महिमा गातांना लिहिलें आहे, " महंत राष्ट्र म्हणौनि महाराष्ट्र. राष्ट्र भणिजे देश, परी सुखरूप आणि इष्टकारक. महंत भणिजे थोर. महाराष्ट्र सात्विक. तेथचे जडचेतन पदार्थ तेहि सात्विक. तेथ असतां शारीरिक, मानसिक, उपद्रव

कव्हणीचि नुपजती. आणिकें देशीं शारीर, मानसि उपद्रव उपजला असे, तो महाराष्ट्रीं असतां शमे, तेथचां अन्नोदकीं शमे, तेथचां औषधीं शमे, तेथचा वारा, झडि, पाऊस तोहि सात्विक. तेणें सकळ उपद्रव शमेति. महंत भणिजे निर्दोष. महाराष्ट्र निर्दोष आणि सगुण. अनिष्ट न निफजे म्हणौनि निर्दोष. इष्ट निफजे म्हणौनि सगुण. आपण निर्दोष आणि सगुण, तैसेंचि आणिकातें निर्दोष करी आणि सगुण करी. तेथ असतां अनाचार करावें याची बुद्धि नुपजे आणि उपजली तर करूं न लहाइजे. आपण अनाचार न करी, आणिकांसि करूं नेदी, तें महाराष्ट्र. धर्म सिद्धी जाए तें महाराष्ट्र."
माझ्या महाराष्ट्राबद्दल केवढा हा विश्वास ! महाराष्ट्र त्या काळींच असा होता असें नाहीं, आजहि तो असाच आहे, पुढेंहि असाच राहणार आहे. म्हणूनच स्वतःला महाराष्ट्रीय म्हणून घेण्यांत मला अपरंपार आनंद होतो. अभिमान वाटतो. **महाराष्ट्र** हा माझा देश आहे, माझा देव आहे —

जय महाराष्ट्र

* *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ........................ वि: ......................
क्रमांक ........शिवरायास आठवावें ।
जीवित तृणवत् मानावें ॥

राष्ट्राला महानता प्राप्त होते तिथल्या पुरुषांवरून. राष्ट्रपुरुष हा राष्ट्राचा कणा असतो. तो जितका ताठ तेवढें राष्ट्र ताठ. तो जेवढा तेजस्वी तेवढें राष्ट्र तेजस्वी. तो जेवढा चारित्र्यवान् तेवढें राष्ट्र चारित्र्यवान्. अट्टल चोर, अट्टल खुनी, अट्टल बदमाष किंवा अप्रतीम सौंदर्यवती एखाद्या राष्ट्रांत निपजली तरी तिचा ठसा त्या राष्ट्रावर कायमचा उमटत नाहीं. राष्ट्राच्या कपाळावर अखंड चमकणारा तिलक राष्ट्रपुरुषच असतो. महाराष्ट्र, मस्तानीचा महाराष्ट्र म्हणून ओळखला जात नाहीं. राजपुताना पद्मिनीच्या सौंदर्याचें प्रतीक म्हणून लक्षांत राहत नाहीं. राजपुताना म्हटला कीं, राणाप्रतापचें नांव आठवतें. पंजाब म्हटला कीं, गुरुगोविंद सिंह आठवतो. महाराष्ट्र तर या भारताचा मानदंडच. भारतमातेच्या सौभाग्याचें जतन करण्यासाठीं जागता पहारा करणारा हा जागल्या! महाराष्ट्रानें राष्ट्राला जेवढीं नररत्नें दिलीं तेवढीं दुसऱ्या कुणींहि दिलीं नाहींत. हा आमचा अहंकार नाहीं. ही आमची अस्मिता आहे.

छत्रपति शिवाजीमहाराजांचा हा महाराष्ट्र अहंकारानें फुगणार नाहीं. हा मर्दांचा महाराष्ट्र आहे. हा दिलदारांचा महाराष्ट्र आहे. दिलेर रुस्तुमांचा हा देश आहे. हत्तीशीं झुंजणारे येसाजी कंक इथेंच निर्माण झाले. शिराविना लढणारे मुरारबाजी इथेंच जन्मले. विशाळगडाच्या वाटेवर छत्रपती असतांना छातीचा कोट करून गजापूरच्या खिंडींत पाय रोवून शत्रूशीं लढणारा आणि मृत्यूलाहि पांच तोफांचे आवाज कानीं येईपर्यंत थोपवून धरणारा ‘बाजीप्रभु’ इथेंच जन्मला. राष्ट्रप्रेम, स्वामिभक्ति, इमानदारी, अतुलशौर्य आणि बावनकशी चारित्र्य असलेले नरसिंह प्रसवणारी ही ‘महाराष्ट्राची कूस’ आणि अशा या महाराष्ट्राला अभिमान वाटावा असे महाराष्ट्राचे ‘राजे’ छत्रपति शिवाजी महाराज!

छत्रपति आमचे होते. या मातींत ते वाढले. या सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यांत ते खेळले. या मराठी भाषेंत ते बोलले. म्हणूनच केवळ त्यांचा आम्हांला अभिमान वाटावा इतकी छत्रपति ही क्षुद्र व्यक्ति नाहीं. या भूमींत

वाढलेले, या भाषेंत बोलणारे अनेक थोर पुरुष झाले, होतील. परंतु ध्रुवाचा तारा जसा एक, सागराला प्राशणारा अगस्ति जसा एक, परमेश्वराच्या छाताडांतहि लाथ मारणारा भृगु जसा एक, स्वतःच्या अस्थि देऊन देवांना रक्षणारा दधीचि जसा एक, एकवीस वेळां निःक्षत्रीय पृथ्वी करणारा परशुराम जसा एक तसें छत्रपतींचें स्थान. त्यांच्या आसनांत कुणाची भागीदारी नाहीं. एवढेंच काय, छत्रपतींच्या आसनाला स्पर्श करणारा झाला नाहीं, होणार नाहीं. युगानुयुगांच्या निर्मितीनंतर विधाता सारे अनुभव जमेस धरून एखादी निर्मिति करतो—त्या निर्मितीला वापरलेलें असतें अद्वितीय रसायन. अग्नीचें पावित्र्य, सौदामिनीचें तेज, चंद्राची शीतलता, वसिष्ठांची शांति, विश्वामित्राची जिद्द, ध्रुवाचा संयम, बृहस्पतीची बुद्धि आणि भगवान् शंकराचें शौर्य यांचा संगम अशा निर्मितीमध्यें होतो.

विधात्यानें अशी निर्मिति ३५० वर्षांपूर्वी केली होती. धन्य हा महाराष्ट्र आणि धन्य आम्ही मराठे. धन्य आमच्या पुण्याईची ! युगांतून एखादे वेळींच घडवली जाणारी आणि साऱ्या मानव जातीला मानदंड वाटावी अशी विधात्याची निर्मिति आमच्या वांट्यास आली. **शिवाजी** तिचें नांव ! साऱ्या मानव जातीनें 'मानवाचा परिपूर्ण नमुना' म्हणून बोट दाखवावें अशी ही **पुण्यश्लोक** व्यक्ति. ज्यांचें नांव घ्यावें आणि तळपणाऱ्या सूर्यालाहि तळहात पसरून अडवून धरावा, ज्यांचें नांव घ्यावें आणि दोन बोटांच्या चिमटींत धरून हिमालय उचलावा, ज्यांचें नांव घ्यावें आणि सागराला हात पसरून बांध घालावा अशी ही 'शिवशक्ति !' असें हें सामर्थ्य ! असा हा कर्तृत्वाचा दिमाख ! धन्य आमच्या पुण्याईची ! 'शिवाजी जिथें जन्मले तिथें आम्ही जन्मलों.' प्रत्येक मराठी मनाला ही जाणीव पाहिजे कीं, मी 'मराठा' आहें. शिवाजीमहाराजांच्या महाराष्ट्राचा मी मराठा आहें. माझ्या नसानसांत देशभक्तीचें, दिलदारीचें, अन्यायाविरुद्ध उसळणारें रक्त भरलें आहे. माझ्या वागणुकीवर शिवाजीमहाराजांची नजर आहे. शिवाजी आमचे आदर्श आहेत.

शिवाजी कसे होते ? 'निव्वळ हिंदवी स्वराज्याचे संस्थापक' म्हणून 'शिवाजी' हें नांव अमर झालेलें नाहीं. 'स्वराज्याचें संस्थापन' हें तर त्यांचें महान् कार्य आहेच. त्या एका कार्याची तुलना व्हावी अशी दुसरी गोष्ट नाहीं हें देखील सत्य आहे; पण शिवाजीमहाराजांचे पदरीं केवळ तेवढ्याच

गोष्टीची पुण्याई पडलेली नाहीं. केवळ 'रावणाला' मारणारे म्हणूनच 'रामचंद्र' देवासमान मानले जात नाहींत. रावणवध हें रामचंद्राच्या चरित्राचें एकमेव सार काढणारे जसे अल्पबुद्धीचे मानले जातील त्याचप्रमाणें स्वराज्यसंस्थापक एवढेंच शिवाजीमहाराजांचें कर्तृत्व मानणारेहि अल्पबुद्धीचे ठरतील.

हिरा ज्याप्रमाणें जितके पैलू अधिक तितका जास्त रमणीय भासतो, जितकीं फुलें जास्त तेवढा पारिजातक नयनरम्य वाटतो, जितक्या चांदण्या जास्त तितकी रात्र जास्त सुंदर दिसते त्याप्रमाणें छत्रपतींच्या जीवनाचे जितके पैलू पाहूं तेवढें तें जीवन जास्त प्रसन्न भासूं लागतें. अनेक शूरवीर होऊन गेले, अनेक धर्मवीर होऊन गेले, अनेक मातृभक्त होऊन गेले, अनेक दिलेरदोस्त होऊन गेले आणि राजे किती झाले त्यांची तर गणतीच नाहीं. पण हा एक आगळाच नमुना आहे. अग्नींत तापवून शुद्ध झालेल्या रसरशीत, पिवळ्याजर्द बावन्नकशी सुवर्णाप्रमाणें हें जीवन आहे. कणमात्र कलंक नसलेलें, गाईच्या दुधासारखें निर्मळ, सोनचाफ्यांच्या फुलासारखें प्रसन्न असलेलें हें जीवन अतुलनीय आहे. जगाच्या इतिहासांत याला तोड नाहीं. ज्यांनीं ज्यांनीं छत्रपतींच्या जीवनावर शिंतोडे उडवण्याचा प्रयत्न केला त्यांचा तो प्रयत्न सूर्यावर थुंकण्याइतका मूर्खपणाचा ठरला. टीकाकार मातींत गेले, त्यांची आणि त्यांच्या मूर्ख आक्षेपांची कुणी दखलहि घेतली नाहीं. छत्रपतींचें स्मरण मात्र दिवसेंदिवस जास्तच तीव्र होत गेलें.

आज त्यांची ३५० वी जयंती. ३५० वर्षें म्हणजे इतिहासाचीं साडेतीन पावलें. काळानें टाकलेले साडेतीन निश्वास—जरा नजर विस्फारून मागें डोकावलें तरी दिसूं शकेल असा हा तेजस्वी कालखंड. छत्रपतींच्या जन्मापासून हा अंकुर या भूमींत रुजला. राष्ट्रसंत रामदास, तुकाराम, ज्ञानेश्वर, एकनाथ या सर्वांचा हा काळ. नेताजी, बाजी, तान्हाजी मुरारबाजी यांचा हा काळ. या महाराष्ट्र भूमीचीं हीं सारीं लेकरें फक्त तीन शतकांपूर्वींच इथें नांदत होतीं. केवढी ही स्फूर्तिदायक स्मृति! सिंहगडावर जाऊन तिथल्या मातीचा एखादा थर जर बाजूला केला तर खालची माती अभिमानानें गर्जेल "तान्हाजीचें रक्त उरांत जतन करणारी मी 'मराठी माती' आहें." गजापूरच्या खिंडींत जाऊन तिथल्या कडेकपारींना विचाराल तुम्हीं काय पाहिलेंत? तर सारे कडेकपार अभिमानानें गर्जतील 'तोफे आधीं मरे न बाजी सांगा मृत्यूला'

अशा दुर्दम्य इच्छाशक्तीचा बाजीप्रभू पाहून आम्ही पावन झालों आहोत. तोरण्यावर जाऊन तिथल्या जीर्ण भिंतींना कान लावलांत तर त्या भिंतींच्या स्पंदनांतून शब्द येतील 'शिवाजी-स्वराज्य-शिवाजी-स्वराज्य' असा हा पावन महाराष्ट्र. इथले दगड, इथली माती, इथले वृक्ष, इथल्या सरिता, इथली हवा साऱ्यांच्या काळजांत एक पवित्र स्मृति भरली आहे. 'त्या तेजस्वी कालखंडाची' ज्यावेळीं सारा महाराष्ट्र जिवंत होता, ज्यावेळीं मराठ्यांचा त्यागराज भगवा-ध्वज समानतेचा, स्वातंत्र्याचा उद्घोष करत अभिमानानें फडकत होता, ज्यावेळी मराठ्यांचें तेजस्वी खड्ग या भूमीच्या मुक्ततेसाठीं म्यानाबाहेर पडलें होतें, ज्यावेळीं अन्यायाला चिरडण्यासाठीं मराठ्यांची पोलादी मूठ वळलेली होती आणि ज्यावेळीं छत्रपती इथें नेतृत्व करीत होते.

मराठ्यांचा हा राजा केवळ राजा नव्हता. मराठी माणसाचा तो काळिजा होता. मराठी भगिनींचा तो बंधु होता. दुर्बलांचा त्राता होता. शरणागताचा अभयदाता होता. जुलमी सत्तेचा कर्दनकाळ होता. असा राजा पुन्हां होणें नाहीं. ज्यानें स्वतःला प्रजेचा सेवक मानलें. जो राजा झाला नाहीं, ज्याला मराठी माणसांनीं स्वतःच्या हृदयसिंहासनावर राजा करून बसविलें असा हा एकमेव पुरुषसिंह. त्याच्या कर्तृत्वाचें मोल करायला माप नाहीं. शिवचरित्राचा कुठलाहि पैलू घ्या त्याची चमक आगळीच. असा माणूस होणें नाहीं. रामदास म्हणतात, 'शिवरायांचें कैसें बोलणें । शिवरायाचें कैसें चालणें । शिवरायाची सलगी देणें । कैसी असे ॥ महाराष्ट्रांत हा पुरुष जन्मला, केवढें हें भाग्य आमचें ! आज आम्ही त्याची ३५० वी जयंती साजरी करणार आहोंत. महापुरुषांची जयंती आणि पुण्यतिथि सालांतून एकदां येते हेंच मानायला कसेसें वाटतें. महापुरुषांची जयंती रोज असते. त्यांची पुण्यतिथीहि रोज असते–आणि तीहि एकाच वेळीं असते. जेव्हां जेव्हां आम्ही चांगलें कृत्य करतों तेव्हां तेव्हां आम्ही मनांत जाणीव ठेवली पाहिजे कीं, जे महापुरुष या भूमींत जन्मले त्यांच्या पुण्याईनेंच मीं हें चांगलें कृत्य केलें. आणि जेव्हां एखादें वाइट कृत्य आमच्या हातून घडतें तेव्हां आम्हीं मनाला बजावलें पाहिजे कीं, 'अरेरे ज्या भूमींत शिवाजी-सारखा पुण्यपुरुष जन्मला त्या भूमींत जन्मून मी असें हीन कृत्य केलें. थू : माझ्या जिनगानीवर' महापुरुषांच्या स्मृतीनें आमच्या मनाला आम्हीं असें

काबूंत ठेवलें पाहिजे. या आमच्या कृतींतच त्या महात्म्यांचें खरें स्मरण आहे. हीच त्यांची जयंती आहे. हीच त्यांची पुण्यतिथि आहे. त्यांच्या ऋणांतून कणमात्र मुक्त होण्याचा हाच एक मार्ग आहे.

ही मराठभूमि एवढी भाग्यवान् आहे कीं, इथें महापुरुषांची परंपरा आहे. देशभक्तांची परंपरा आहे. आदर्श मेरुमणींची इथें परंपरा आहे. ही परंपरा ‘मराठी माणसांनो’ आपल्यालाच जगवायची आहे. आपलें जीवन तृणवत् मानून आपलें कार्य करणारीं थोर माणसें इथें जन्मलीं. आपण त्यांचे वारस आहोंत. नुसत्या जयंत्या आणि पुण्यतिथ्या करून या पुहापुरुषांचें ऋण आपण फेडूं शकणार नाहीं. हें ऋण फेडण्यासाठीं तुमच्या कर्तृत्वाची जरुरी आहे. मराठी माणसा, तूं शिवाजीच्या परंपरेंतला दुवा आहेस हें विसरूं नकोस! त्या बावन्नकशी सोन्याबरोबर तुझी अग्निपरीक्षा व्हायची आहे हें लक्षांत ठेव! शुद्ध जीवन जग! तुझ्यांत त्या महान् सूर्याचें तेज नसेल कदाचित्, पण तूं स्वतः तेज देणाऱ्या परंपरेंतला आहेस हें विसरूं नकोस. परप्रकाशित जगण्याला काय अर्थ आहे? प्रत्येकाला स्वतःच्या कर्तृत्वाचा प्रकाश हवा. काजव्याएवढा का होईना, पण तुला स्वतःचा प्रकाश पाहिजेच. ज्या वेळीं सर्वत्र अंधार होईल तेव्हां तुझ्या लुकलुकणाऱ्या प्रकाशावर आशेची नजर लावून सारें राष्ट्र उठेल. सर्वांनाच तेजानें तळपणारा सूर्य होतां आलें नाहीं तरी स्वतःच्या प्रकाशानें चमकणारे असे चिमुकले चिमुकले असंख्य काजवे या महाराष्ट्रांत निर्माण होवोत हीच या शिवजयंतीच्या वेळीं इच्छा.

त्रिखंड उजळवून टाकणाऱ्या त्या महाराष्ट्रसूर्याला, छत्रपति शिवाजी महाजांना एका मराठी काजव्याचे प्रणाम.

* * *

# भारताचा तेजोभास्कर
# लोकमान्य टिळक

भारताच्या या प्रचंड आकारामुळें या देशांत एकात्मतेची भावना पूर्वींपासूनच जरा विस्कळित आहे. विविध जाती, विविध भाषा आणि विविध परंपरा यांमुळें येथील जनतेला एकराष्ट्रीयत्वाच्या भावनेचें महत्त्व विशेष प्रमाणांत जाणवलेलें नव्हतें. आजहि दळणवळणाचीं साधनें व इतर शास्त्रीय प्रगतीची उपलब्धता असून दक्षिण-उत्तरेचा योग्य तेवढा मिलाफ होऊं शकलेला नाहीं. तामीळी, मल्याळी, कानडी या द्रवीड संस्कृतीची ध्वजा फडकवणाऱ्या भाषा आणि मराठी, हिंदी, बंगाली, गुजराती या आर्य-संस्कृतीच्या भाषा यांच्यामध्यें अजूनहि सख्य साधलेलें नाहीं. अर्थातच दक्षिणी माणसाला उत्तरेंत अथवा उत्तरेकडील माणसाला दक्षिणेंत गेल्यावर एका राष्ट्रांतून दुसऱ्या राष्ट्रांत गेल्यासारखें वाटणें स्वाभाविक आहे. उत्तरेकडून दक्षिणेकडे इतिहासकालापासून अनेक वेळां अनेक कारणांनीं अनेक मंडळी आली. अगस्तींचा आश्रम हा दंडकारण्याच्या तोंडाशीं म्हणजे दक्षिण भारताच्या प्रवेशद्वाराशीं होता. प्रथमतः रामचंद्रांनीं वनवास पत्करल्यानंतर इकडे प्रवेश केला.नंतर ऐतिहासिक काळांतल्या उत्तरेच्या सम्राटांनीं दक्षिणेवर स्वाऱ्या केल्या. अल्लाउद्दीन खिलजी, महंमद घोरी, शहाजहान, औरंगजेब दक्षिण पादाक्रांत करण्यासाठीं इकडे धांवले,परंतु स्कंधगुप्तानंतर दोन हजार वर्षेंपर्यंत कुणीं दक्षिण भारतीयानें उत्तरेकडे मोर्चा वळवला नव्हता. इतिहासाचा हा सारा ओघ पालटून टाकण्याचें, दक्षिणेकडून उत्तरेंत मर्दुमकी गाजविण्याचें काम करणारा बाजीराव हा पहिला पुरुष. त्याचेनंतर शिंदे-होळकरांनीं, भाऊसाहेब पेशव्यांनीं मराठी माणसाच्या शौर्याची ओळख दिल्लीकरांना दाखविली. नामदेवाचे मराठी अभंग गाणारीं कांहीं माणसें पंजाबांत दिसतात. अथवा महानुभावी पंथाचे कांहीं अनुयायी उत्तरेंत ठाण मांडून बसल्याचेंहि आढळतें, पण तें अपवादात्मकच.

स्कंधगुप्त, बाजीराव, शिंदे-होळकर यांनीं जें कर्तृत्व गाजवलें तें उत्तर-भारतीयांना तितकेसें रुचलें नाहीं वा पचलेंहि नाहीं. भाऊसाहेबांनीं ज्यावेळीं

दिल्लीचें तक्त फोडलें, तेव्हांहि अनेक रजपूत नाराजच झाले. त्यावेळीं मराठी माणसाबद्दल आत्मीयता वाटेल अशा तऱ्हेची परिस्थिति नव्हती. उलट, मराठे परत कधीं जातात याचीच वाट, सारे उत्तरभारतीय बघत होते. भारताच्या स्वातंत्र्य-आंदोलनाच्या प्रारंभीच्या काळांतहि यापेक्षां वेगळी भावना नव्हती. लोकमान्य टिळक यांच्या तेजस्वी जीवनानें आणि अलौकिक राष्ट्रप्रेमानें मात्र ही परिस्थिति पालटली. म्हणूनच दक्षिण-उत्तरेचा खरा संगम करणारा महापुरुष म्हणून टिळकांचें नांव घेतलें पाहिजे.

लोकमान्यांच्या जीवनासारखें अलौकिक, अद्वितीय जीवन या राष्ट्रांत अन्य कोणाला लाभलें नाहीं. छत्रपतींनंतर महाराष्ट्रांतच नव्हे, तर सर्व भारतांत एवढ्या कर्तृत्वाचा, तोला-मोलाचा पुरुष झाला नाहीं. छत्रपतींनीं स्वराज्याची मुहूर्तमेढ रोंवली म्हणून बाजीरावाला मराठी साम्राज्य स्थापन करतां आलें. त्याप्रमाणें लोकमान्यांनीं स्वराज्याची गर्जना केली म्हणूनच महात्माजींना स्वतंत्र भारताचा राष्ट्रध्वज डौलानें फडकविण्याचें भाग्य लाभलें. अर्थात् महात्माजींसारखा असामान्य पुरुष लोकमान्यांनीं लावलेलें बीज रक्षण्यास पुढें आला हेंहि आपलें भाग्यच म्हणायला पाहिजे.

लोकमान्यांचें जीवन ही एक गाथा आहे. कुठलेंहि पान उघडा, कुठलाहि प्रसंग बघा; लोकमान्यांचें अलौकिकत्व त्यांत प्रदार्शित झालेलें दिसल्याखेरीज राहत नाहीं. खलाशाचें काम करणाऱ्याला एखादे दिवशीं समुद्रांत बुडण्याचाहि प्रसंग येतो, त्याचप्रमाणें देशसेवकाचेंहि आहे, हें ओळखून ते राजकारणांत वागले. भारताची नौका स्वातंत्र्यकिनाऱ्याला लावायची आहे, हें उद्दिष्ट त्यांच्या नजरेसमोर होतें. ब्रिटिशसत्तेचा तुफानी उन्मत्त सागर पार पाडायचा होता, पण लोकमान्यांनीं खलाशाचें काम बेडरपणें स्वीकारलें. केवळ नेतृत्व करून तत्कालीन परिस्थितींतून देशाला मार्गदर्शन करण्याचें काम लोकमान्य करते तर ते कालातीत पुरुष होऊं शकले नसते. ते तत्कालीन पुढारीच राहिले असते व काळाच्या पावलांनीं उडालेल्या धुराळ्यांत लुप्त झाले असते.

परंतु लोकमान्य अंतिम सत्याचे शोधक होते. काळाची छाति दुभंगून आरपार बघण्याचें सामर्थ्य त्यांच्याजवळ होतें, म्हणूनच ते चिरंजीव होऊं शकले. शरीरानें नष्ट झाल्यानंतरहि आजतागायत त्यांच्या जीवनापासून

आम्हांला स्फूर्ति मिळूं शकली. याबाबत बेकन या इंग्रजी ग्रंथकारानें ग्रंथांचें वर्गीकरण करतांना सांगितलेलें एक तत्त्व अचूक लागू पडतें. बेकन म्हणतो ग्रंथ तीन प्रकारचे असतात. कांहीं ग्रंथ आपण केवळ नजर टाकून, नुसते चाळून दूर करतों. त्यांचें मूल्यच क्षणजीवी असतें. कांहीं ग्रंथ विशिष्ट काळापुरते आपणांस जवळ करावेसे वाटतात. त्या काळापुरतेंच त्यांचें मूल्य असतें. मात्र कांहीं ग्रंथ अनंतकाळाचे सोबती असतात. आपल्या जीवनांत वारंवार आपण त्यांचा सल्ला घेतों. आपण हे ग्रंथ केवळ वाचत नाहीं, ते आत्मसात् करतों, त्यांवर चिंतन करतों, मनन करतों.

पुढाऱ्यांचीहि अशीच वर्गवारी करतां येते. कांहीं पुढारी क्षणजीवी असतात. एखादी चळवळ, एखादी निवडणूक येवढेंच त्यांचें क्षेत्र असतें. ते क्षणभर समाजापुढें येतात आणि दुसऱ्याक्षणींच कायमचे नाहींसे होतात. समाजमानसाला त्यांचा स्पर्शहि होत नाहीं. माशी अंगावर बसावी आणि निमिषार्धांत उडून जावी, तसें या पुढाऱ्यांचें होतें. कांहीं पुढारी कांहीं काळाचे प्रतिनिधि ठरतात. त्या काळांतील समाजावर ते आपली छाप बसवतात, प्रभुत्व गाजवतात पण त्यांचें जीवन सरतांच काळ त्यांच्या कर्तृत्वावर बोळा फिरवतो. स्लेटपाटीवर ओढलेल्या पेन्सिलीच्या रेघेसारखे हे पुढारी असतात. पाटीवरचें त्यांचें आस्तित्व बोळा फिरेपर्यंत असतें. या पुढाऱ्यांचा समाजमानसाला स्पर्श झालेला असतो. पण समाज मानसांत ते विरलेले नसतात. पण कांहीं पुढारी मृत्यूनंतरहि जगतात. त्यांचा जीवनाचा संदेश पुढच्या अनेक पिढ्यांवर संस्कार करीत असतो. अशा पुढाऱ्यांच्या विचारांनीं, त्यांच्या स्मृतींनींहि शरीर पुलकित होतें, ध्येयवादाला उत्कटता येते व कृति करण्याची स्फूर्ति मिळते. लोकमान्य हे असे पुढारी आहेत. काळाच्या खांद्यावर स्वार होण्याचा मान त्यांना लाभला आहे. म्हणूनच लोकमान्यांची स्मृति काळ नष्ट करूं शकणार नाहीं.

वर्तमानकाळाबरोबरच भविष्यकाळालाहि गवसणी घालण्याचें सामर्थ्य लोकमान्यांजवळ होतें. म्हणूनच हें चिरंजीवित्व त्यांना लाभलें. हेंच त्यांचें असामान्यत्व आहे. लोकमान्यांनीं या देशाला स्वराज्यप्राप्तीसाठीं जो कार्यक्रम दिला तो दुधारी होता. तत्कालीन पेंचप्रसंग त्यानें सुटणार होतेच, पण त्या कार्यक्रमामुळें अंतिम सत्याप्रतहि भारतीय जनता पोंहोंचणार होती. अशा त्या दुधारी कार्यक्रमामुळेंच देशांत नवचैतन्य निर्माण झालें;

लोकमान्यांच्या कार्यक्रमांत चार मुख्य गोष्टींचा समावेश होता. स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण व स्वराज्य. या चारी गोष्टींना तत्कालीन महत्त्व होतेंच पण त्यामागें जो विचार होता तो तत्कालीन नव्हता. तो सार्वकालीन, अमर, चिरंजीव होता. टिळकांनीं स्वदेशीचा पुरस्कार केला त्यावेळीं त्यांची मवाळ गटाकडून थट्टा करण्यांत आली, पण स्वदेशी ही राष्ट्राचा स्वाभिमान जागृत करण्याचें साधन आहे हें टिळकांनीं जाणलें होतें. स्वदेशीला ते वृत्ति म्हणत. कलकत्ता कॉंग्रेसमध्यें स्वदेशीचा ठराव पास करून घेतांनां 'प्रसंगीं त्याग करूनहि स्वदेशीला उत्तेजन द्यायला हवें' या वाक्यांतील 'प्रसंगीं त्याग करूनहि' या वाक्याबद्दल त्यांनीं आग्रह धरला. फिरोजशहा मेहतांनीं या वाक्यास विरोध केला, पण अखेर टिळकांचा जय झाला. यावरून टिळकांची स्वदेशीबद्दलची निष्ठा प्रकट होते. स्वदेशीसाठीं त्याग करण्यांत जो आनंद होता, जें समाधान होतें त्यांतूनच राष्ट्राचें स्वत्व जागृत होईल हें अंतिम सत्य ओळखूनच स्वदेशीचा पुरस्कार लोकमान्य करीत होते.

'बहिष्कार' या दुसऱ्या कार्यक्रमामागेंहि असेच दोन हेतु होते. वरवर हा कार्यक्रम केवळ नकारात्मक वाटला तरीहि त्यामागें त्यागाचे स्फुलिंग पेटविण्याचे सामर्थ्य होतें. टिळक बहिष्काराला 'बहिष्कार योग' मानत. या योगाची साधना कशी करावी याविषयीं लोकमान्य म्हणतात, "ज्या सुखांसाठीं आपण स्वाभिमानाची किंमत देतों त्या सुखाचा त्याग म्हणजे बहिष्कार" आणि या निष्ठेनें त्यांनीं हा योग आचरायला भारतीय जनतेला प्रवृत्त केलें. म्हणूनच कर्झननें बंगालची फाळणी केली त्यावेळीं 'बहिष्कारा'च्या मार्गानें लोकक्षोभाचें यज्ञकुंड धडधडूं लागलें. राष्ट्रामध्यें नवें सामर्थ्य निर्माण होऊं शकलें.

'राष्ट्रीय शिक्षणाबद्दल' लोकमान्यांची भूमिका अत्यंत स्पष्ट होती. ते म्हणतात, "ज्या ज्ञानापासून कर्तव्याची जाणीव होत नाहीं ती ज्ञानोपासनाच नव्हे. उपजीविकेचा व्यवसाय शिकण्याचा तो एक मार्ग इतकेंच त्याचें मर्यादित स्वरूप राहील. म्हणून आम्हाला खऱ्या ज्ञानोपासनेची ओळख राष्ट्रीय शिक्षणांतच होईल. या शिक्षणानें बुद्धीस धार येईल व मनाला प्रकाश लाभेल." असें शिक्षण देण्यासाठीं टिळकांनीं आगरकर, चिपळूणकर, नामजोशी यांच्या साहाय्यानें शिक्षणसंस्था स्थापन केल्या. येवढेंच नव्हे तर

स्वतःच्या हातांनीं त्या पवित्र ज्ञानगृहाच्या भिंती रंगविल्या, जमिनी सारवल्या, आपण स्वतः शिक्षक बनले. राष्ट्रीय शिक्षण देणारा शिक्षक हाच राष्ट्र-निर्माता असतो हें जगाला प्रत्यक्ष कृतीनें पटवून दिलें. या शिक्षणामागेंहि केवळ तात्कालीक विचार नव्हता. फार मोठी दूरदृष्टि या कार्यक्रमामागेंहि होती. "राष्ट्राला आज ज्ञानपूर्ण कर्माची आवश्यकता आहे" असें सांगून त्यांनीं सगळ्या भावी पिढीपुढें ज्ञानपूर्ण कर्माचा सिद्धांत ठेवला. तुमच्या कर्मामागें अंधत्व नसावें, ज्ञानचक्षूंनीं तें कर्म प्रखर व्हावें, पवित्र व्हावें हें सांगून त्यांनीं विद्वानांना डोळस बनवलें. अशा डोळसतेची प्रत्येक राष्ट्राला सतत जरूरी असते. ती त्यावेळी होती, आज आहे व पुढेंहि राहील.

स्वराज्याचा उद्घोष टिळकांनीं केला. पण तोहि 'स्वराज्याची तहान सुराज्यानें भागणार नाहीं' हें सांगत केला. केवळ सुराज्य आहे, पोटाला अन्न, अंगावर वस्त्र व निवारा आहे एवढ्यानें तृप्त होऊं नका हें सांगून इंग्रजी सत्तेची गौरवगीता गाणाऱ्यांना सावध केलें. पारतंत्र्यांत राष्ट्राचा नैतिक अधःपात होतो, स्वराज्यांतच राष्ट्राचें व्यक्तिमत्व विकसित होऊं शकतें, स्वराज्यांतच स्वतंत्र बुद्धीला वाव मिळतो याची जाणीव भारतीयांना करून दिली. स्वराज्य म्हणजे—परकीय राजवटीपासून सुटका—इतका मर्यादित अर्थ त्यांनीं कधींच मानला नाहीं. उलट स्वराज्य म्हणजे नवजीवनाची सुरुवात. राष्ट्र म्हणजे लोकांच्या कर्तृत्वाला आवाहन ही कल्पना प्रामुख्यानें त्यांना अभिप्रेत होती.

त्यांच्या राजकीय बैठकीला तात्त्विक अधिष्ठान होतें. ते म्हणत, "कायदा व नीति यांची फारकत झाली तर कायदा मोडून नीतीचें पालन केलें पाहिजे. व कायदा मोडण्यामुळें होणारी शिक्षा भोगण्यासाठीं तयार असलें पाहिजे." यावरून त्यांच्या मनांतली अंतिम सत्याबद्दलची ओढ समजून येईल. असा अत्यंत दूरदर्शी, प्रभावी विचार लोकमान्यांच्या राजकीय कार्यक्रमामागें होता. आणि तितकेंच प्रखर तेजःपुंज चारित्र्यहि होतें. खेरीज, विचार आणि आचार यांची सांगडहि होती. केवळ वैचारिक कुवत वा झेप मोठी असती व चारित्र्य हिणकस असतें तर लोकमान्यांचें कर्तृत्व लंगडें पडलें असतें. लोकमान्यांना आम्हीं तेजोभास्कर म्हटलें तें त्यांच्या बुद्धि-तेजानें भारावून जाऊन नाहीं, तापसी जीवनाचें अपार तेज, दुर्दम्य निष्ठा लोकमान्यां-जवळ होती म्हणून.

" राष्ट्राकरितां फकीर बनण्यास तुम्ही तयार आहां काय ? बुद्धिमान ब्राह्मणांचीं मुलें महाराष्ट्रांत रामदासांच्या शिष्यांप्रमाणें फकीर म्हणून हिंडण्याची वेळ आतां आली आहे. " असें सांगणारे लोकमान्य स्वतःहि तसें वागत होते. अंगिकृत कार्यासाठीं सारें जीवन वेंचायचें, त्यांत जरादेखील कुचराई करूं पाहायचें नाहीं अशा निष्ठेनें ते जीवनभर वागले. प्लेगच्या साथींत प्रत्यक्ष मुलाचा बळी पडला, पण अश्रू ढाळायला फुरसत नव्हती, दुःख करण्या-एवढी उसंत नव्हती. दुःखाचा जाळ गिळून टाकून पुढें जायचें होतें आणि दुःख तरी कसलें मानायचें. लोकमान्य म्हणत " अरे दुःख म्हणजे काय ? ' प्रतिकूल-संवेदनोत्पादकं दुःखम् ' असें म्हणतात, पण ज्यानें अभ्यासानें व विवेकानें मुळांत निःसंवेदित्वच जेथें प्राप्त करून घेतलें तेथें मग आतां दुःख कसलें ? दुःखाचें बीजच जर उपटलें तर तेथें अंकुर फुटणार कसा ? अपेक्षा, आसक्ति व कर्तव्यच्युति यांतच खरें दुःख आहे. " केवढी ही कर्तव्याची निष्ठा ! केवढें हें सामर्थ्य ! केवढी ही मानसिक शक्ति !

सुपारी खाण्याचें अत्यंत व्यसन होतें लोकमान्यांना. घरांत ठिकठिकाणीं कोकणांतली अस्सल रोठा सुपारी ठेवलेली असायची. इच्छा झाली कीं, अडकित्ता घेऊन तुकडे करायचे आणि तोंडांत टाकायचे असा खाक्या. तुरुंगांत सुपारी कोठून मिळणार ? तुरुंगवासानंतर एकदां एका आप्तानें विचारलें, ' बळवंतराव तुरुंगांत सुपारी नसे. तेथें कसें होत असेल. ' एका वाक्यांत लोकमान्यांनीं उत्तर दिलें, ' सुपारी म्हणजे अन्न नव्हे. ' आणि अग्रलेख लिहिण्याचें काम पुढें चालू झालें. मनावर प्रभुत्व गाजविण्याचें आणि व्यसनांना वाकविण्याचें हें सामर्थ्य सहज प्राप्त होऊं शकत नाहीं. हें सामर्थ्य होतें म्हणूनच वृद्धापकाळांत मंडालेसारख्या शेंकडों नव्हे सहस्र मैल दूर असलेल्या ठिकाणच्या तुरुंगांत ' गीता रहस्या 'सारखा श्रेष्ठ ग्रंथ ते लिहूं शकले.

लोकमान्यांना आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत एकच ध्यास होता. मृत्यूच्या मांडीवर डोकें टेकून ते पडले असतांनाहि त्यांच्या मुखांतून स्वराज्याचा उच्चार होत होता. आपलें सारें आयुष्य या एकाच कार्यासाठीं त्यांनीं वेंचिलें. त्यापायीं अनंत हालअपेष्टा सहन केल्या. आगरकरांसारखा जीवाभावाचा दोस्त, पण वैचारिक मतभेद होतांच टिळकांनीं कठोर लेखणीनें आगरकरांना घायाळ केलें. आगरकरांना समाजसुधारणेची तळमळ होती आणि टिळकांना राजकीय

स्वातंत्र्याचा ध्यास होता. या दोन थोर पुरुषांनीं एकमेकांवर झेपा न घेतां हातांत हात घालून महाराष्ट्राचें समाजकारण व राजकारण चालवलें असतें तर हा महाराष्ट्र जगाच्या पाठीवरील आदर्श संस्कृतीचें प्रतीक म्हणून मिरविला असता. परंतु दुर्दैवानें तसें होऊं शकलें नाहीं.

लोकमान्यांनीं राष्ट्रांत प्राण ओतला, ही गोष्ट निर्विवाद! महाराष्ट्राचें राजकीय जीवन त्यांनीं उन्नत केलें, भारतीयांना भयभीत दशेतून मुक्त केलें, त्यांच्यांत चैतन्य निर्माण केलें. "इंग्रज भले शहाणे असतील, ते भले पराक्रमी असतील, त्यांचा धर्म भला विशाल असेल, पण आम्ही हिंदी लोक कोठल्याहि दृष्टीनें कमी प्रतीचे नव्हत. आमच्या विद्या आम्ही शिकूं आणि आम्हीच शिकवूं, आमचा धर्म आम्हीं पढूं आणि आम्हीच सुधारूं, आमचें राज्य आम्हीच हाकूं. आम्हाला परक्यांची काडीमात्र गरज नाहीं आणि देशांत अशांतता झाली किंवा परचक्र आलें तरी पुरवलें, पण इंग्रज सरकार जितक्या लवकर आपलें चंबूगबाळें आटपून निजधामास जाईल, तितकें आम्हांस हवें आहे." असें लोकमान्य सांगत असत. स्वत्वाची जाणीव होऊन परदास्यांतून मुक्त होण्याचा सांपडेल तो मार्ग अवलंबिण्यास 'साधनानामनेकता' न्यायानें टिळक तयार होते. मात्र हे मार्ग कायदेशीर व सनदशीरच असले पाहिजेत, असा त्यांचा आग्रह असे आणि इतक्या विवेकाची पण खंबीरपणाची बैठक टिळकांच्या राजकारणाला लाभली होती. म्हणूनच इंग्रजांसारख्या बलाढ्य साम्राज्यवाद्यांबरोबर टिळकांचें राजकारण अभूतपूर्व अशी झुंज देऊं शकलें आणि जनतेच्या हृदयाचा ठाव घेऊं शकलें.

टिळक म्हणत, "राजकीयदृष्ट्या राष्ट्र तेंच कीं, ज्यांत सर्व जाती वा सर्व प्रकारचे लोक त्याच्या संकटकाळीं मतभेद विसरून हौसेनें, ईर्षेनें व उमेदीनें एकत्र जमतात." अशा प्रकारें भारताला राष्ट्र बनविण्याचें कामहि टिळकांनींच केलें. बंगालची फाळणी करण्याचें सत्तेनें ठरवितांच सारा भारत वंगभंगा-विरुद्ध खवळून उभा राहिला. ब्रिटिशांना असें होईल असें वाटलें नव्हतें. भारत हा अनेक जातीजमातींचा गोंधळ आहे. हे लोक एकत्र येऊन कांहीं करूं शकतील हें अशक्य आहे, अशा समजुतींत असलेल्या सत्तेला वंगभंगानें सारा देश खवळल्याचें पाहून धक्काच बसला. लोकमान्यांना 'भारतीय असंतोषाचे

जनक ' ही पदवी देऊन लोकमान्यांनींच सारा भारत एक केला हें ब्रिटिश साम्राज्य सत्तेनेंहि मान्य केलें.

ब्रिटिश राज्यसत्तेनें या वीराला नामोहरम करण्यासाठीं आपली साम्राज्य-शक्ति एकवटून टिळकांचें शत्रुत्व केलें. टिळकांवर ब्रिटिश सत्ता गिधाडासारखी तुटून पडली. केवळ राजकीय क्षेत्रांतच टिळकांविरुद्ध आघाडी उघडून सत्ताधारी थांबले नाहींत. टिळकांच्या धवल चारित्र्यावर डांबर फासण्याचा नीच डावहि सत्तेकडून टाकण्यांत आला, पण या साऱ्या प्रयत्नांना टिळक पुरून उरले. हा तेजोभास्कर या त्रासानें दडपला गेला नाहीं अथवा त्याचा तेजोग्रधहि होऊं शकला नाहीं. अपार विद्वत्ता व बुद्धिमत्ता यांच्या जोडीला उत्कट देशप्रेम, अतुल धैर्य आणि दुर्दम्य आशावाद यांची जोड मिळाल्या-मुळें टिळक लोकमान्य झाले. या भारताला त्यांनीं प्रकाश दाखवला. स्वातंत्र्य-सूर्याला पाताळांतून वर खेंचून काढणारा टिळक हा महाप्रतापी मानव ठरला. लोकमान्यांचा भव्य पुतळा चौपाटीवर सागरकिनारीं उभा आहे. जणुं तो सांगतो आहे साऱ्या विश्वाला, " स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि मी तो मिळविला आहे."

* * *

स्वातंत्र्याचा ध्यास होता. या दोन थोर पुरुषांनीं एकमेकांवर झेपा न घेतां हातांत हात घालून महाराष्ट्राचें समाजकारण व राजकारण चालवलें असतें तर हा महाराष्ट्र जगाच्या पाठीवरील आदर्श संस्कृतीचें प्रतीक म्हणून मिरविला असता. परंतु दुर्दैवानें तसें होऊं शकलें नाहीं.

लोकमान्यांनीं राष्ट्रांत प्राण ओतला, ही गोष्ट निर्विवाद! महाराष्ट्राचें राजकीय जीवन त्यांनीं उन्नत केलें, भारतीयांना भयभीत दशेतून मुक्त केलें, त्यांच्यांत चैतन्य निर्माण केलें. "इंग्रज भले शहाणे असतील, ते भले पराक्रमी असतील, त्यांचा धर्म भला विशाल असेल, पण आम्ही हिंदी लोक कोठल्याहि दृष्टीनें कमी प्रतीचे नव्हत. आमच्या विद्या आम्ही शिकूं आणि आम्हीच शिकवूं, आमचा धर्म आम्हीं पढूं आणि आम्हीच सुधारूं, आमचें राज्य आम्हीच हाकूं. आम्हाला परक्यांची काडीमात्र गरज नाहीं आणि देशांत अशांतता झाली किंवा परचक्र आलें तरी पुरवलें, पण इंग्रज सरकार जितक्या लवकर आपलें चंबूगवाळें आटपून निजधामास जाईल, तितकें आम्हांस हवें आहे." असें लोकमान्य सांगत असत. स्वत्वाची जाणीव होऊन परदास्यांतून मुक्त होण्याचा सांपडेल तो मार्ग अवलंबिण्यास 'साधनानामनेकता' न्यायानें टिळक तयार होते. मात्र हे मार्ग कायदेशीर व सनदशीरच असले पाहिजेत, असा त्यांचा आग्रह असे आणि इतक्या विवेकाची पण खंबीरपणाची बैठक टिळकांच्या राजकारणाला लाभली होती. म्हणूनच इंग्रजांसारख्या बलाढ्य साम्राज्यवाद्यांबरोबर टिळकांचें राजकारण अभूतपूर्व अशी झुंज देऊं शकलें आणि जनतेच्या हृदयाचा ठाव घेऊं शकलें.

टिळक म्हणत, "राजकीयदृष्ट्या राष्ट्र तेंच कीं, ज्यांत सर्व जाती वा सर्व प्रकारचे लोक त्याच्या संकटकाळीं मतभेद विसरून हौसेनें, इर्षेनें व उमेदीनें एकत्र जमतात." अशा प्रकारें भारताला राष्ट्र बनविण्याचें कामहि टिळकांनींच केलें. बंगालची फाळणी करण्याचें सत्तेनें ठरवितांच सारा भारत वंगभंगा-विरुद्ध खवळून उभा राहिला. ब्रिटिशांना असें होईल असें वाटलें नव्हतें. भारत हा अनेक जातीजमातींचा गोंधळ आहे. हे लोक एकत्र येऊन कांहीं करूं शकतील हें अशक्य आहे, अशा समजुतींत असलेल्या सत्तेला वंगभंगानें सारा देश खवळल्याचें पाहून धक्काच बसला. लोकमान्यांना 'भारतीय असंतोषाचे

जनक ' ही पदवी देऊन लोकमान्यांनींच सारा भारत एक केला हें ब्रिटिश साम्राज्य सत्तेनेंहि मान्य केलें.

ब्रिटिश राज्यसत्तेनें या वीराला नामोहरम करण्यासाठीं आपली साम्राज्य-शक्ति एकवटून टिळकांचें शत्रुत्व केलें. टिळकांवर ब्रिटिश सत्ता गिधाडासारखी तुटून पडली. केवळ राजकीय क्षेत्रांतच टिळकांविरुद्ध आघाडी उघडून सत्ताधारी थांबले नाहींत. टिळकांच्या धवल चारित्र्यावर डांबर फासण्याचा नीच डावहि सत्तेकडून टाकण्यांत आला, पण या साऱ्या प्रयत्नांना टिळक पुरून उरले. हा तेजोभास्कर या त्रासानें दडपला गेला नाहीं अथवा त्याचा तेजोवधहि होऊं शकला नाहीं. अपार विद्वत्ता व बुद्धिमत्ता यांच्या जोडीला उत्कट देशप्रेम, अतुल धैर्य आणि दुर्दम्य आशावाद यांची जोड मिळाल्या-मुळें टिळक लोकमान्य झाले. या भारताला त्यांनीं प्रकाश दाखवला. स्वातंत्र्य-सूर्याला पाताळांतून वर खेंचून काढणारा टिळक हा महाप्रतापी मानव ठरला. लोकमान्यांचा भव्य पुतळा चौपाटीवर सागरकिनारीं उभा आहे. जणुं तो सांगतो आहे साऱ्या विश्वाला, “ स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि मी तो मिळविला आहे.”

* * *

# समाजानें छळलेला समाजपुरुष

ज्याप्रमाणें समुद्राला नद्यांचा, चितेला प्रेतांचा, लोभ्याला द्रव्याचा, दुर्वासाला अन्नाचा, कर्णाला दानाचा व धर्माला शांतीचा कंटाळा कधीं येत नाहीं किंवा आला नाहीं त्याप्रमाणें खऱ्या सुधारकाला सुधारणांचा वीट येण्याचा कधींच संभव नाहीं.

परमेश्वराच्या छाताडांत लाथ मारणाऱ्या भृगूचें आम्हांला कधीं कौतुक वाटलें नाहीं. कारण 'दया, क्षमा, शांती'चा सागर म्हणून परमेश्वर ओळखला जातो. त्याच्या छाताडांत लाथ मारणाऱ्या भृगूनें तरी हें नक्कींच ओळखलें असावें म्हणूनच त्यानें बिनदिक्कतपणें आपला पाय उचलला असणार. तीन आचमनांत सागराचें प्राशन करणाऱ्या अगस्तींचेंहि आम्हांला कौतुक वाटत नाहीं. दहा बादल्या पाणी पोटांत रिचवून पुन्हां परत काढणारे डोंबारी आज दिसतात त्या अर्थी हजारों वर्षांपूर्वींच्या तेजस्वी तपस्व्यांना समुद्रप्राशन आजच्या डोंबाऱ्याइतकेंच सहज-सुलभ असलें पाहिजे. सागराला सेतु बांधणाऱ्या 'राम नामें धोंडे तरले' प्रसिद्ध रामचंद्राचेंहि कौतुक न वाटण्याइतपत आम्ही निर्ढावलों आहोंत. सागरावर सेतु बांधणें सोपें काम नाहीं हें आम्ही जाणतों, परंतु हनुमान, अंगद, सुग्रीवासारखे बलाढ्य वानरवीर पाठीशीं असल्यावर हें सहजशक्य होतें. सागराच्या लाटा थोपवण्याइतपत शक्ति त्या वीरांच्याजवळ निश्चितपणें होती.

परंतु एका फाटक्या प्रकृतीच्या दमेकऱ्यानें जनताजनार्दनाच्या छाताडांत मारलेली लाथ पाहून आम्ही थक्क झालों. दुष्ट रूढींच्या लाटा थोपवून या समाजसागरावर मात करूं पाहणाऱ्या एका एकाकी मानवाचें असामान्य कर्तृत्व पाहून आमची मान आदरानें नम्र झाली. ती व्यक्ती जें जीवन इथें जगली तें पाहून आम्हांला जीवनाचा खरा अर्थ कळला. अस्मानाला भेदून जाणारी दुर्दम्य ध्येयनिष्ठा आम्हीं पाहिली. सूर्यानें क्षणभर कोमेजून जावें असें जाज्वल्य तेज आम्हीं पाहिलें. साऱ्या जगाविरुद्ध उभा राहिलेला एक

साधासुधा पण अभिमन्यूचें धाष्टर्य असलेला मानवपुत्र आम्हीं पाहिला. मदानें अंध झालेल्या क्षत्रीयापासून पृथ्वीचें रक्षण करण्यासाठीं खांद्यावर परशु टाकून उभी राहिलेली परशुरामाची ब्रह्मशक्ति पुन्हां या महाराष्ट्राच्या भूमीत अवतरलेली आम्हीं पाहिली. ‘ आगरकर ’ होतें त्या शक्तीचें नांव. मात्र यावेळीं दुष्टांचें दमन करण्यासाठीं खांद्यावर परशु टाकून ही शक्ति अवतरली नव्हती. या वेळीं हातांत लेखणी घेऊन आपल्या पल्लेदार शैलीनें दुष्ट रूढींचा आणि सनातनी बुद्रुकांचा फडशा पाडण्याचें व्रत तिनें घेतलें होतें. ‘ आगरकर ’ ही व्यक्ति नव्हती ती शक्ति होती. मूर्तिमंत ध्येयनिष्ठाच मानवी रूपानें अवतरली होती.

दासबोधामध्यें उत्तम पुरुषाचें लक्षण सांगतांना रामदासांनीं म्हटलें आहे,

> धर्म स्थापनेचे नर । ते ईश्वराचे अवतार ।
> झाले आहेत पुढें होणार । देणें ईश्वराचें ॥

आगरकर हे असे ‘ नरवीर ’ होते. धर्मावर आघात करणाऱ्या आगरकरांना उद्देशून रामदासांचा हा चरण आम्हीं वापरल्याचें पाहून अनेकांना आश्चर्य वाटण्याचा संभव आहे. परंतु ही आश्चर्याची गोष्ट नाहीं. आगरकर हेच खरे ‘ धर्मरक्षक ’ होते. हिंदु धर्माचा खरा अर्थ त्यांनाच कळला होता. खऱ्या हिंदुधर्माचे ते पुनर्प्रस्थापक होते. म्हणूनच त्यांना ईश्वराचे अवतार मानायला व म्हणायला आम्हाला संकोच वाटत नाहीं. सनातनी बुद्रुकांच्या घाबळीआड दडलेल्या हिंदुधर्माला ब्रकोटी धरून त्यांनीं हिसकलें परंतु त्या हिसकण्यामागें हिंदुधर्मानें, हिंदुसमाजानें जरा मोकळ्या वातावरणांत यावें, शुद्ध हवा प्राशावी, अंगाला चिकटलेल्या गोमाशा झटकाव्या हाच उद्देश होता. आगरकरांना जो ‘ धर्म ’ हवा होता त्या धर्माचें अधिष्ठान ‘ बुद्धिवाद ’ हें होतें. म्हणूनच हिंदुधर्माला बुद्धिवादाचा निकष लावून जें जें शिल्लक राहील तें सहर्ष स्वीकारण्याची तयारी त्यांनीं दाखवली होती, परंतु बुद्धिवादाचा निकष धर्माला लावणें ही कल्पनाच त्यावेळच्या समाजाला भयंकर होती ( अजूनहि आहे म्हणा ). कारण, धर्माचें सारेंच अधिष्ठान श्रद्धा व भावनेवर. आगरकरांनीं या वृत्तीचें फार मार्मिक वर्णन केलें आहे.

‘ एखाद्या दिवाळखोर कर्जबाजाऱ्यास ज्याप्रमाणें आपल्या प्राप्तीचा आंकडा आपल्या खर्चाच्या आंकड्यांशीं ताडून पाहाण्याचें धैर्य होत नाहीं, त्याप्रमाणें श्रद्धाळू धार्मिकास आपल्या धर्मसमजुती व त्यावर अवलंबणारे आचार यांस बुद्धिवादाच्या प्रखर मुशींत घालण्याची छाती होत नाहीं. या तीव्र धगीचा खरपूस ताव देण्यास तयार होण्यांत त्यांची त्यास धडगत दिसत नाहीं ! त्यांना अशी भीति वाटते कीं, ते हिणकस ठरल्यास, पुढें काय करावें ? ’

आगरकर धर्मद्वेष्टे होते, धर्माला बुडवण्यासाठींच जन्मले होते अशा-तऱ्हेची ओरड त्यावेळीं झाली; परंतु आगरकरांनीं धर्म बुडवण्याचें ध्येय कधींच पत्करलें नव्हतें. धर्माचे नांवाखालीं दलितांचा, स्त्रियांचा व सुशिक्षित पांढर-पेशांचादेखील जो छळ होत होता, धर्माचे नांवाखालीं जीं कुकर्में चाललीं होतीं त्यावर आगरकरांचा सारा रोष होता. हिंदुधर्मांत जें चांगलें आहे तें चांगलें आहे असें सांगण्याइतपत दिलदारी, त्यांच्याजवळ निश्चितपणें होती. **‘ अशी वेळ कधीं आली नव्हती ’** या नांवाचे लेखांत ते म्हणतात,

‘ हिंदुधर्म विचारांत आणि सामाजिक आचारांत जेवढें कांहीं खरोखर निर्दोष व हितावह आहे त्याला कशाचीहि भीति नाहीं. मनु आणि पाराशर यांच्या आधाराशिवाय तें अढळ राहणार आहे. पण जें कांहीं सदोष व अहितकारक आहे, निदान सध्याचे स्थितींत त्याच्या अपकारित्वाबद्दल संशय नाहीं, तें सारें या ज्ञानकुडांत जळून खाक होणार. एखाद्या दुसऱ्या मनूची आणि पाराशराची काय कथा ? आमच्या अर्वाचीन विचारास ज्या धार्मिक व सामाजिक गोष्टी अप्रशस्त वाटूं लागल्या आहेत, त्यांस शेंकडों मनूंचे व सहस्रावधि पाराशरांचे आधार दाखविलेत व त्यांचा प्रसार न व्हावा म्हणून त्यांच्या मार्गांत कोट्यवधि लोकांचा मूर्खपणा, वृथा धर्माभिमान आणि उठावणीचे ओरडे यांचे अडथळे आणून घातले तरी ज्याप्रमाणें पर्वताच्या माथ्यावरील सरोवराच्या भिंती फोडून तुफान वेगानें कड्यावरून पडूं लागलेल्या वारिवाहाची गति कुंठित करण्यास कोणीहि धजत नाहीं, त्याप्रमाणें आमच्या मूर्खपणाच्या सामाजिक व धार्मिक समजुतीस लागलेला वणवा कोट्यवधि अजागळ कीटकांच्या क्षुद्र पक्षवातानें किंवा मोठ्या किड्यांच्या शुष्क श्वासवातानें विझण्याचा मुळींच संभव नाहीं. उलट हेच त्यांत होरपळले जाण्याचा संभव आहे. ’

आगरकरांनीं हें सारें लिहिलें तें आत्यंतिक तळमळीनें लिहिलें. ‘ जुनें तें सारें वाईटच ’ असें मानण्याइतपत कोत्या बुद्धीचे आगरकर नव्हते. सुधारणा करण्याचा विचार मनांत येण्यास आपल्या रीतीहून भिन्न रीति, आपल्या विचारांहून भिन्न विचार, कल्पनांहून भिन्न कल्पना, आपल्या शास्त्रांहून भिन्न शास्त्रें, आपल्या धर्माहून भिन्न धर्म, आपल्या भाषेहून भिन्न भाषा, पेहरावाहून भिन्न पेहराव वगैरे अनेक गोष्टी अवलोकनांत येऊन त्यांपैकीं बऱ्या कोणत्या व वाईट कोणत्या याचा निवाडा करतां येण्यासारखें बुद्धिसामर्थ्य असावें लागतें असें आगरकर म्हणत. आगरकरां-जवळ तें सामर्थ्य निश्चितपणे होतें. म्हणूनच ते हिंदु समाजांतल्या भोंगळपणावर, दुष्ट रूढींवर आणि अंधश्रद्धेवर इतक्या निश्चयानें, इतक्या शास्त्रशुद्धपणें, इतक्या तीव्रतेनें हल्ला करूं शकले. समाजावर-धर्मावर केवळ चौफेर हल्ले चढवणें एवढेंच आगरकरांचें उद्दिष्ट नव्हतें. समाजाविरुद्ध त्यांनीं जें युद्ध पुकारलें होतें त्याचे परिणाम काय होतील याची त्यांना पूर्ण जाणीव होती. सुधारणांस अनुकूल असूनहि लोकमताच्या बागुलबुव्यानें दचक-णारे सुशिक्षित भेकड त्यांनीं पाहिले होते. म्हणूनच समाजाविरुद्ध राहून, समाजाचा रोष पत्करण्याची तयारी ठेवून, समाजाला पुढें खेचण्यासाठीं आगरकरांनीं हें व्रत घेतलें होतें. केवळ स्वतःला चांगलें वाईट समजलें, स्वतःची उन्नती झाली म्हणजे सगळें झालें अशा मताचे ते नव्हते. “ जो समाज पुढें जात नसतो तो मागें जात असतो, त्याची उन्नती होत नसते, ” हें जाणल्यामुळेंच समाजाला धक्के देऊन पुढें ढकलण्याचें कार्य आगरकरांनीं सुरू केलें. ‘ सारी होडी पुढें गेल्याशिवाय तींतील कोणत्याहि उतारूस पुढें जातां येत नाहीं.’ म्हणूनच साऱ्या समाजाला फटके मारून, कोरडे ओढून प्रग-तीच्या मार्गावर आणण्याचें आगरकरांनीं ठरविलें. हें करणें सोपें काम नव्हतें. सारा समाज विरुद्ध जाण्याची भीति होती आणि तसें झालेंहि. केवळ समा-जाचा विरोध असता तरी आगरकरांनीं पर्वा केली नसती, पण लोकमान्य टिळकांसारख्यांनीं त्या समाजाचें नेतृत्व करून ‘ गंजीवरला कुत्रा ’, ‘ स्वार्थ-साधु ’ म्हणून आगरकरांना हिणवण्यापर्यंत मजल गांठली. जिवंतपणीं आगरकरांची प्रेतयात्राहि निघाली. परंतु हा धैर्याचा मेरू ढळला नाहीं.

आगरकरांच्या निष्ठेची तीव्रता, त्यांच्या दुर्दम्य इच्छाशक्तीचा कस, त्यांच्या विचारांचें सामर्थ्य, त्यांच्या लेखणींचें पाणी या साऱ्यांची कसोटी लोकमान्य जेव्हां त्यांना विरोध करायला उभे राहिले तेव्हां लागली. भारतीय असंतोषाचा जनक, ब्रिटिश साम्राज्यशाहीला आपल्या गर्जनेनें कांपरें भरवणारा हा नरसिंह, केवळ एवढीच टिळकांची आगरकरांना ओळख नव्हती, एक जिवाभावाचा दोस्त म्हणूनहि ते त्यांना ओळखत होते. आणि तरीहि आगरकर डगमगले नाहींत. प्रतिस्पर्धी जितका बलवान् तितका खऱ्या वीराला जास्त हुरूप येतो. आगरकरांनीं आपल्या तर्कशुद्ध विचार-सरणीनें टिळकांसुद्धां साऱ्या समाजाचा विरोध पचवून टाकला. आपल्या तेजस्वी परशूनें परशुरामानें सहस्रार्जुनाचे सहस्रबाहु जसे खाडखाड तोडून टाकले त्याप्रमाणें समाजपाठिंब्याचे सहस्रबाहु लावून टिळक समोर उभे राहतांच आगरकरांची तेजस्वी लेखणी जास्तच प्रखर झाली आणि तिनें टिळकांची सहस्रार्जुनासारखीच दुर्दशा करून टाकली. आगरकरांचें मोठेपण इथेंच आहे. ‘ इंद्राय तक्षकाय स्वाहा ’ म्हणून त्यांनीं टिळकांच्या आड लपूं पाहणाऱ्या दुष्ट रूढींच्या सर्पांना यज्ञवेदीकडे खेंचलें. ‘ निर्भयता ’ हें आगर-करांच्या जीवनांतलें फार महत्त्वाचें तत्त्व होतें. राघोबाला देहान्त प्रायश्चित्त सांगणाऱ्या रामशास्त्र्यांइतकीच निर्भयता आणि सत्यनिष्ठा त्यांच्याजवळ होती, म्हणूनच टिळकांसारख्यांचा विरोध त्यांना सहन करतां आला.

महाराष्ट्राच्या मातीमध्यें जे सद्‌गुण आहेत त्या सर्वांचा संगम आगरकरां-मध्यें झाला होता. दमदारपणा, झुंजारपणा, ध्येयाबद्दलची आत्यंतिक निष्ठा, आणि त्यागमय जीवनाची आसक्ति आगरकरांमध्यें जन्मापासूनच होती. आगरकरांच्या बालपणींच्या गोष्टी साऱ्यांनाच ठाऊक आहेत. ज्या तऱ्हेचें जीवन आगरकर त्या वेळीं जगले तशा तऱ्हेचें जीवन जगण्याची पाळी अजूनहि अनेकांवर येते हें केवढें दुर्दैव आहे. आमच्या घराजवळून नदी वाहते. एखादे वेळीं रात्रीच्या शांत वातावरणाला कापत जाणारा धुणें आपटल्याचा आवाज माझे कानांवर येतो आणि खाडकन् माझी झोप माझ्या तोंडांत मारते. कासावीस होऊन मी दिवा लावतों. खोलींतल्या आगरकरांच्या फोटोकडे माझी नजर जाते. खिडकी उघडून अंधारांत डोळे फाडून मी डोकावतों, पण कांहीं दिसत नाहीं. मात्र मनाच्या आंत खोल खोल गाभाऱ्यांत

एक चित्र उमटलेलें असतें. अशाच थंड काळोख्या रात्रीं सारें विश्व झोपलें असतांना एक फाटक्या अंगाचा तरुण आपला एकुलता एक सदरा हळुवार हातानें धुवत आहे. सदरा वाळला पाहिजे म्हणून हें या वेळीं करायलाच पाहिजे अशा भावनेनें त्याचें काम चाललें आहे. आगरकरांचें हें चित्र कल्पिलें कीं, आतड्याला पीळ पडतो. केवढा मोठा हा पुरुष. किती हाल सोसले त्यानें. ज्ञानाच्या लालसेपायीं जीवनाची ससेहोलपट करून घेतली. पोटांत दोन घांस अन्न गेलें नाहीं तरी चालेल, पण डोक्यांत दोन नवे विचार कसे जातील याचीच त्यांना काळजी असायची. पोटभर अन्न नाहीं, अंगभर वस्त्र नाहीं, फी भरायला पैसे नाहींत, जवळ भरपूर काय आहे तर दारिद्र्य, अशक्तता. पण या साऱ्यांवर मात करणारी आणखीहि एक गोष्ट आगरकरांजवळ होती, ती म्हणजे दुर्दम्य इच्छाशक्ति. तिच्या जोरावर ते जगले. तिच्या जोरावरच त्यांनीं जनतेच्या प्रचंड ज्वालामुखीवर आपलें आसन मांडलें. समरांगणावर जातांना रजपूत वीर ज्याप्रमाणें सर्वस्वावर पाणी सोडून, केशरी वस्त्र परिधान करून निघतो त्याप्रमाणें सर्व सुखांवर पाणी सोडून आगरकरांनीं समरांगणात उडी ठोकली होती. आगरकरांना समाजाला उन्नतीच्या मार्गावर न्यावयाचें होतें. असें काम करणाऱ्याला कशा प्रकारची निष्ठा लागते, कोणत्या प्रकारचें जीवन जगावें लागतें. याबद्दल त्यांना पूर्ण कल्पना होती. म्हणूनच जे धर्म-रक्षणाचा वा धर्मप्रसाराचा नुसता ओरडा करीत होते त्यांना त्यांनीं बजावलें, ज्या दिवशीं परदुःख विमोचनासाठीं **फादर डेमिअन**प्रमाणें महारोगासारख्या भयंकर व्याधीस आपलीं शरीरें बळी देण्याची तुमची तयारी होईल त्या दिवशीं हिंदुधर्माचें संरक्षण करण्यासारखें कांहीं सामर्थ्य तुमच्या अंगांत आहे असें म्हणतां येईल. शिळोप्याच्या वेळीं चार सुखवस्तु लोकांच्या सह्या मागत फिरण्यानें बुडत्या धर्माचा बचाव होत नसतो.

आगरकरांना, हें सनातनीबुद्रुकांना सांगण्याचा पुरेपूर अधिकार होता. कारण '**फादर डेमिअन**' इतक्या निष्ठेनेंच त्यांनीं स्वतःचा जीवनमार्ग आंखला होता. टिळकांनीं **माळावरला महारोगी** म्हणून आगरकरांचा एका ठिकाणीं उल्लेख केला आहे, परंतु आगरकरांना तो गौरवच वाटला असावा. कारण **डेमिअनची** निष्ठा आपल्या ठायीं असावी अशीच आगरकरांची इच्छा होती व टिळकांनीं त्यांना महारोगी म्हणून एकप्रकारें त्यांच्या निष्ठेचा गौरव केला होता.

आगरकरांच्या पूर्वी लोकहितवादींनीं हिंदुसमाजांतील दुष्ट चालीरीतींवर असाच तुफानी हल्ला केला होता. आगरकरांनीं लोकहितवादींची परंपरा पुढें चालवली. युद्धांत ज्याप्रमाणें एक सैनिक पडतांच दुसरा त्याच्या जागेवर उभा राहून शत्रूचा हल्ला परतवूं लागतो त्याप्रमाणें लोकहितवादींनीं हल्ले करून समाजांतल्या दुष्ट प्रवृत्तींना बेजार केलें तेंच कार्य आगरकरांनींहि केलें. त्या काळांत ही गोष्ट अत्यंत जरुरीची होती. अशी सातत्यता जर चालू राहती ना, तर समाजांतल्या दुष्ट प्रवृत्ति नष्ट होत्याच ना. टिळकांनीं-देखील अशा प्रकारें भूमिका घेतली असती तर कदाचित् आज स्वातंत्र्या-नंतरहि समाजांत जीं अनेक घाणेरडीं खेंकटीं दिसत आहेत तीं दिसतीं ना. समाज त्या वेळीं जागृत झाला होता. पाश्चात्य सुधारणांचें वारें वेगानें वाहूं लागलें होतें. अनेकजण तें वारें पिऊन हुशारहि झाले होते. कांहींतरी लिहावें, बोलावें, करावें असें वाटणारे अनेक आत्मे त्या काळांत होते, परंतु ते सारे भेकड होते. समाजाच्याविरुद्ध उभें राहण्याची हिम्मत त्यांच्यामध्यें नव्हती. जो तो नुसता 'तुम्हीं पुढें व्हा, आम्ही आहोंतच' म्हणणारा होता. आगर-करांनीं हिम्मत केली, समाजविरोधाची तमा बाळगली नाहीं यांतच त्यांचें अलौकिकत्व आहे.

राष्ट्र सेवा दलाच्या भूदान पथकांत हिंडत असतांना नाशिक जिल्ह्यांत एक अहिराणी कथा मीं ऐकली. एका गांवीं एक पूल बांधला. तो बांधत असतांना कांहीं कामगार बळी पडले. पूल झाल्यावर त्या पुलावर त्या कामगारांचीं भुतें होऊन बसलीं आहेत असा प्रवाद सगळीकडे पसरला आणि पूल असून कुणी त्याचा वापर करीना. जो पुलावरून जाईल त्याला भुतें पछाडणार या भीतीनें सर्वांच्या मनांत ठाण मांडलें. शेवटीं अधिकाऱ्यानें पुलाजवळ सर्व गांवकऱ्यांची सभा घेतली आणि सर्वांना भुतावर विश्वास ठेवूं नका असें कळवळून सांगितलें. शेवटीं असेंहि आमिष दाखवलें कीं, जो या पुलाचा पहिल्यांदा उपयोग करील त्याला एक हजार रुपये बक्षीस. परंतु हजार रुपयांसाठीं भुतांची परीक्षा पाहण्यास कुणी तयार होईना. शेवटीं एक युवक पुढें आला. त्यानें पुलावरून दोन-चार चकरा मारल्या आणि हजार रुपये खिशांत टाकले. त्याच्या धाडसाचें कौतुक करीत व आतां काय होतें याचा विचार करीत सारे लोक घरीं गेले. पांच सहा दिवसांनीं त्या युवकाला

कांहींच न झाल्याचें पाहून हजारों लोक पुलापाशीं येऊन 'आपण पूल ओलांडतों, हजार रुपये द्या' असें म्हणूं लागले, पण आतां बक्षीस तर मिळणार नव्हतेंच, पण पुलावरून जाण्यायेण्यासाठीं एक 'पैसा टोल' मात्र द्यावा लागणार होता. आगरकर त्या युवकासारखे होते, हिम्मतबाज होते. हिम्मत करील त्याची किंमत होते म्हणतात. आगरकरांची मात्र त्या काळीं किंमत झाली नाहीं. उलट त्यांना आत्यंतिक त्रासच सहन करावा लागला. आज मात्र 'महापुरुष' म्हणून त्यांची गणना होत आहे.

आगरकरांनीं ज्या अनेक विषयांवर लेखन केलें आहे ते सारे विषय आज कदाचित् तितके स्फोटक वाटणार नाहींत, परंतु त्या काळांत सुधारकांत प्रसिद्ध होणारा त्यांचा एकेक लेख म्हणजे जळता बाण होता. प्रक्षोभ उत्पन्न करणारा होता. लेख प्रसिद्ध झाला कीं, अनेक कावळे आपल्या चोची खुपसण्यासाठीं आगरकरांवर झडपा घेत असत. परंतु शिबीराजा ज्याप्रमाणें स्वतःच्या हातानें आपल्या मांसाचे लचके तोडून ससाण्याला संतुष्ट करूं पाहात होता त्याप्रमाणें दुष्ट रूढींच्या कबजांतून समाजाची सुटका व्हावी म्हणून आगरकर स्वतःचे हातानें आपल्यावर रोष ओढवून घेत होते. हातामध्यें लिहिण्याची शक्ति आहे तोंवर लिहिण्याचा त्यांचा निश्चय होता. लहान मूल आजारी झाल्यानंतर औषध देणाऱ्या मातेला जशा लाथा मारतें, चिमकुटे, घेतें, तिच्या डोळ्यांत बोटें खुपसतें, रडतें, भेकतें, शिव्याशाप देतें, तसें हें समाजरूपी रोगट बालक आगरकरांशीं वागलें. आगरकर समाजाच्या भल्यासाठीं झटत होते, तिळतिळ तुटत होते, अंतर्यामीं जळत होते. हा समाज लवकर तिरडीवरून जाऊं नये म्हणून कष्ट घेत होते, पण समाज मात्र जिवंतपणीं आगरकरांची तिरडी मिरवत होता. सूर्य प्रकाश देतो म्हणून आपण जगतों. हें सर्वांना माहीत आहे, पण स्वतः जळून सूर्य आपणाला प्रकाश देतो याची जाणीव मात्र आपल्याला होत नसते. आगरकर सूर्यासारखे होते. त्यांनीं समाजाला प्रकाश दिला, अंधारांत राहणारीं घुबडें प्रकाश दिसल्यावर जशी तडफडतात तशीं रूढींच्या अंधारांत दडलेलीं घुबडें हा ज्ञानाचा प्रखर प्रकाश पाहून तडफडलीं, त्यांना हें तेज सहन झालें नाहीं. मात्र या प्रकाशामुळें जें खरें मंगल होतें त्याची वृद्धि होत गेली, समाजांत जें सत् आहे त्याची उपासना वाढूं लागली, जें असत्य होतें तें निष्प्रभ होऊं लागलें.

दुष्ट धार्मिक रूढि चालीरीती व खुळचट समजुती यांचे वाभाडे आगरकरांनीं काढले यांत विशेष नवल नव्हतें. कारण जो डोळस होता, इंग्रजी विद्येमुळें ज्याची विचारशक्ति प्रगल्भ झाली होती त्याला त्याला यामधले दोष दिसत होतेच. सोंवळें, स्नान व आंघोळ, हजाम व हजामती, गंध-लेपन, प्रेतक्रिया व प्रेतसंस्कार, बालविवाह वगैरे विषय आगरकरांनीं हाताळणें स्वाभाविकच होतें. सिंहाच्या पंजाचा उपयोग पाठ खाजवणें आणि माशा मारणें याकडेहि सिंह करतो, परंतु त्याचा खरा उपयोग गजेंद्राचें गंडस्थल फोडण्याकडे व रानरेड्याची मान एका चपराकेंत मोडण्याकडेच असतो. आगरकरांची अलौकिक बुद्धिमत्ता घाणीनें बुजबुजलेल्या समाजपुरुषाच्या एका अंगाचीच सुधारणा व्हावी एवढ्यासाठींच नव्हती. त्यामुळें फक्त पांढर-पेशा समाजांत असणाऱ्या गंधलेपन, केशवपन, सोंवळेंओवळें यांवरच आगरकरांनीं आपली लेखणी चालवलेली नाहीं. साऱ्या समाजाचें मंगल व्हावें ही जाणीव आगरकरांना होती. त्यामुळें त्यांनीं असे अनेक विषय हाताळले कीं, जे आजदेखील आपणाला डांचत आहेत.

जातीभेदांवर आगरकरांनीं फार प्रभावीपणें हल्ला केला आहे. ब्रिटिश लोकांपुढें गुडघे मोडून बसण्यांत, त्यांच्याशीं हस्तांदोलन करावयास मिळालें तर धन्य मानण्यांत मश्गुल असत अशा तत्कालीन पांढरपेशा लाळघोट्यांवर आगरकरांनीं आपल्या लेखणीचा प्रहार 'सोंवळ्याओंवळ्याची पुरवणी' या लेखांत केला आहे.

'कोणताहि हिंदु गोवध करून त्या मांसावर उपजीविका करीत नाहीं. मुसलमानास व युरोपियनांस तसें करण्यास प्रत्यवाय नसून महार, मांग, धेड, ढोर वगैरे हिंदूंपेक्षां ते आम्हांस पवित्र व स्पर्श्य वाटतात. त्यांच्याशीं आम्ही हरएक प्रकारचा बाह्य व्यवहार करतों. ते व आम्ही सभांत, कौन्सिलांत व कॉंग्रेसांत 'शेकह्यांड' करतों व एकत्र उठतों–बसतों असें असून कांहीं हिंदुजाती आम्हांस इतक्या अस्पृश्य वाटाव्या हें नवल नाहीं काय?' या प्रश्नानंतर पुढें जाऊन आगरकरांनीं असें म्हटलें आहे कीं, 'कल्पना करा कीं, ढोर, भंगी महार, धेड व चांभार यांनीं आपापले धंदे कांहीं वेळ न करण्याचा कट केला तर स्वतःस उच्च मानून घेणाऱ्यांची काय अवस्था होईल?' आगरकरांनीं जें फार पूर्वीं सुचवलें होतें तें आज खरें ठरलें आहे.

सवर्ण हिंदूंनीं अगणित छळ केल्यानंतर त्यांतून मुक्त होण्यासाठीं सारा दलित समाज 'बौद्ध' बनला आणि हीन धंदे करण्याचें त्यांनीं सोडून दिलें. त्यामुळें जी समस्या उत्पन्न झाली आहे ती अजून सुटलेली नाहीं. आगरकरांनीं त्यावेळीं जें सांगितलें तें हिंदु समाज ऐकता तर ६ कोटी हिंदूंना आपल्या धर्मावर थुंकण्याची बुद्धि होती ना.

'समाजाच्या विलक्षण रहाटीमुळें उच्चनीचत्व अस्तित्वांत येऊन तदनुसार जो व्यवसाय विभाग सहजगत्या झाला त्यास ईश्वरकृत व सनातन मानून उच्च वर्गात जन्मलेल्या लोकांनीं नीच वर्गात जन्मलेल्या लोकांस अपवित्र व अस्पृश्य मानणें याहून मनुष्याच्या विचारीपणास लांछनास्पद अशी दुसरी गोष्ट नाहीं', हें आगरकरांनीं जाणलें होतें, पण समाजानें जाणलें नाहीं. त्यांनीं आगरकरांनाच 'अस्पर्श्य' ठरवलें. तरीहि आगरकरांनीं आपले विचार सातत्यानें लोकांच्या कानावर घातले. त्यांनीं या राष्ट्राच्या दैन्यावस्थेचें कारण जाणलें होतें. विद्येशिवाय इथल्या समाजाचें, भलें होणार नाहीं हें ओळखलें होतें. 'मानसिक व शारीरिक क्षीणता, दारिद्र्य, पारतंत्र्य, धर्मासंबंधानें वेड्याखुळ्या समजुती, जातिभेदासारखे हजारों पिढ्या चालत आलेले जबरदस्त निर्बंध—इत्यादिकांनीं गांजून, पिळून अथवा चिरडून जाऊन मरणोन्मुख झालेल्या देशास शिक्षणावांचून दुसरा तरणोपाय आहे असें आम्हांला वाटत नाहीं' असा आगरकरांचा विश्वास होता. टिळकांबरोबर चिपळूणकरांचेसह त्यांनीं शाळा काढली व पुढें कॉलेज काढलें. तरुण पिढीला योग्य मार्गदर्शन मिळावें म्हणून ही तरतूद होती, परंतु जुन्या जोखडांतून युवकांची मुक्तता व्हावी म्हणून त्यांनीं 'सुधारक' काढला आणि समाजांतील जीर्णमतवाद्यांवर हल्ले चढवले. प्रत्यक्ष आईबापांचा विरोध असेल तरीदेखील आपल्या ध्येयापासून ढळूं नका हें सांगतांना आगरकरांच्या बुद्धिवादी लेखणीनें जें लिहिलें आहे तें वाचल्यानंतर धक्काच बसेल, पण आगरकर १०१ टक्के बुद्धिवादी होते. ते सरळ विचारतात, मुलें अस्तित्वांत आणणें यांत मुलांवर आईबाप कोणता उपकार करतात हें समजणें थोडें कठिण आहे? आईबापांकडून मुलांचें जें संगोपन-लालन-पालन होतें त्याबद्दलहि आगरकरांना विशेष कांहीं वाटत नाहीं. ते म्हणतात, 'क्रूर वाघीणदेखील आपल्या पिलांवर



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम ........................ दि: ........................
क्रमांक ........................ नों. दि:

मनुष्य स्त्रीसारखें प्रेम करते, तेव्हां जो स्वभाव बहुधा सर्व जीवकोटीस साधारण आहे त्याबद्दल मनुष्यसंततीनेंच विशेष कृतज्ञ कां असावें हें समजत नाहीं ? बुद्धिवादाची एवढी तीव्रता इतरत्र पाहायला मिळत नाहीं, निदान त्याकाळीं तरी ती दुर्मिळच होती.

परंतु आगरकर एवढे कठोर नव्हते. वरवर दिसणाऱ्या या काठ्यांआड समाजकल्याणासाठीं तिळतिळ तुटणारें दुखरें काळीज दडलें होतें. फणस जसा वरून खडबडीत पण आंत रसाळ, नारळ जसा वरून कठीण पण आंत गोड पाणी आणि खोबरें, तसें लिखाणांतून भासणाऱ्या आगरकरांआड समाजाची दैना पाहून विव्हळ होणारे, धाकट्या यशवंताला पाठीवर घेऊन गुडघे टेकून घोडाघोडा करणारे किंवा मृत्यु समीप येतांच टिळकांशीं असलेलें वैर विसरून खूप बोलावें अशी तळमळ वाटणारे एक वेगळे आगरकरहि होते. आगरकरांच्या बुद्धिवादांत भावनेचा सूक्ष्म ओघ नकळत मिसळला गेला होता. म्हणूनच ते इतक्या सहृयतेनें, तळमळीनें लिहूं शकत. केवळ बुद्धिवाद एवढेंच त्यांच्या तत्त्वज्ञानाचें अधिष्ठान असतें तर आगरकरांचें सारें लिखाण माळरानासारखें उजाड झालें असतें. वाळवंटांत एखादाच प्रचंड वृक्ष उभा दिसावा त्याप्रमाणें आपल्या बुद्धिवादी तत्त्वज्ञानाचें वेगळेंपण मिरवीत आगरकर तत्कालीन समाजांत उठून दिसतात. बुद्धिवादी तत्त्वज्ञानाचा विस्तार होण्यासाठीं भावनेची सखोलता लागते. आगरकरांजवळ ती होती. म्हणूनच बालविवाहाचे परवाने घेऊन लहान लहान मुलींवर होणाऱ्या बलात्कारांनीं त्यांचे डोळे पाणावले, विधवा झालेल्या तरुणींना केंस काढून विद्रूप केलेलें पाहून ते कासावीस झाले. त्यांच्या मनांत ही खळबळ निर्माण कां झाली ? त्यांच्या काळजाची तडफड कां झाली ? ते केवळ बुद्धिवादी असते तर हें होतें ना ! अनेक बुद्धिनिष्ठ शिष्ट त्या काळीं महाराष्ट्रांत होतेच कीं त्यांनीं आपल्या बुद्धीच्या बळावर या कृत्यांचें समर्थन करायचाच प्रयत्न केला, पण **आगरकर माणूस होते.** माणसाचें मन त्यांचेजवळ होतें. भावना आणि विचार यांचा जिथें संगम होतो तिथेंच मनुष्यत्व असतें. भावना नुसती असून भागत नाहीं. नुसता विचारहि पुरा पडत नाहीं. जे स्वतःला माणसें म्हणवून घेतात त्यांना विचार करण्याची शक्ति असावी लागते तशीच भावनेची भक्तीहि असावी लागते. आगरकर मनुष्य होते, मानवता त्यांच्याजवळ होती, म्हणूनच हिंदु

मुलींच्या करुण किंकाळ्या त्यांना ऐकूं आल्या. हिंदुसमाजाच्या वेदना त्यांना समजूं शकल्या. आगरकरांचा बुद्धिवाद १०१ टक्के होता असें आम्हांला वाटतें त्याचें कारण हेंच आहे. तो वरचा १ आहे तो भावनेनें भारावलेला आहे.

पहाडासारखा असामान्य पुरुष हा. दुष्टांचे घणाघात त्यानें झेलले आणि विचारसरितांना जन्म दिला. उन्हापावसाची तमा बाळगली नाहीं. झंझावातांत कणभर ढळला नाहीं. आगरकरांनीं आपल्या जीवनांतला क्षणन्‌क्षण या समाजाच्यासाठीं खर्चला. शेत पतपेढ्या स्थापन कराव्या, कामगार संघ स्थापावे, येथल्या लोकांनीं उद्योगधंद्यांत लक्ष घालावें, वगैरे अनेक विषय त्यांनीं सांगितले. 'हिंदुस्थानांतील एकूण एक प्रौढ स्त्रीपुरुषांस लिहितां वाचतां आलें पाहिजे. तसेंच प्रत्येक व्यक्तीस आपला चरितार्थ चालविण्यास एखादा तरी धंदा येत असला पाहिजे' अशी त्यांची इच्छा होती.

तत्कालीन समाजानें मात्र आगरकरांना मनसोक्त छळून घेतलें. समाजाचें भलें करण्यासाठीं निघालेल्या या सत्पुरुषाचे मार्गांत समाजानें कांटेच कांटे पसरले. आगरकरांनीं कधींहि तक्रार केली नाहीं. एका हातानें कांटे दूर करीत, एका हातानें सुधारणेचा झेंडा उंच धरून ते मार्गानें जात राहिले. मार्गांतले कांटे दूर करून ते मागून येणाऱ्यांना रस्ता निर्मळ करीत चालले होते. समाजाच्या शिव्याशापांची, दगडधोंड्यांची त्यांना तमा नव्हती. लक्ष सारें एकवटलें होतें रस्ता साफ करण्याकडे. मात्र मार्ग संपेना, कांटे संपेनात आणि मधेंच थांबणें आगरकरांना होईना. हात रक्तबंबाळ झाला, देह थकला मात्र हातांतला झेंडा उंचच राहिला. कांटे सरेनात—पाय थांबेनात-जखमांनीं भरलेला देह घेऊन हा वीर पुढें पुढें जात होता—बालपणापासून रोगाशीं झगडून झगडून पोखरलेला देह, उपासमारीनें आणि हाल-अपेष्टांनीं खंगलेला देह, रात्र-दिवस चिंता करून आणि दम्यानें खोकून खोकून थकलेलें काळीज. किती दिवस हें सारें सोसायचें? आणि एक रात्र अशी आली, देह संपला. आगरकरांना सर्वांचीच काळजी होती. समाजाची त्यांनीं काळजी केलीच, पण ज्या देहानें आजवर साथ केली त्याची मरणानंतरदेखील काळजी या महात्म्यानें घेतली होती. त्यांच्या उशाजवळ एक पुरचुंडी होती. त्यांत होते कांहीं रुपये आणि एक चिठ्ठी—'माझ्या प्रेत दहनार्थ' येवढेंच त्यावर लिहिलें होतें—

* * *

# जीवन-ज्योत

# जाळणारा जोतिबा

**भली केली हीन याति । नाहीं वाढली महंती ।**
**जरी असतां ब्राह्मणजन्म । तरी हें अंगीं लागतें कर्म ।**

आम्ही मराठी माणसें स्वतःला फार बुद्धिवादी समजतों. निदान आमच्या पांढरपेशे मंडळींना तरी 'बुद्धिवादाचें' फार फार आकर्षण आहे. आमचे एक मित्र स्वतःला असेच प्रखर बुद्धिवादी समजतात. त्यांनीं आपल्या बुद्धि-वादाला फार छान 'अंगडीं टोपडीं' शिवलेलीं आहेत. त्यामुळें हें बुद्धिवादाचें बाळ अस्सल शब्दप्रामाण्यवादी झालें आहे. संस्कृत भाषेशीं ओळख असावी आणि उच्चार स्पष्ट असावेत या सबबीखालीं ते रोज संध्या करतात. किल्ल्या सुरक्षित ठेवतां याव्यात म्हणून ते जानवें घालतात. अशा अनेक गोष्टी आणि सबबी सांगून आपल्या बुद्धिवादाशीं आणि रूढ–परंपरेशीं ते प्रामाणिक राहिले आहेत. महाराष्ट्रांत या छापाचीं बुद्धिवादी माणसें कमीं नाहींत. किंबहुना सारेच बुद्धिवादी या छापाचेच आहेत. आम्हांला असला दुटप्पी प्रामाणिकपणा मंजूर नाहीं. आपलीं मतें समाजाला धक्का देणारीं असलीं तरीहि तीं सांगणाऱ्या माणसांबद्दल आम्हांला सदैव आकर्षण वाटत आलें आहे. अशा माणसांपाशीं सारासार विचार, व्यवहारज्ञान अथवा सरळ भाषेंत धूर्तपणा नसेल, पण आपल्या विचारांशीं प्रामाणिक राहण्याचा निश्चय (भाबडेपणा म्हणा हवा तर) या माणसांजवळ निश्चितपणें असतो. म्हणूनच अशा माणसांविषयीं आम्हांला आत्यंतिक जिव्हाळा वाटतो.

महात्मा फुले यांच्याविषयीं अशा प्रकारचा जिव्हाळा, आदर आम्हांला फार दिवसांपासून आहे. फुले यांनीं आपल्या स्वतःच्या समाजावर आसूड ओढले नसतील, परंतु त्यांनीं त्या काळीं स्वतःला सुधारलेल्या, उच्च समज-णाऱ्या पांढरपेशे वर्गाची जी हबेलंडी उडवली ती अविस्मरणीय आहे. फुले यांच्या या कार्याचें आम्हांला कौतुक वाटतेंच, परंतु आमच्या आणि त्यांच्या विचारसरणींतला एक धागा समान निघाला त्यामुळें आम्हांला त्यांच्याबद्दल



जास्त आपुलकी वाटते. १८५७ च्या क्रांतियुद्धाची शताब्दि साऱ्या देशभर नुकतीच साजरी झाली. कम्युनिस्टांपासून हिंदुसभेपर्यंत सर्वांनीं त्या क्रांति-युद्धाच्या निमित्तानें जुन्या इतिहासाला उजाळा दिला. आम्हांलादेखील त्या क्रांतियुद्धांत लढलेल्या भारतीयांबद्दल नितांत आदर आहे. आम्हांलादेखील त्या थोर वीरांच्या राष्ट्रभक्तीबद्दल अभिमान आहे. त्या झांशीच्या लक्ष्मीपुढें, त्या तात्याटोपे पुढें, त्या कुंवारसिंहापुढें, त्या बहादुरशहापुढें, त्या नानासाहेबा-पुढें आमचीदेखील गर्दन झुकणें स्वाभाविक आहे. कारण परकी सत्तेविरुद्ध त्यांनीं शस्त्र उठवलें होतें. ते राष्ट्रभक्त होते, परंतु त्यांच्याबद्दल हा आदर दाखवूनहि आम्हांला तें क्रांतियुद्ध अयशस्वी झालें, हें बरें झालें असें वाटतें. महात्मा फुले यांनाहि असेंच वाटत होतें. हें मत समाजाला धक्का देणारें होतें. आजहि थोड्याफार प्रमाणांत आहे. परंतु महाराष्ट्रांत लोकहितवादी, आगरकर, महात्मा फुले, विठ्ठल रामजी शिंदे, आंबेडकर आणि साने गुरुजींसारखे महान् समाजप्रवर्तक होऊन गेल्यानंतरहि जी सामाजिक बजबजपुरी आहे ती पाहिल्या-नंतर सामाजिक दृष्टिकोन ठेवून, बौद्धिक निकषाखालीं १८५७ च्या आधींच्या आमच्या महाराष्ट्राकडे पाहिलें कीं, त्यावेळीं आम्हांला अपयश आलें तेंच बरें झालें असें म्हटल्यावांचून राहवत नाहीं. 'जोतिबांनीं १८५७ चें क्रांतियुद्ध फसलें हें चांगलें झालें असें स्पष्टपणें लिहिलें. त्यांचा दृष्टिकोन शास्त्रशुद्ध होता. ते म्हणतात : "त्या बंडांत इंग्रजी राज्य गेलें असतें तर इतिहासाची पुनरावृत्ति घडली असती. ब्राह्मण पेशव्यांचा पुनः अवतार झाला असता. श्रुति-स्मृति-पुराणांतील हिंदु संस्कृतीला पुनः जोर चढून शूद्र व अतिशूद्र असलेल्या बहुसंख्य जनतेची उद्धाराची आशा जी इंग्रजी राज्यामुळें अंकुरित झाली आहे ती पार ठार झाली असती. सामाजिक अन्याय हा हजारों वर्षांचा आहे; याचीं मुळें फार खोल गेलीं आहेत. इंग्रजी राज्य आज आहे उद्यां नाहीं. मुख्य प्रश्न सामाजिक गुलामगिरी कशी नष्ट होईल हाच आहे."

जोतिबांच्या या मतानें त्या वेळीं किती खळबळ उडवून दिली असेल हें सध्यां न. र. फाटक यांच्या विरुद्ध उठलेल्या वादळावरून लक्षांत येईल. बहुजनसमाज हा नेहमींच भावनाप्रधान असतो. त्याच्या भावनाप्रधानतेमुळें तो दुबळा झालेला असतो आणि आपल्या कल्पनांच्या आणि भावनांच्या वेटोळ्यांत फुरंगटून बसलेला असतो. बुद्धिवादाची काडी लावून त्याला कुणीं

हलवायचा प्रयत्न केला कीं, तो एकदम चवताळून उठतो. स्वतःचा दुबळेपणा झांकण्यासाठीं घेतलेलें त्याचें हें सोंग असतें भयंकर. पण खऱ्या बुद्धिवाद्याला तें भेडसावूं शकत नाहीं. आगरकर, फुले, लोकहितवादी हे खरेखुरे बुद्धिवादी होते म्हणूनच समाजाच्या रोषाला ते तोंड देऊं शकले. १८५७ सालच्या क्रांतियुद्धाबद्दल फुले यांनीं काढलेले उद्गार कुणाला पटोत न पटोत आम्हांला मात्र तें मनोमन पटले आहेत. कारण तें युद्ध यशस्वी होतें तर धर्मावर अंधश्रद्धा ठेवणारे विरुद्ध धर्मसुधारक असें नवें युद्ध सुरू झालें असतें आणि मग रुढिप्रिय समाजाच्या विरुद्ध जाऊन समाजाचें हित करूं पाहणाऱ्या आगरकर, लोकहितवादींचा कडेलोट झाला असता; फुले, कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांना अंधारकोठडीची शिक्षा मिळाली असती आणि आंबेडकरांसारख्यांना तर हत्तीच्या पायांखालीं देण्यांत आलें असतें. ह्या सर्व गोष्टींची कल्पना केल्यानंतर १८५७ च्या क्रांतियुद्धांत लढलेल्या सर्व राष्ट्रभक्तांच्या राष्ट्रप्रेमाला आणि त्यागाला यत्‌किंचितहि कमी न लेखतां त्यांच्याबद्दल आदर ठेवूनहि आम्हीं तें युद्ध अयशस्वी झालें याबद्दल समाधान व्यक्त करतों.

१८५७ नंतर १९४७ सालापर्यंत आमच्या देशानें स्वातंत्र्यासाठीं सातत्यानें प्रयत्न केले. या प्रयत्नांमुळें आमच्या देशांतल्या नागरिकांमध्यें एकात्मतेची, सामाजिक स्वातंत्र्याची आणि लोकशाहीची नवी जाणीव निर्माण झाली. निरनिराळ्या प्रांतांत निरनिराळ्या समाजांत असे पुरुष निर्माण झाले कीं, ज्यांनीं आपल्या समाजांत चेतना निर्माण केली, त्या समाजाला नवीं क्षितिजें निर्माण करून दिलीं. महात्मा फुले हे महाराष्ट्रांतल्या बहुजन समाजांत नवें चैतन्य, नवी जागृति निर्माण करणारे पहिले पुरुष होते. त्यांच्या आधीं कांहीं काळ पांढरपेशा वर्गांत जागृति करणारे, चैतन्य आणणारे पांढरपेशे पुरुष निर्माण झाले होते. त्यामुळें तत्कालीन समाजांत ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर असे दोन प्रवाह निर्माण झाले. महाराष्ट्रवृक्षाच्या या शाखा आपलें मूळ विसरून परस्परविरुद्ध दिशेनें वाढूं लागल्या. परंतु भाग्य आमच्या महाराष्ट्र माऊलीचें ! या समाजांत असे पुरुष निर्माण झाले कीं, परस्परविरुद्ध वाढणाऱ्या या शाखांना त्यांनीं सांवरलें. पारंब्यासारखे ते खालीं आले आणि महाराष्ट्रसमाजाचा हा वटवृक्ष तयार झाला. डेरेदार

भरगच्च अशा या हिरण्यागार वृक्षांचा संभार पेलणारे अनेक महापुरुष या समाजांत निर्माण झाले.

महात्मा फुले हे आमच्या समाजांतले असे महापुरुष होते. फुले यांना बहुजनसमाजासाठीं जीवन-ज्योत जाळणारे असें आम्हीं म्हणतों, तेव्हां प्रचलित अर्थानें ' बहुजन समाज ' हा शब्द वापरत नाहीं. आज बहुजन समाज हा शब्द फार संकुचित अर्थानें वापरला जातो. टिळक-आगरकर ब्राह्मणांचे, आंबेडकर दलितांचे, फुले, भाऊराव पाटील मराठ्यांचे अशी वांटणी जे करतात ते क्षुद्र मनोवृत्तीचे, कर्मदरिद्री आहेत. या महापुरुषांचीं नांवें घेण्यालाहि ते पात्र नाहींत. जातीयवादी विखाराची दृष्टि ठेवून चरित्र लिहिणाऱ्या एका बुद्दुक चरित्रकारानें आपल्या लेखणीनें दूषित केलेलीं कांहीं चरित्रें आम्हीं वाचलीं. विष्णुशास्त्री चिपळूणकर, सार्वजनिक काका, आगरकर यांची टिंगल, हेटाळणी केलेली त्यांत दिसली. फुले, भाऊराव पाटील यांचें चरित्रगान करतांना टिळक, आगरकर, विष्णुशास्त्री यांची टिंगल करायला लागावी याएवढी विचारांची क्षुद्रता आणि बुद्धीची दरिद्रता दुसरी नसेल. पोट जाळण्यासाठीं अशीं पुस्तकें काढून वर समाजकार्य केल्याचा आव आणणारे हे ' तस्कर ' यांची, फुले, भाऊरावांचीं चरित्रें लिहिण्याची काय, वाचण्याचीहि लायकी नाहीं. केवढीं थोर माणसें तीं ! ज्या हेतूनें त्यांनीं आपलें जीवन जाळलें त्याच्या मुळाशीं फक्त एका विशिष्ट समाजाचेंच भलें करावें असा क्षुद्र हेतु कसा असूं शकेल ? टिळक, आगरकरांना जामीन मिळवून देऊन त्यांची सुटका घडवून आणणारे आणि टिळक, आगरकर सुटले म्हणून दसऱ्याच्या शिलंगणाहून भव्य मिरवणूक काढून आनंदानें नाचणारे जोतिबा ! ते का ब्राह्मणद्वेष्टे ? ब्राह्मण काशीबाईला असहाय्य स्थितींत आसरा देऊन तिच्या मुलाला स्वतःचा मुलगा बनवणारे जोतिबा ! ते का ब्राह्मणद्वेष्टे ? साऱ्या महाराष्ट्र समाजाचें कल्याण व्हावें म्हणून तळमळणारीं हीं देवमाणसें. टिळक काय, आगरकर काय, जोतिबा काय, भाऊराव काय, आंबेडकर काय या साऱ्यांच्या जीवनाइतकीं पवित्र जीवनें झालीं नाहींत. या सर्वांनीं जो सांगितला, या सर्वांनीं जो आचरला, या सर्वांनीं जो जोपासला तो ' महाराष्ट्रधर्म ' फार विशाल आहे. त्या धर्मांत जातीपातीला स्थान नाहीं. त्या धर्मांत कुणापेक्षां कुणी उच्च नाहीं. जोतिबांना श्रेष्ठ मानणाऱ्यांनीं टिळकांना कमी मानायला नको.

आकाश जसें अथांग तशीं अथांग कर्तृत्वाचीं हीं श्रेष्ठ माणसें होतीं. साऱ्या मराठी जनतेची त्यांना सुधारणा करायची होती. हीं माणसें भांडलींहि असतील, पण त्यांची तळमळ एकच होती. साऱ्या महाराष्ट्राचे हे मानकरी होते.

जोतिबांच्याबद्दल महाराष्ट्राच्या दुसऱ्या एका महापुरुषानें पद्यामध्यें आपल्या भावना गुंफल्या आहेत. विठ्ठल रामजी शिंदे कांहीं कवि नव्हते, पण अंतःकरणाची तार छेडली गेल्यानंतर जे स्वर निर्माण होतात त्यांचें मोल करायचें नसतें, कारण त्यांचें मोल होऊंच शकत नाहीं. विठ्ठलरावांनीं म्हटलें आहे :

सत्याचा पालनवाला । हा धन्य जोतिबा झाला ॥
पतितांचा पालनवाला । हा धन्य जोतिबा झाला ॥
जन्माचा मालाकार । कर्मांची खडी तलवार ॥
जनतेचा जागा शेर । त्या समान कोण तो बोला ॥
हा धन्य जोतिबा झाला ॥

या पद्यांतल्या भावनेशीं सारा महाराष्ट्र सहमत असेल. जोतिबा कर्मांची खडी तलवार होते. स्त्री सुधारल्याखेरीज समाजसुधारणा होणार नाहीं हें तत्त्व जोतिबांना वयाच्या २१ व्या वर्षीं समजलें. केवळ तत्त्व समजलें म्हणजे संपलें असें मानून जोतिबा स्वस्थ बसले नाहींत. तत्त्वाचें आचरण करून त्यांनीं कर्ते सुधारकपणा पत्करला. वयाच्या एकविसाव्या वर्षीं एवढी दूरदृष्टि, एवढी धडाडी, सुधारणेच्या मार्गावरचें एवढें निश्चयी पाऊल टाकण्याची हिम्मत त्यांचेपाशीं होती, यांतच त्यांच्या लढाऊ वृत्तींचें दर्शन आहे. १८४९ सालीं त्यांनीं मुलींसाठीं पहिली शाळा सुरू केली. बहुजन समाज म्हणून आज जो समाज ओळखला जातो, त्याच्या दैन्याला, मागासलेपणाला शिक्षणाचा अभाव हें एक प्रमुख कारण आहे. आजहि शिक्षणाबद्दल या समाजांतल्या बहुसंख्य युवकांना विशेष आवड दिसत नाहीं ही मोठी खेदाची गोष्ट आहे. ज्ञानप्राप्तीची लालसा जेव्हां प्रत्येक युवकाच्या नसानसांतून सळसळूं लागेल तेव्हांच आमच्या समाजाच्या उत्कर्षाचा पारा वर चढला जाईल. जोतिबांनीं, स्त्री-शिक्षणानें आपल्या सामाजिक सुधारणांच्या कार्यक्रमाला सुरुवात केली. त्या शाळेंत ते स्वतः शिकवत त्यांच्या या शाळेला पांढरपेशा व तत्कालीन

सुशिक्षित लोकांनीं देखील नांवें ठेवलीं, परंतु जोतिबांनीं ज्ञानाची ज्योत पेटवली होती. तिच्या प्रकाशानें अनेकांचीं अन्तःकरणें उजळलीं. त्यांच्या शाळेंत बऱ्याच मुली दाखल झाल्या. एकट्यानें शिक्षकाचें काम होईना, तेव्हां जोतिबांनी आपल्या धर्मपत्नीचें साहाय्य घेतलें. त्यांचें हें कृत्य देखील एक धाडसच होतें. बाहेर सुधारक म्हणून मिरवणारे अनेक महाभाग घरांतल्या स्त्रियांना मात्र सुधारणांचें वारें लागूं न देण्याची काळजी घेतात, पण जोतिबांनीं आपल्या पत्नीलाहि नवविचार व नवसमाज निर्मितीचें महत्त्व पटवलें होतें आणि आपल्या कार्यात सहभागी होण्याचें भाग्य त्या माऊलीलाहि दिलें होतें. सावित्रीबाई जेव्हां घरून शाळेंत जात तेव्हां कांहीं टारगट टगे त्यांच्या वाटेवर उभे राहून त्यांची टिंगल करीत, त्यांना खडे मारीत. जोतिबांच्या वडिलांनाहि सुनेचें हें समाजकार्य पसंत नव्हतें. याच कारणावरून त्यांचें व जोतिबांचें भांडण झालें आणि घरादाराचा आणि वडिलांचा त्याग करून जोतिबांना आपल्या कार्याचें मोल द्यावें लागलें.

१८५१ सालीं जोतिबांनीं आपल्या कार्यातील दुसरें महत्त्वाचें पाऊल टाकलें. अस्पृश्य वर्गातील मुलांना शिक्षण देण्यासाठीं नाना पेठेमध्यें त्यांनीं एक नवी शाळा सुरू केली. महारामांगांचीं मुलें पाट्यापुस्तकें घेऊन अभ्यास करूं लागलीं. पुन्हां एकदां जोतिबांविरुद्ध प्रचंड वावटळ उठली. त्या शाळेंतला त्यांचा मदतनीस भिऊन पळून गेला. इथेंहि सावित्रीबाईनीं आपल्या नवऱ्याला मदत केली. अस्पृश्यांना ज्ञानदान करण्याचें महान् कार्य हीं पतीपत्नी करूं लागलीं. महारवाड्यांत जाऊन जोतिबा मुलांच्या आईवडिलांना शिक्षणाचें महत्त्व समजावून देत आणि आपलीं मुलें शाळांतून पाठवा अशी विनंति करीत. त्यांच्या तळमळीच्या व आपुलकीच्या वागणुकीनें हळूहळू या शाळेंत बरेच विद्यार्थी येऊं लागले. महाराष्ट्राच्या नव्या पिढीला जातिभेद विसरण्याचा पहिला धडा मिळाला. जोतीबांच्या कार्याला नांवरूप आलें. याचवेळीं जोतिबांच्या जिवावर घाला घालण्याचा दुष्ट डाव खेळला गेला. धोंडीराम कुंभार नांवाच्या एका गृहस्थास जोतिबांचा खून करण्यासाठीं हजार रुपये देऊन पाठविण्यांत आलें. रात्रीचे वेळीं हा गृहस्थ आपल्या साथीदारांसह जोतिबांच्या घरांत शिरला. जोतिबा जागे झाले. त्यांनीं मारेकऱ्यांना विचारलें, ‘ मला मारण्यांत तुमचा काय फायदा आहे ? ’ हजार रुपये मिळ-

णार असल्याचें मारेकऱ्यांनी स्पष्टपणें सांगितलें. त्यावर या महात्म्यानें सांगितलें "ठीक आहे. माझ्या मृत्यूनें जर तुमचा संसार सुखाचा होत असेल तर मला खुशाल मारा." जोतिबांच्या या बोलण्यांत आत्मसमर्पणाची जी भावना होती त्यामुळें मारेकऱ्यांचीं शस्त्रें गळून पडलीं. त्यांची क्षमा मागून ते निघून गेले. जोतिबांच्या जीवनाचें हें उदात्त दर्शन पाहिल्यानंतर कवचकुंडलें देणाऱ्या कर्णाची अथवा स्वतःच्या मृत्यूचें मर्म सांगणाऱ्या जटायूची आठवण होते. मारेकऱ्यांनीं सोडावें म्हणून हे भेकड उद्‌गार असावेत असेंहि म्हणतां येणार नाहीं. कारण जोतिबा अत्यंत लढाऊ, निपुण शस्त्रबहाद्दर होते. तारुण्यांत 'लवजीबुवा मांग' या प्रसिद्ध शस्त्रविद्या पारंगत माणसाजवळ ते शस्त्रें चालवण्यास शिकले होते. परंतु दुसऱ्याचा संसार सुखी करण्यासाठीं आत्मबलिदान करण्यास ते तयार झाले. त्यांच्या त्यागी जीवनाचा हा पडसादच होता. दुःखीजनांचे अश्रु पुशीन याच वृत्तीनें त्यांचें सारें जीवन भारावलें होतें. अडचणींत सांपडलेल्या आणि चुकीच्या मार्गानें गेलेल्या व फसवणूक झालेल्या अबलांनीं आपल्या मुलांच्या नरडीला नखें लावून आणखी पाप करूं नये म्हणून त्यांनीं बालहत्त्या प्रतिबंधक गृह स्थापन केलें. समाजांतल्या वाट चुकलेल्या पाडसांना दिलासा देण्यासाठीं उभ्या राहिलेल्या ह्या पुरुषाच्या महान् हृदयाचा हा साक्षात्कार पाहून मराठी माय-भगिनींचीं अंतःकरणें भरून आलीं असतील. स्त्रियांना बिघडवायला पुरुष नेहमींच कारणीभूत होतात. सर्व करून हात झटकून नामानिराळें होणेंहि त्यांना चटकन् साधतें. पण वाट चुकलेल्या आणि त्या चुकीचें फळ उदरांत वाढणाऱ्या अभागिनींना जवळ करणारा असा महात्मा एखादाच असतो. पतित स्त्रिला धोंडे मारणाऱ्या समाजाला आवरणारा ख्रिस्त जसा महान् तसे बालहत्त्या प्रतिबंधकगृह काढणारे जोतिबाहि महान्.

जोतिबांचें नांव ख्रिस्ताबरोबर घेत असतांना आम्हांला त्याकाळीं जोतिबांवर झालेल्या आरोपांची आठवण होत आहे. पंडित रमाबाई, प्रो. वेलिंगकर, नीलकंठशास्त्री गोऱ्हे वगैरे विद्वान् मंडळींनीं त्या काळीं धर्मत्याग करून ख्रिस्तीधर्म स्वीकारला होता. ह्या पार्श्वभूमीवर तत्कालीन समाजानें जोतिबांच्या चळवळीला बसवलें आणि जोतिबादेखील ख्रिस्ती आहेत, असा डांगोरा पिटला. जोतिबांच्या जीवनांत ख्रिस्ती मिशनऱ्यांसारखी प्रखर तळमळ होती. ख्रिस्ती

मिशनऱ्यांमध्यें अपंगांबद्दल, अनाथांबद्दल, दुबळ्यांबद्दल, दलितांबद्दल तळमळ असते, पण ती धर्मप्रसाराच्या सहेतुक स्वार्थावर अधिष्ठित असते, त्यामुळें अंतीं ती क्षुद्र, हलकी असते. जोतिबांच्या जीवनाकडे आज जेव्हां आम्हीं बघतों तेव्हां आम्हीं अभिमानानें असें म्हणूं शकतों कीं, महाराष्ट्राच्या या सुपुत्रानें कुठलाहि क्षुद्र स्वार्थ न बाळगतां केवळ मानवतेच्या महान् मंगल तत्त्वानें भारावून दलितांना, अपंगांना, दुबळ्यांना, अनाथांना जवळ केलें. जोतिबांची तळमळ ही अंतरींची तळमळ होती; त्यांच्या सहृदयतेचा तो परिपाक होता. १८६८ सालीं अस्पृश्यांना माणूस म्हणून जगतां यावें, घोटभर निर्मळ पाणी पिऊन आपल्या तडफडणाऱ्या आत्म्याला शांत करतां यावे म्हणून जोतिबांनीं आपल्या हौदावर पाणी भरण्याची स्वखुशीनें परवानगी दिली. प्रथम या सवलतीचा फायदा घेण्याचें धाडसदेखील अस्पृश्यांना होईना. समाजानें आजवरच्या जुलूमजबरदस्तीनें या लोकांवर जी जरब बसवली होती, त्यामुळें भिऊन कुणी जोतिबांच्या हौदावर पाणी भरावयास येईना. हें पाहून जोतिबांनीं हात धरून कांहीं अस्पृश्यांना आपल्या हौदावर नेलें आणि त्यांना पाणी भरायला लावलें. त्या दिवशीं त्या हौदांतून जेवढ्या घागरी पाणी नेलें असेल त्याहून जास्त आनंदाश्रु महात्मा फुल्यांच्या डोळ्यांमधून ओघळले असतील. केवळ आपल्या हौदावर अस्पृश्यांना पाणी भरूं दिलें म्हणजे अस्पृश्यता सरली असें फुले यांनीं मानलें नाहीं. समाजसुधारणेच्या मार्गावर टप्पे घेत घेत त्यांनीं मजल मारली. प्रथम अस्पृश्यांना शिक्षण देणारी शाळा काढली, मग त्यांना आपल्या हौदावर पाणी भरण्याची परवानगी दिली, आणि १८७३ सालीं त्यांनीं अस्पृश्यता निवारणाचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. त्यामध्यें फुले यांनीं म्हटलें होतें : “ जे अस्पृश्य बंधु परमेश्वरास मानून नीति व स्वच्छतेस अनुसरून वागतील त्यांच्याशीं मी कुटुंबांतील माणसांप्रमाणें वागून अन्नव्यवहार करीन. ” हा जाहीरनामा प्रसिद्ध करण्याचें धाडसदेखील तत्कालीन वृत्तपत्रांना झालें नाहीं. एवढा स्फोटक विचार त्या काळीं जाहीरपणें सांगणारा माणूस पहाडी छातीचा असला पाहिजे यांत शंका नाहीं. ध्येया-साठीं वेडें होणें यापेक्षां वेगळें नसतें. समाजांतील सर्व घटकांना समान हक्क मिळावेत, कुणी उच्च, कुणी नीच असे भेद राहूं नयेत आणि कुणाचीहि पिळवणूक होऊं नये हा फुले यांच्या सर्व खटाटोपाचा केंद्रबिंदु होता. व्यक्ति-

गत सुधारणांचा अंगीकार करून या उद्दिष्टांप्रत आपण सर्व समाजाला नेऊं शकत नाहीं हें त्यांच्या लक्षांत येतांच त्यांनीं सत्यशोधक समाजाची स्थापना केली. या समाजाला फुले यांच्यानंतर जें हिडीस स्वरूप प्राप्त झालें, त्याचा दोष फुले यांचेनंतर या समाजाचें नेतृत्व करणाऱ्या अल्पबुद्ध व हेकट पुढाऱ्यांकडेच जातो. कारण फुले यांनीं ज्या उदात्त ध्येयानें हा पंथ सुरू केला होता तें ध्येय, तो हेतु बाजूला टाकून ब्राह्मणद्वेषावरच यानंतरच्या सर्व पुढाऱ्यांनीं आपलें लक्ष केंद्रित केलें आणि त्या भांडवलावर सरकार-दरबारीं थोडें वजन प्राप्त होतांच 'सत्यशोधक समाजाचें' फुले यांनीं आंखलेलें पवित्र कार्य उधळून देऊन हे पुढारी पसार झाले. फुले यांनीं सत्यशोधक समाजाचीं प्रमुख तत्त्वें अशीं ठरवलीं होतीं :—

( १ ) ईश्वर एक असून तो सर्वव्यापी, निर्गुण, निर्विकार व सत्यस्वरूपाचा आहे व सर्व मनुष्यप्राणी त्याचीं लेंकरें आहेत.

( २ ) ईश्वराची भक्ति करण्याचा प्रत्येक मानवास पूर्ण अधिकार आहे. आईस संतुष्ट करण्यास अगर बापास विनविण्यास जशी त्रयस्थाची, दलालाची जरुरी नसते त्याप्रमाणें सर्वसाक्षी परमेश्वराची भक्ति करण्यास दलालाची आवश्यकता नाहीं.

( ३ ) मनुष्य हा जातीनें श्रेष्ठ ठरत नसून तो गुणानें श्रेष्ठ ठरतो.

( ४ ) कोणताहि ग्रंथ सर्वांशीं प्रमाण व ईश्वरप्रणीत नाहीं.

( ५ ) परमेश्वर सावयवरूपानें अवतार घेत नाहीं.

( ६ ) पुनर्जन्म, कर्मकांड, जप-तप या गोष्टी अज्ञानमूलक आहेत.

फुले यांच्यानंतर सत्यशोधक समाजाच्या मंडळींनीं या महान् तत्त्वांकडे पुन्हां पाहिलें असेल असें निदान आम्हांला तरी वाटत नाहीं. कारण हीं तत्त्वें आचरणें हें येरागबाळ्याचें काम नव्हे. बुद्धिवादी विचारसरणींतून स्फुरलेलीं हीं सहा तत्त्वें पाहिल्यानंतर महात्मा फुले यांच्या मनांतील तळमळीची कल्पना येते. या सत्यधर्माला महाराष्ट्रांत निष्ठावंत, आचारवंत अनुयायी मिळाले असते तर महाराष्ट्रसमाजाची फार सुरेख घडी बसली असती, परंतु महाराष्ट्रांतला समाज हा चांगल्या तत्त्वज्ञानाचें वाटोळें करण्यांत फार पटाईत आहे. जेवढें चांगलें तेवढ्याला बगल देऊन महान् व्यक्तींच्या जीवनांतून

भलता अर्थ काढून दाखवण्याची कला इथें फार फोंफावली आहे. रामदासांच्या तत्त्वज्ञानाचा खेळखंडोबा करणारे रामदासी, तुकाराम–ज्ञानेश्वर–एकनाथांच्या भागवतधर्माचें वाटोळें करणारे माळकरी हे आमच्या या विधानाला पुष्टि देण्यासाठीं पुरेसे आहेत. भागवतधर्माबद्दल फुले यांनीं जे उद्गार काढले आहेत ते यथार्थ आहेत. मराठी माणसांना हतबुद्ध, कर्तृत्वशून्य व दास्यप्रिय बनवण्यास भागवत धर्माचें 'ठेविलें अनंतें तैसेंचि राहावें' हें तत्त्वज्ञान फार मोठ्या प्रमाणांत कारणीभूत झालें आहे. भागवतधर्मांत मूर्तिपूजेचे सर्व प्रकार आहेत. तीर्थयात्रा, मंदिरसंस्था, जपजाप्य, अनुष्ठान, व्रतें, भजन, गुरु व बुवा यांची सेवा इत्यादि धर्माचार भरले आहेत. फुले यांनीं या गोष्टींचा तीव्र निषेध केला. या गोष्टींमुळें धनाचा, श्रमाचा अपव्यय होतो, हें त्यांचें म्हणणें संपूर्ण सत्य आहे. फुले यांचें नांव घेऊन ब्राह्मणब्राह्मणेतर वाद खेळणाऱ्यांनीं, फुल्यांचें नांव घेऊन पंढरपुरला जाणाऱ्या महाराष्ट्राच्या भोळसट शेतकऱ्यांना या वेड्याखुळ्या भक्तीपासून परावृत्त करण्याचें कार्य हातीं घ्यावें. त्यामध्यें बहुजनसमाजाची आणि महात्मा फुले यांची खरी सेवा आहे. महात्मा फुले यांच्या सत्यशोधक समाजाचे खरेखुरे निष्ठावंत प्रचारक आणि अनुयायी आमच्या मतें फार थोडे लोक होऊन गेले. त्यांपैकीं कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील आणि गाडगे महाराज हे प्रमुख होत. या त्रयींनीं बहुजनसमाजाला योग्य दिशा दाखवली, त्या समाजाचा खराखुरा उद्धार करण्यांत भाग घेतला.सत्यशोधक समाजाची ही 'त्रिमुर्ति' म्हटली पाहिजे.

सत्यशोधक समाजाच्या स्थापनेनंतर फुले यांचें कार्य विस्तारलें. त्यांच्या विचारांच्या आणि आचाराच्या प्रभावाचें तेज महाराष्ट्रभर पसरलें. याच काळांत त्यांनीं 'गुलामगिरी' नांवाचा ग्रंथ लिहिला. वाङ्मयीन क्षेत्रांत फुले यांचें नांव चमकलें नाहीं. कारण फुले यांचा तो प्रांतच नव्हता. त्यांच्या आचरणांतूनच वाङ्मयाची निर्मिति होत होती. महाराष्ट्रांतल्या सुप्त शक्तीला जागृत करण्यांत केवढें प्रचंड काव्य होतें, केवढा प्रचंड प्रतिभेचा जोष होता, फुले स्वतः तर तो अनुभवत होतेच, पण त्या काळीं अनेक वर्षें अंधारांत चांचपडणाऱ्या समाजालाहि ही नवी अनुभूति जाणवत होती. लिखाणांतून अथवा वाचनांतून नाहीं, तर प्रत्यक्ष कृतींतून हा आनंद, ही नवी चेतना ते घेत होते, अनुभवत होते. फुले यांचें वाङ्मय त्यांच्या कृतींतून

निर्माण झालें होतें. त्यामुळें ही निर्मिति स्वयंभू देवतेसारखी ओबडधोबड होती, पण हें जागृत दैवत होतें. चिपळूणकरांनीं फुले यांचेवर टीका केली. त्यांच्या लिखाणांतल्या शुद्ध अशुद्धावर ताशेरे झाडले. चिपळूणकर आज कदाचित् हयात असते अथवा कांहीं काळपर्यंत महाराष्ट्राची ही शक्ति नीट पाहून मग लिहिते तर त्यांनीं तसें लिहिलें नसतें. परंतु शास्त्रीबुवांनीं आपली लेखणी फुल्यांविरुद्ध उचलली आणि फुले यांच्या लिखाणाची टिंगलहि केली. फुले यांनाहि चिपळूणकरांच्या लिखाणाचा समाचार घ्यावा लागला. आज आम्ही त्या दोन महान् व्यक्तींकडे जेव्हां पाहतों, तेव्हां मात्र आम्हीं त्यांच्या वादाला महत्त्व देऊन चालणार नाहीं. कारण, काळ पुढें गेला आहे. जें चांगलें आहे तेवढें लक्षांत ठेवून आपण काळाबरोबर आपली गति ठेवायला पाहिजे.

काळ बदलतो आहे हें फुले यांनीं जाणलें होतें म्हणूनच ते अमर पुरुष ठरले. १८७५ मध्यें गुजरातेंत जलप्रलय झाला. तेव्हां गुजरातेंतल्या पूर-पीडित जनतेला साहाय्य म्हणून महात्मा फुले यांनीं सत्यशोधक समाजातर्फे १९५ रुपये मदत पाठवली. त्या काळांत आपल्या शेजारच्या प्रांताबद्दल ही भावना एक मराठी माणूस दाखवतो हें पाहून आजहि आम्हांला अभिमान वाटतो. मराठी माणसाच्या दिलदार मनाचा हा भाग फार पुरातन आहे. सुरत लुटली म्हणून आमच्यावर राग धरणाऱ्या मंडळींना महात्मा फुले यांच्या या मानवतावादी मदतीची आठवण होऊं नये हें दुर्दैव आहे. आमच्या मराठी बांधवांनीदेखील महात्मा फुले यांच्या या कृत्यापासून फार अर्थ घेण्याजोगा आहे. जेथें जेथें दुःख असेल तेथें तेथें आम्हीं सहानुभूतीचा हात दिला पाहिजे, ही आमच्या थोर नेत्यांची शिकवण आहे. तिचा आम्हीं विसर पडूं देतां कामा नये. फुले यांच्या कार्याचा भलता अर्थ काढून त्या काळांत त्यांना जो विरोध झाला त्याचा आजच्या व्यवहारांत, राजकारणांत दाखला देऊन फुले यांचें कार्य चालवतां येणार नाहीं. फुले यांचें कार्य असें भावनाधिष्ठित नव्हतें. तें बुद्धिनिष्ठ होतें. ईश्वराची कल्पना सोडल्यास इतर सर्व बाबतींत ते बुद्धिवादी होते. त्यांना कोणतीहि धर्मसंस्था मान्य नव्हती. विवेकबुद्धि ( conscience ) आणि बुद्धि ( Reason ) यांचें अत्यंत पृथक् अस्तित्वहि त्यांना मान्य नव्हतें. पूजा, जप, तप, नामस्मरण या गोष्टी


निरर्थक-निष्फळ आहेत असें त्यांचें मत होतें. मनुष्यानें या जगांतील जीवनच उत्तम तऱ्हेनें भोगतां येईल असा प्रयत्न करावा. बुद्धि व प्रयत्न हेच माणसाचे खरे साहाय्यकर्ते आहेत असें ते म्हणत. फुले यांच्या लिखाणाचा, विचारांचा आणि आचारांचा अभ्यास केल्यानंतर या माणसाच्या बुद्धिमत्तेचें, सडेतोड विचारांचें व धडाडीच्या आचारांचें कौतुक वाटतें. बहुजन समाजांतल्या लग्नपद्धतींतले दोष घालवण्यासाठीं आणि पुरोहिताची दलाली नष्ट करण्यासाठीं त्यांनीं जी लग्नपद्धति सुरू केली होती तशी पद्धति महाराष्ट्रांतल्या साऱ्या समाजांत रूढ झाल्यास आजहि हवी आहे. चिकित्सक दृष्टि आणि साधेपणा याचा त्या लग्नपद्धतींत संगम झाल्याचें दिसून येतें.

फुले यांचे सर्व विचार पटले म्हणून नव्हे, तर त्यांच्या जीवनांतील पावित्र्य, त्यांच्या कार्याची तळमळ आणि धडाडी पटल्यामुळें महाराष्ट्रानें फुल्यांना 'महात्मा' ही पदवी दिली. फुले यांचे विचार आत्मसात करणें मात्र महाराष्ट्रांतल्या जनतेला जमलें नाहीं असें दुर्दैवानें म्हणावें लागतें. कारण फुले गेले आणि त्यांच्या तत्त्वज्ञानाचा अक्षरशः 'निर्माल्य' झाला.

महात्मा फुले यांची जीवन-ज्योत विझली आणि पुन्हा सारा समाज अंधारांत ठेचकाळूं लागला. शिक्षणाचें महत्त्व ओळखून महाराष्ट्रांतल्या साऱ्या युवकांना ज्ञानाची गंगा पाजण्याची फुले यांना तळमळ होती. हंटर-कमिटीपुढें सक्तीच्या शिक्षणाची जोरदार मागणी करण्यांत त्यांचा हाच उद्देश होता. फुले यांची ही तळमळ भाऊराव पाटलांनीं जाणली. महाराष्ट्रांतल्या बहुजनसमाजाला—बहुजन म्हणजे ब्राह्मणेतर नाहीं—बहुसंख्य समाजाला फुले यांनीं खराखुरा सत्यधर्म शिकविण्याची कोशीस केली. व्हिक्टोरिया राणीच्या मुलासमोर खांद्यावर घोंगडी, नेसूं लंगोटी, डोक्याला मुंडासें असे ते गेले व जमिनीवर बसले आणि तेथें बोलण्याची संधि मिळतांच 'हिंदुस्थानच्या बहुसंख्य जनतेचें हित तुम्हांला करायचें असेल तर त्यांचें अज्ञान घालवा, त्यांना प्राथमिक शिक्षण मोफत द्या' असें बोलले. त्याचप्रमाणें लॉर्ड रे मार्केटची इमारत नवीन बांधण्याचें ठरतांच 'आमचा पैसा असा दगडामातींत घालूं नका, त्याऐवजीं ही रक्कम प्राथमिक शाळांकडे खर्च करा' असा टाहो फुले यांनीं फोडला. हें सारें पाहिल्यानंतर फुले यांच्या हृदयांतली खरी तळमळ स्पष्ट होते. महाराष्ट्रांतली सारी जनता सुबुद्ध व्हावी हाच त्या तळमळीचा खरा

अर्थ होता. फुले यांच्या जीवनाचा हा अर्थ तत्कालीन समाजानें ओळखला नाहीं. उलट, या महात्म्याची उपेक्षाच केली. ब्राह्मणब्राह्मणेतर वादांत आमच्या महाराष्ट्राची केवढी प्रचंड शक्ति वांया गेली आहे. या वादामुळेंच जोतिबां-सारख्या महात्म्याच्या शिकवणीचा खेळखंडोबा झाला आहे. आमच्या घराच्यापासून फर्लांगभर उजव्या हाताला जोतिबांच्या देहाला अग्नि दिला ती मढेघाटाची स्मशानभूमि आहे आणि फर्लांगभर डाव्या बाजूला लोकमान्यांचा गायकवाड वाडा आहे. या दोन महापुरुषांच्या वास्तूंच्यापासून फर्लांगभर दूर असूनहि आमच्या घराच्या भिंतींना स्वतःचा आगळा अभिमान आहे. रात्र होते, सारें विश्व शांत होतें, अशा वेळीं भिंती बोलतात. महात्मा फुल्यांच्या समाधीवरून येणाऱ्या वाऱ्यांमधून त्यांना सुराज्याचा संदेश मिळतो. टिळक-वाड्यावरून येणाऱ्या वाऱ्यांकडून स्वराज्याचा संदेश मिळतो आणि मग स्वराज्य आलें, टिळकांचें स्वप्न सत्य झालें, पण जोतिबांचें सुराज्य कुठें आहे ? ‘ इंग्रजी राज्य आज आहे आणि उद्यां नाहीं. मुख्य प्रश्न सामाजिक गुलामगिरी कशी नष्ट होईल हाच आहे. ’ या त्यांच्या शब्दांची भिंतींना आठवण होते. एक खिन्न सुस्कारा भिंती टाकतात. मलाहि भान राहत नाहीं. मी देखील खिन्न होऊन सुस्कारतों. भिंती चूप होतात. आज सारा महाराष्ट्र जसा चूप आहे तशा. निर्जीव भिंतीदेखील टिळक, फुले यांच्या जीवनाचा खरा अर्थ सांगतात, पण आपण माणसें आपल्या हृदयांत महात्मा फुले, लोकमान्य टिळक आहेत असें आपण म्हणतों, अजून आपणाला त्यांच्या जीवनाचा अर्थ कळूं नये ? मानवी स्वातंत्र्याचें आणि समानतेचें दिव्य युग निर्माण करण्या-साठीं जोतिबा जीवन जगले आणि मेले. अज्ञानाच्या मोहनिद्रेंत गाढ झोपलेल्या जनतेला त्यांनीं जागें करण्याचा प्रयत्न केला. आज स्वराज्य आलें आहे. आम्ही जागे आहोंत, पण जीवन जाळून प्रकाश दाखवणारी ज्योति मात्र आज नाहीं——

* * *



# स्मृति जाळणारा स्मृतिकार

स्मृतिकार मनूला स्वर्गांत चैन पडेना. फारफार वर्षें होऊन गेलीं. जी स्मृति आपण सांगितली, तिचें पालन मानव करीत आहेत का नाहीं, अशी त्याला रुखरुख वाटूं लागली. पुन्हां एकवार मानवलोकीं जावें म्हणून तो तळमळूं लागला. पण मनु मुक्तात्मा होता. जन्ममरणाच्या या रहाटगाडग्यांतून वाहणारें तें जीवन नव्हतें. पुन्हां जन्म, पुन्हां पुन्हां जन्म मनूच्या नशिबीं नव्हता. तरीसुद्धां मनूला पुन्हां मानवलोकीं येण्याची इच्छा झाली. तो परमेश्वराकडे गेला आणि त्यानें आपली इच्छा परमेश्वराला ऐकवली. परमेश्वरालादेखील हें ऐकून आश्चर्य वाटलें. त्यानें मनूला समजावलें, स्वर्ग सोडून मानवलोकीं न जाण्याचा सल्ला दिला, पण मनु ऐकेना. शेवटीं त्याला आपल्या निश्चयापासून परावृत्त करण्यासाठीं ज्या भूमींत मनु पूर्वीं जन्मला होता, त्या भूमीचें दर्शन 'दिव्यचक्षूंद्वारें' मनूला घडवण्याचें परमेश्वरानें ठरवलें. परमेश्वर म्हणाला, 'पुनर्जन्म घेण्याआधीं जिथें तूं एकदां जन्म घेतला होतास त्या भूमीचें दर्शन घे.' मनु पाहूं लागला. कुठें होता मनूचा 'आर्यावर्त!' आपली 'स्मृति' सांगतांना धर्मशास्त्राची क्षेत्रमर्यादा म्हणून पूर्व समुद्रापासून पश्चिम समुद्रापर्यंत हिमालय व विंध्य यांतील 'आर्यावर्त' या नांवाच्या प्रदेशाचीच मनूनें कल्पना केली होती. पण मनु पाहात असलेली भूमि ही हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत पसरली होती. "मधला विंध्य ओलांडून आर्य कधींच खालीं उतरलेले दिसतात" मनु मनाशींच म्हणाला. एवढ्या मोठ्या भागांतले, एवढे असंख्य लोक आपली 'स्मृति' पाळतात म्हणून मनु थोडासा आनंदला. परमेश्वरानें हें जाणून दिव्यचक्षूंची शक्ति आणखी वाढवली. भारतांतलीं 'माणसें' अगदीं जवळून मनु पाहूं लागला आणि तो दचकला. स्मृतीमध्यें त्यानें सांगितलेल्या धर्माच्या व्याख्येची त्याला आठवण झाली.

मा. ...४

वेदः स्मृतिः सदाचारः स्वस्य च प्रियमात्मनः ।
एतच्चतुर्विधं प्राहुः साक्षाद्धर्मस्य लक्षणम् ॥

‘ श्रुति, स्मृतिग्रंथ, रूढाचार, स्वतःच्या सद्सद्विवेकबुद्धीला प्रिय व हितकर वाटत असलेली गोष्ट हा धर्माचा चतुर्विध पाया आहे ’ असें मनूनें म्हटलें होतें. मनूनें ‘ मानव ’ धर्मशास्त्र ज्यांच्यासाठीं लिहिलें त्या त्रैवर्णिकांनीं या व्याख्येचा चलाखीनें उपयोग केला होता. वेदांचा, स्मृतिग्रंथांचा, त्यांच्या बुद्धीला प्रिय व हितकर वाटत असलेलाच अर्थ लावून आधींच कनिष्ठ, हीन लेखिलेल्या, उपनयनसंस्काराचे अधिकार न दिलेल्या शूद्रांना त्यांनीं ‘सळो कीं पळो’ करून सोडलें होतें. मनूला त्यांचे हाल बघवेनात. चातुर्वर्ण्याच्या चौकटींत हिंदुधर्माची बैठक नीट बसेल अशी त्याची कल्पना होती. चौकटीला चार बाजू असतात. दोन आडव्या दोन उभ्या. चारींचेंहि महत्त्व सारखेंच असतें. कारण, त्या असतात म्हणूनच ती ‘ चौकट ’ होऊं शकते. मनूनें वर्णाश्रमाची ही चौकट केली. याहून पांचवी बाजू नाहीं असेंहि त्यानें आग्रहानें सांगितलें. पण या चारी बाजू सारख्याच महत्त्वाच्या असूनहि त्यांतल्या तीन बाजूंना एक न्याय व चवथीला एक न्याय देण्याची चूक त्यानें करून ठेवली.

ब्राह्मणः क्षत्रियो वैश्यस्त्रयो वर्णा द्विजातयः।
चतुर्थ एकजातिस्तु शूद्रो, नास्ति तु पंचमः ॥

या चुकीचें भयंकर स्वरूप पाहून मनूचे डोळे पाणावले. ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य ह्या तीन द्विज वर्णांनीं एकजातीय शूद्र वर्णावर चालवलेल्या ‘ शास्त्रोक्त अन्यायाचे ’ वाभाडे काढण्याचा निश्चय मनाशीं करून मनूनें डोळ्यांतले अश्रु पुसले आणि तो परमेश्वराला म्हणाला, ‘ भगवान् पुरें झालें हें दर्शन. बघवत नाहीं हा अन्याय. माझ्या स्मृतीचें नांव घेऊन होणारा हा अत्याचार सहन होत नाहीं मला ! ’

‘ आतां तरी पुनर्जन्माची इच्छा उरली नाहीं ना ? ’ परमेश्वरानें मिस्किलपणें विचारलें आणि मनूनें जें उत्तर दिलें तें ऐकून परमेश्वरालाहि धक्का बसला. मनु म्हणाला, ‘ नाहीं भगवान्, आतां पुनर्जन्माची जास्तच जरूरी वाटत आहे. मात्र आतां जो जन्म हवा आहे तो पूर्वीसारखा ब्राह्मणाचे पोटीं नको. आतां मला ‘ द्विज वर्णांत ’ जन्म नको. आतां मला शूद्र वर्णांत जन्म घ्यायचा

आहे. मीच त्यांना अध्ययनाचा, माणूस म्हणून ज्ञानानें जगण्याचा अधिकार दिला नाहीं. मला त्याचें प्रायश्चित्त घ्यायलाच पाहिजे. मीं जी स्मृति सांगितली, ती जाळून टाकण्यासाठीं आणि पुन्हां नवी स्मृति सांगण्यासाठीं मला पुन्हां जन्म घेऊं द्या.'

मनूच्या बोलण्यानें भगवान् आश्चर्यचकित झाले, तसेंच त्याची तळमळ पाहून सद्गदितहि झाले. त्यांना मनूचें मन मोडवेना. त्यांनीं विचारलें, 'कुठें घेतोस आतांचा जन्म? धर्मक्षेत्र काशींत, का प्रयाग तीर्थावर, का हिमालयाच्या पवित्र कुशींत?' परंतु पूर्वीच्या आर्यावर्तांत जन्म घ्यायचें मनूनें नाकारलें. नको त्या भूमींत पुन्हां पाय ठेवायला अशी तीव्र तिडीक मनूच्या काळजांत भरली होती. मनूनें भारताकडे बऱ्याच सूक्ष्म दृष्टीनें न्याहाळल्यानंतर समाधानानें एका भूमीकडे बोट दाखवून परमेश्वराला खुणावलें.

माझा महाराष्ट्र होता तो. आपल्या नव्या प्रयोगासाठीं माझ्या महाराष्ट्रांत जन्म घेण्याची मनूनें इच्छा दर्शविली होती. परमेश्वरानें 'तथास्तु' म्हटलें. पावसाच्या सरीवर बसून मनूचा आत्मा मानवलोकीं आला. मानवलोकीं येतांना आपल्या पूर्वजन्मींच्या साऱ्या 'स्मृति' तो विसरला होता. नव्या स्मृतिकाराला स्मृतीची निर्मिति करण्यासाठीं नवे नवे अनुभव घ्यायचे होते. नवें जीवन जगायचें होतें. मनूचा आत्मा या अनुभवांसाठीं, या नव्या जीवनासाठीं महाराष्ट्रांत अवतरला होता. मढू या गांवीं राहणाऱ्या रामजी सकपाळ या सेवानिवृत्त लष्करी सुभेदाराच्या चौदाव्या अपत्याच्या देहांत मनूच्या आत्म्यानें प्रवेश केला होता आणि या नव्या मनूचें नांव होतें 'भीम'.

भीमराव रामजी (सकपाळ) आंबेडकर यांच्याविषयीं आम्हांला काय वाटतें त्याचें चित्रण आम्हीं मनु आणि परमेश्वराच्या प्रारंभींच्या कथेमध्यें केलें आहे. आमची अशी प्रामाणिक समजूत आहे कीं, स्मृतिकार मनूच बाबासाहेबांच्या रूपानें पुन्हां येथें अवतरला होता. मनुस्मृति नुसती जाळून जर बाबासाहेब थांबते तर ते मनूचा अवतार होते असें आम्हीं म्हटलें नसतें. कारण, आगलावेपणा अवघड नसतो. तीन दमडीच्या काडेपेटींत साठ काड्या भरलेल्या असतात आणि दीडदमडीचा माणूसदेखील त्या काड्यांचे साहाय्यानें किमान पन्नास वेळां मनुस्मृतीची होळी करूं शकेल. स्मृति जाळणें हें काम

मुळींच अवघड नाहीं. परंतु जुन्या स्मृतींतले दोष नसलेली आणि समानतेच्या तत्त्वावर सर्वांना योग्य, न्याय्य वागणूक देणारी स्मृति निर्माण करणं हें काम महा कठीण, अतिदुर्लभ आहे. आंबेडकरांनीं स्मृतीची होळी केली तशीच नवी स्मृति सांगून आपल्या अलौकिक ज्ञानाची साक्षात् ज्योतहि तेवत ठेवली. त्यांच्या या अलौकिकत्वाकडे पाहूनच त्यांना 'आधुनिक मनु' या नांवानें ओळखलें जातें. बाबासाहेबांनीं तयार केलेली 'स्मृति' तथा 'हिंदुकोड' आमच्या समाजांतल्या शेळपटांना पचलें नाहीं ही गोष्ट वेगळी. वाघिणीचें दूध काढणारे व तें पचवणारे जे थोडे पुरुष असतात, त्यांत बाबासाहेबांची गणना होते. ज्यांना शेळीचेंच दूध पचतें वा तेंहि पचत नाहीं, अशांना बाबासाहेबांनीं हिंदुकोड बिलांत सुचविलेल्या अनेक गोष्टी पचवणें अवघड होईल यांत विशेष नवल नाहीं.

बाबासाहेब जन्मानें हिंदु महार, नव्हे महार हिंदु होते. असें म्हणण्यांत फार मोठा अर्थ आहे. फार दुःखद, फार वेदनामय इतिहास आहे असेंच म्हणाना. बाबासाहेब हे हिंदु आहेत हें प्रथम लक्षांत घेण्याला हिंदु समाज तयार नव्हता. ते महार आहेत हें मात्र समाजानें आपल्या मनांत पक्कें ठसवलें होतें. म्हणूनच विद्वत्तेचें तेज असलेल्या ह्या प्रतिबृहस्पतीला देखील अस्पृश्य मानण्यांत धन्यता मानणारी मंडळी त्या काळीं होती. लहानपणींच्या 'भीमा'ला जें सोसावें लागलें तें बाजूला ठेवून, मोठेपणीं बडोद्याचे अर्थमंत्री, लष्करी चिटणीस म्हणून काम करीत असलेल्या भीमरावांना जी वागणूक मिळाली ती पाहिल्यानंतर आमच्या समाजांतील नीचपणाचा, मूर्खपणाचा आत्यंतिक संताप आल्याशिवाय रहाणार नाहीं.

आमच्या भाषेंत फार सुंदर सुंदर वचनें आहेत. आमच्या मुलांच्या कानावर तीं सतत पडावींत अथवा डोळ्यांना दिसावींत म्हणून आमच्या घरांतल्या तुळयां-वरून तीं वचनें अनेक साल लिहून ठेवण्याचा (अति) शहाणपणा घरांतलीं वडील माणसें करीत असतात. कुठें लिहिलें असतें : 'विद्वान् सर्वत्र पूज्यते,' 'चिखलांत देखील कमळें उगवतात' किंवा 'दैवायत्तं कुले जन्म मदायत्तं तु पौरुषम्।' वगैरे. परंतु आमच्या घरांच्या तुळयांवर स्वार झालेले हे 'सुविचार' ज्याप्रमाणें आमच्या वाडवडिलांच्या मेंदूपर्यंत पोंहचूं शकले नाहींत, तसेच त्यांच्या मुलांबाळांचे मेंदूपर्यंतहि पोंहचूं शकले नाहींत. ज्ञानर्षि बाबासाहेबांशीं, त्यांच्या पायपोसाशीं उभें राहण्याच्या लायकीचेंहि ज्ञान

प्राप्त न झालेला ब्राह्मण कारकून, ते महार आहेत म्हणून चार हात दूर उभा राहून ताठ्यानें बोलत असे. हाताखालच्या, चपराशांतली 'शी' कशी काढायची याची अक्कल नसलेला चपराशी, आंबेडकर महार आहेत तेव्हां त्यांचा स्पर्श होऊं नये म्हणून चार हातावरून फाईल, त्यांच्या अंगावर फेकायचा. हें सहन करणें कुणाहि माणसाच्या सहनशक्तीच्या पलीकडचें काम होतें. बाबासाहेब एकांतीं बसून अश्रु ढाळत. आपल्याला नव्हे आपल्या ज्ञानाला जी अवहेलना प्राप्त होत आहे, ती पाहून तळमळत. माणूस कदाचित् अस्पृश्य असूं शकेल, पण ज्ञान कां कधीं अस्पृश्य असतें ? विद्येशीं का कुणीं असलें तुटक वर्तन ठेवतें ! आपण एवढे शिकलों, एवढी तपश्चर्या केली त्याची एखाद्या फडतूस माणसानें अशी वासलात लावावी ही वेदना बाबांच्या हृदयांत सलूं लागली. महार जातींत जन्मल्यामुळें भोगाव्या लागणाऱ्या यातना त्यांनीं पुरेपूर भोगल्या होत्या. त्यामुळें त्यांतून सुटका करून घेण्याचा मार्ग साऱ्या आयुष्यभर ते शोधत होते. ज्ञानाची कास धरून ब्राह्मणांच्या ज्ञानीपणाचा नक्षा उतरवला कीं, आपली या यातनांतून सुटका होईल, अशी आशा त्यांना वाटली म्हणून स्वतःवर होणाऱ्या अन्यायाचा, अपमानाचा सूड ते निरनिराळ्या ज्ञानशाखांवर उगवूं लागले. अर्थशास्त्राचे ते गाढे पंडित बनलेच. खेरीज मानववंशशास्त्राचाहि त्यांनीं कीस काढला. ते बॅरिस्टर झाले. डॉक्टर ऑफ सायन्स ही बहुमानाची पदवीहि लंडनला त्यांनीं मिळवली. परंतु एवढी विद्वत्ता संपादन केल्यानंतरहि त्यांना समाजाकडून अपमान, अवहेलना याखेरीज कांहींहि मिळालें नाहीं. त्यावेळीं बाबासाहेबांमधला समाजापासून दूर राहून आपला उत्कर्ष साधण्यासाठीं झटणारा संयमी 'भीम' संपला आणि समाजाचे कपाळांत गदा घालून त्याला ताळ्यावर आणूं पाहणारा प्रतापी 'भीम' आपलें कार्य करूं लागला.

मुंबईतल्या अस्पृश्य समाजांत एक दिवस खालील पत्रक वाटलें गेलें—

वि. वि. अस्पृश्य वर्गाच्या सामाजिक व राजकीय अडचणी सरकारपुढें मांडण्यासाठीं एक मध्यवर्ती मंडळ असावें अशी सूचना अनेक लोकांकडून येत आहे. त्या सूचनेचा योग्य विचार करून तशा प्रकारचें मंडळ स्थापन करण्यांत यावें कीं न यावें याचा सांगोपांग विचार करण्यासाठीं कांहीं प्रमुख मंडळीस बोलावण्याचें योजिलें आहे. सदरहु प्रसंगीं होणाऱ्या विचार-

विनिमयांत भाग घेऊन पुढील कार्याचा मार्ग आंखण्यास्तव ता. ९ मार्च १९२४ रोजीं संध्याकाळीं ४ वा. दामोदर ठाकरसी हॉल, परळ, मुंबई येथें हजर राहण्यास आपणांस विनंति करण्यांत येत आहे. येतेवेळीं आपल्या मित्रमंडळीस बरोबर घेऊन येण्याची कृपा करावी.

आपला नम्र सेवक

**भीमराव रामजी आंबेडकर**

बाबासाहेबांच्या राजकीय, सामाजिक जीवनाची सुरुवात या पत्रकान्वयें झाली. याच बैठकींतून पुढें २० जुलै १९२४ रोजीं बहिष्कृत हितकारिणी सभा नांवाच्या अस्पृश्योद्धार करण्याचें उद्दिष्ट असलेल्या संस्थेची स्थापना झाली. येथून पुढें 'आंबेडकर' हिंदु धर्मावर रोखलेली बंदूक किंवा हिंदुधर्मावर टांगलेली तरवार म्हणून ओळखले जाऊं लागले. स्पृश्य समाजाकडून छळला जाणारा अस्पृश्य समाज, आपल्यांतल्या एका माणसाचें हें तेज पाहून अक्षरशः दिपून गेला. अस्पृश्यता निवारणासाठीं यापूर्वीं कुणी प्रयत्न केले नव्हते असें नाहीं. 'अस्पृश्यता ही मनुष्य-निर्मित आहे देव-निर्मित नाहीं' अशा अर्थाचे शास्त्राधार दाखवून लोकांत जागृति करण्यासाठीं घरादारावर तुळशीपत्र ठेवून महाराष्ट्रभर भटकणारे **गोपाळ बाबा वलंगकर** हे तर अस्पृश्यांचे पहिले पुढारी म्हणायला पाहिजेत. पुण्याचे **शिवराम जानबा कांबळे** किंवा १९०४ सालीं अस्पृश्यांच्या सेवेची मुहूर्तमेढ रोवणारे कर्मवीर **विठ्ठल रामजी शिंदे** वगैरेंनीं अस्पृश्यता-निवारणार्थ कार्य केलेंच होतें. परंतु आपल्या ज्ञानाचे तेजानें तळपणारे आंबेडकर या सर्वांपेक्षां वेगळे होते. यापूर्वींच्या अस्पृश्योद्धारकांच्या शब्दांत विनवणी, दया, कृपा, मदत यांचें प्राबल्य होतें. डॉ. आंबेडकरांना ही भूमिका मान्य नव्हती. त्यांनीं स्पृश्य समाजाकडून भरपूर छळ सोसला होता. उच्चवर्णीयांकडून सहानुभूतीचा लवलेशहि त्यांना मिळाला नव्हता. म्हणूनच मदत, कृपा, दया यांवर विसंबून हृदयपरिवर्तनाची वाट पाहत बसणें त्यांना मंजूर नव्हतें. इतरांप्रमाणेंच मान ताठ ठेवून जगणें हा अस्पृश्यांचा हक्क आहे, तो त्यांना मिळालाच पाहिजे असा त्यांचा दावा होता. म्हणून त्यांनीं अस्पृश्य समाजाला आपल्या न्याय्य हक्काची जाणीव करून दिली. तुम्ही कुणाच्या कृपेवर जगत नसून जगणें, मानानें जगणें

हा तुमचा हक्क आहे, हें त्यांनीं अस्पृश्यांना पटवून दिलें; आणि हें पटतांच अस्पृश्य समाजाची इतक्या दिवस दबून राहिलेली प्रचंड शक्ति उफाळून वर आली. हा प्रचंड जोश पाहिल्यानंतर स्पृश्य हिंदूंच्या छातींत धडकीच भरली. त्यांतच आंबेडकरांनीं आपल्या ज्वलंत भाषणांनी स्पृश्य समाजाला असे कांहीं धक्के दिले कीं, इतक्या दिवसांचा स्पृश्य समाजाचा ताठा, दिमाख, डौल पार कोलमडून पडला. आंबेडकरांनीं स्पष्टपणें जाहीर केलें कीं, 'ज्या वेळीं माझ्यापुढें राष्ट्रहित कीं माझें स्वहित, असा प्रश्न उद्भवेल त्या वेळीं मी माझ्या स्वहितापेक्षां राष्ट्रहिताला अधिक महत्त्व देऊन राष्ट्रहितासाठीं माझें कांहींहि अहित झालें तरी तें आनंदानें पाहीन. परंतु ज्या वेळीं ज्या पददलित जातींत मी जन्मास आलों आहें, अशा जातीच्या हिताशीं राष्ट्रहिताची तुलना करण्याची वेळ येईल त्या वेळीं मी राष्ट्रहितापेक्षां सर्वांनीं लाथेखालीं तुडविलेल्या माझ्या समाजाच्या हिताला अधिक महत्त्व देईन आणि माझ्या शरीरांत रक्ताचा शेवटचा थेंब असेपर्यंत माझ्या समाजाच्या हितासाठींच झगडेन.'

आंबेडकरांनी हें स्पष्टपणें सांगतांच स्वातंत्र्याच्या चळवळीचें वारें वाहणाऱ्या त्या काळांत काय प्रचंड हलकल्लोळ उडाला असेल, याची कल्पनाच करतां येणार नाहीं. आंबेडकरांच्या या घोषणेचा अर्थ, वेळप्रसंगीं ते राष्ट्राशीं द्रोह करणार असा केला गेला आणि आंबेडकर ही व्यक्ति व अस्पृश्य समाज साऱ्या राजकारणी लोकांच्या टीकेचें आणि उपहासाचें लक्ष्य बनलें. परंतु आंबेडकरांच्या जीवनाकडे आज ज्यावेळीं आपण बघतों व त्याचें मूल्यमापन करतों, त्यावेळीं आपणाला मोठ्या अभिमानानें असें म्हणावें लागतें कीं, अस्पृश्य समाजाच्या कल्याणासाठीं अगतिक होऊन आंबेडकरांनीं कांहींहि घोषणा केल्या असल्या तरी या राष्ट्राच्या हिताची आणि या राष्ट्राच्या उत्कर्षाची त्यांना दुसऱ्या कुणाहि देशभक्ताइतकीच वा त्याहून जास्तच चिंता व काळजी होती. भारताची घटना निर्माण करण्यासाठीं आंबेडकरांनीं आपल्या बुद्धीचा आणि अनुभवाचा पुरेपूर वापर केला आणि भारताची घटना निर्दोष, आदर्श व्हावी यासाठीं कष्ट घेतले. भारताची घटना हें आंबेडकरांच्या राष्ट्रभक्तीचेंच चिरंजीव स्मारक आहे.

अस्पृश्य समाजाची चातुर्वर्ण्याच्या जुलमी जोखडांतून आणि त्याहून नतद्दष्ट अशा रूढींच्या जोखडांतून मुक्तता व्हावी म्हणून अनेक लढाऊ कार्यक्रम

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम ........................ दि: ..................
क्रमांक ........................ नों. दि: ......

बाबासाहेबांनीं आंखले. १९२७ सालीं महाड येथें केलेला चवदार तळ्याचा सत्याग्रह, मंदिरांत प्रवेश मिळावा म्हणून नाशिकला केलेला काळाराम मंदिराचा सत्याग्रह हे दोन लढे महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनांतले दोन ज्वालामुखी ठरले, असें म्हणायला हरकत नाहीं. या लढ्यानंतर गांवोगांवीं हरिजन वस्त्या जाळून, हरिजनांना मारहाण करून स्पृश्य समाजानें आपल्या पराभवावर शिक्कामोर्तब केलें, आणि आत्मक्लेश सहन करून हरिजनांनीं आपल्या सामर्थ्याला आणखी तेज प्राप्त करून दिलें. या लढ्यांमुळें अस्पृश्य वर्गांत जागृति निर्माण झाली तरी त्यांचा आर्थिक, राजकीय, सामाजिक असा कांहींच फायदा झाला नाहीं. त्यामुळें बाबासाहेबांनीं पुढें ह्या प्रकारचे लढे दिले नाहींत.

आंबेडकरांनीं हिंदुधर्मावर हल्ले केले. धर्मान्तर करण्याची घोषणाहि केली. त्यामुळें आंबेडकरांवर सारेजण नाराज होते. परंतु आंबेडकरांचा लढा हा हिंदुधर्माची, हिंदु समाजाची सुधारणा व्हावी यासाठींच होता. दुर्दैवानें हें समाजाच्या लक्ष्यांत आलें नाहीं. त्यामुळेंच आंबेडकरांच्या धर्म व समाज यांच्या सुधारणा चळवळीचा शेवट सहा कोटी हरिजनांच्या बौद्धधर्म स्वीकारामध्यें झाला. समाजसुधारक म्हणून आगरकर, लोकहितवादी यांचें जसें स्थान आहे, तसेंच आंबेडकर यांचें देखील आहे. महाराष्ट्रांत फुले, आगरकर, आंबेडकर हे तीन जातींतले तीन थोर समाजसुधारक झाले. पैकीं आगरकरांचें स्थान पहिलें. आंबेडकरांचें दुसरें व फुल्यांचें तिसरें असें आम्ही मानतों.

हें मानण्यासाठीं आमच्याजवळ सबळ कारण आहे. आगरकरांनीं ब्राह्मण असून ब्राह्मण समाजावर हल्ले केले. आंबेडकरांनीं ब्राह्मणांवर हल्ले केले नाहींत असें नाहीं, परंतु ज्या समाजांत ते जन्मले त्या समाजांतल्या दुष्ट रुढींवरदेखील त्यांनीं हल्ले केले. फुल्यांनीं मात्र मराठा, माळी समाजांतल्या चुकींवर कोरडे ओढले नाहींत. ब्राह्मण समाजांतल्या चुकांवर त्यांनीं जशी आग पाखडली तशीच आपल्या समाजावर ते पाखडते तर त्यांच्या समाजाची सुधारणा लवकर होती. कारण, समाजांतल्या माणसालाच समाजांतलें चांगलें वाईट नीट कळूं शकतें. जोडा वापरणाऱ्यालाच तो कुठें खुपतो तें नीट समजतें. ब्राह्मण समाजावर कोरडे ओढणारे आगरकर ब्राह्मण होते म्हणून त्या समाजाची सुधारणा लवकर झाली. फुले यांच्या टीकास्त्रानें देखील ब्राह्मणांचा

दिमाख, नक्षा उतरला हें सत्य आहे. पण समाजाची सुधारणा होण्यासाठीं त्या समाजांतलाच सुधारक निर्माण व्हावा लागतो. आंबेडकरांनींहि हें जाणलें होतें, म्हणूनच १९२६-२७ सालीं जेधे–जवळकरांनीं, आंबेडकरांना 'ब्राह्मणांना थारा देऊं नका' अशी सूचना करतांच आंबेडकरांनीं 'माझा लढा ब्राह्मणांविरुद्ध नाहीं, तो ब्राह्मण्याच्या कल्पनेविरुद्ध आहे' असें रोखठोक उत्तर त्यांना दिलें होतें.

आंबेडकरांची चळवळ ही केवळ भावनेवर अधिष्ठित नव्हती हें सिद्ध करण्यास हा पुरावा पुरेसा आहे. अनेक वर्षांच्या सूक्ष्म निरीक्षणानंतर व अभ्यासपूर्ण समाजपरीक्षणानंतर भरभक्कम बुद्धिवादाच्या अधिष्ठानावर आपल्या समाजाला उन्नतीप्रत नेण्यासाठीं आंबेडकर सिद्ध झाले होते. आपल्या समाजांतल्या स्त्रियांना त्यांनीं जो उपदेश केला तो पाहिल्यानंतर विरोधाबरोबर स्वसमाजाच्या विकासाकडेहि त्यांनीं लक्ष पुरविल्याचें ध्यानांत येतें. बाबासाहेबांनीं हरिजन स्त्रियांना सांगितलें होतें : 'तुम्ही स्वतःला कधींहि अस्पृश्य मानूं नका. तुमचें जीवन स्वच्छ ठेवा. स्पृश्य स्त्रियांप्रमाणें स्वच्छ राहा व स्वच्छ कपडे घाला. आपण गरीब आहोंत, आपले कपडे फाटके असले तरी चालतील, पण ते धुवून स्वच्छ ठेवा. तुम्ही स्वतः शिका आणि आपल्या मुलांना शिक्षण द्या.' आंबेडकरांना दलितसमाज देव कां मानतो, हें कोडें न उलगडणारे अनेक विद्वान अजूनहि हयात आहेत. परंतु आंबेडकरांना, त्या समाजानें 'देव कां मानूं नये' या प्रश्नाला रास्त उत्तर देणारा एखादा विद्वान मात्र अजून आम्हांला भेटलेला नाहीं.

राजकीय जीवनांत आंबेडकरांना महात्मा गांधींसारख्या असामान्य प्रतिस्पर्ध्याला तोंड द्यावें लागलें. आगरकरांविरुद्ध टिळकांसारखा असामान्य राजकारणी उभा राहतांच आगरकरांच्या कर्तृत्वाला जसें दुप्पट तेज चढलें तसेंच गांधींशीं विरोध करतांना आंबेडकरांचें झालें. राजकारणी माणसें जास्त धूर्त असतात. समाजकारणी पुरुषांमध्यें तेवढा धूर्तपणा असूं शकत नाहीं. त्यामुळें नेहमींच राजकीय पुरुषांचें जेवढें स्तोम होतें, तेवढें समाजपुरुषांचें होऊं शकत नाहीं. आंबेडकरांनीं गांधींना तोंड दिलें. कारण, बहुसंख्य दलित समाजाची शक्ति त्यांचे पाठीशीं उभी होती. आगरकर मात्र एकाकी होते. आंबेडकरांचे पाठीशीं जेवढा समाज होता, तेवढा आगरकरांचे पाठीशी

उभा असता तर महाराष्ट्रांतलें आजचें घाणेरडें, रोगट समाजजीवन आपणांस दिसूंच शकलें नसतें. आंबेडकरांचें राजकीय जीवनांत अपयश फार प्रामुख्यानें दिसतें. परंतु आंबेडकरांनीं जी झुंज दिली, ती अविस्मरणीय आहे हें निश्चित. आपल्या समाजाचें हित व्हावें म्हणूनच कॉंग्रेसचा व गांधींचा विरोध करण्याचें त्यांनीं ठरवलें. गांधी व कॉंग्रेस यांच्यावर आंबेडकरांनीं अक्षरशः आग ओतली. आंबेडकर हे स्वातंत्र्याचे दुष्मन आहेत, त्यांना पाकिस्तानाप्रमाणें वेगळें राष्ट्र हवें आहे, अशा तऱ्हेचा वारेमाप प्रचार गांधीजींच्या कॉंग्रेस भगतांनीं सर्वत्र सुरू केला आणि आंबेडकर व अस्पृश्य समाज यांना ठेचण्याचीच आघाडी उघडली. परंतु या प्रचाराचा परिणाम अस्पृश्य समाजाची प्रखर, एकसंघ, भरभक्कम संघटनाच होण्यांत झाला. आंबेडकरांवर आत्यंतिक विश्वास ठेवून त्यांचेसाठीं घरादारांवर निखारे ठेवणारे लाखों अस्पृश्य युवक तयार झाले. गांधीची हरिजन चळवळ ही 'आहे' एवढें दर्शविण्यासाठींच कांहीं थोडी-फार मंडळी कॉंग्रेसमध्यें उरली. बाकी सारा दलितवर्ग 'शेड्यूल्ड कास्टस् फेडरेशन' च्या निशाणाखालीं जमा झाला.

कॉंग्रेसविरोधाच्या व हिंदुधर्माबद्दलच्या तिरस्काराच्या या भांडवलाचा वापर करण्याचा मोह होऊन एकदां आंबेडकरांना साऱ्या अस्पृश्यांसह मुसल-मान होण्याची विनंतीहि एका प्रमुख लीगवाल्यानें केली होती. परंतु बाबासाहेबांना हिंदुधर्मावर सूड घ्यायचा नव्हता. हिंदु समाजाचा छळ करायचा नव्हता. बाबासाहेबांनीं त्या विनंतीचा अव्हेर केला. ते म्हणाले, 'मी आणि माझे अनुयायी मुसलमान झालों असतों तर कोट्यवधि रुपये आमच्या समाजाच्या पायांवर ओतले गेले असते ! माझ्या मनांत तसा सूड आणि द्वेष असता तर पांच वर्षांच्या आंत मी या देशाचें वाटोळें करूं शकलों असतों, पण ह्या देशाच्या इतिहासांत विध्वंसक म्हणून स्वतःच्या नांवाची नोंद करून घेण्याची मला मुळींच इच्छा नाहीं !' एवढा विवेक, एवढा संयम, हिंदुधर्माबद्दलची एवढी आपुलकी यापूर्वीं कुणाजवळ आम्हांला दिसली नाहीं. हिंदुधर्मावर एवढे उपकार यापूर्वीं छत्रपती शिवाजी महाराजांखेरीज कुणीहि करून ठेवलेले नाहींत. बाबासाहेबांसारखें विवेकी नेतृत्व अस्पृश्य समाजाला फाळणीचे वेळीं नसतें तर या देशावर फार मोठा भयंकर प्रसंग ओढवता. शिवाजी महाराजांनीं हिंदवी स्वराज्याची स्थापना करून हिंदुधर्मावर अनंत उपकार

करून ठेवले. महाराष्ट्राची हिंदुधर्माला दिलेली ती पाहिली देणगी आणि बाबासाहेब ही दुसरी देणगी होय.

बाबासाहेबांनीं बौद्धधर्म आपल्या अनुयायांसह स्वीकारला तरीहि आमचें हें मत कायम आहे. कारण, धर्मान्तर करण्यांत बाबासाहेबांचा जो हेतु होता व आहे त्याची आम्हांला पूर्ण जाणीव आहे. १९५६ मध्यें धर्मान्तर केलें त्याच्या फार पूर्वी, म्हणजे १९३५ सालीं बाबासाहेबांनीं धर्मान्तर करण्याचा निश्चय केला होता व १९३६ मध्यें धर्मान्तर करण्यामागची आपली भूमिका स्पष्ट करतांना त्यांनीं जे उद्‌गार काढले होते, त्यांचें मनन केल्यानंतर बाबासाहेबांचें हें धर्मान्तर केवळ 'स्टंट' नसून या धर्मांतरामागें फार मोठा अर्थ आहे हें लक्षांत येतें. बाबासाहेबांनीं त्यावेळीं असें लिहिलें आहे "मी माझा निश्चय करून टाकलेला आहे. मी धर्मान्तर करणार आहें. माझें धर्मान्तर कोणत्याहि ऐहिक लाभाकरतां नाहीं. अशी कोणतीहि गोष्ट नाहीं कीं, अस्पृश्य राहून मला ती प्राप्त करून घेतां येणार नाहीं. माझ्या धर्मांतराच्या मुळाशीं आध्यात्मिक भावनेशिवाय दुसरी कसलीहि भावना नाहीं. हिंदुधर्म माझ्या बुद्धीला पटूं शकत नाही, हिंदुधर्म माझ्या स्वाभिमानाला रुचूं शकत नाहीं. हिंदूंनीं माझ्यापुढें प्रत्यक्ष परमेश्वर आणून उभा केला तरी मी हिंदुधर्मांतून जाणार...."

आणि या उद्‌गारानंतर २० वर्षांच्या अखंड चिंतनानंतर १४ ऑक्टोबर १९५६ रोजीं नागपुरास बाबासाहेबांनीं हजारों अनुयायांसह बौद्धधर्माची दीक्षा घेतली. हिंदुधर्माचा त्याग तर करायचा, पण हिंदुधर्माशीं वैर करायचें नाहीं अशा भूमिकेंतूनच बाबांनीं बौद्ध धर्माची निवड केली. आंबेडकरांनीं मुसलमान, ख्रिश्चन व शीख धर्मांचा स्वीकार करावा म्हणून अनेक प्रलोभनें दाखवण्यांत आलीं होतीं. परंतु आंबेडकर हे धर्मसुधारक होते. बौद्धधर्म स्वीकारतांनाहि हिंदुधर्म सुधारण्याची, हिंदुसमाज सुधारण्याची तळमळ त्यांचेमध्यें होती. म्हणूनच तलवारीनें पसरणारे धर्म दूर सारून विचारानें पसरणाऱ्या बुद्धतत्त्वज्ञानाची आंबेडकरांनीं निवड केली. बुद्धानें आपला धर्म आशियांत भिक्षूंच्या मदतीनें पसरवला उलट, ख्रिश्चन व मुसलमान यांनीं शस्त्रबळावर जबरीनें धर्मप्रसार केला. जबरीनें बाटवलेले मुसलमान, ख्रिश्चन आपण पाहतों, पण जबरीनें कुणाला बौद्ध केल्याचें कुणी ऐकलेलें नाहीं. तेव्हां आपल्या पश्चात् आपल्या अनुयायांनीं बळजबरीनें दुसऱ्यांना बाटवूं

नये, शस्त्राचे जोरावर धर्मतत्त्वज्ञान रुजविण्याचा प्रयत्न करूं नये ही भावना लक्षांत घेऊन आंबेडकर बुद्धाला शरण गेले. एवढेंच नव्हे तर ज्या हिंदु धर्मानें त्यांचा छळ केला, त्यांच्या समाजाला गळ्यांत गाडगीं बांधून हिंडायला लावलें, पाणी पिण्याचेंहि सुख लाभूं दिलें नाहीं, त्या हिंदुसमाजावर सूड घेण्याची संधि आली असतांना तिचा त्याग केला. आमच्यावर दया दाखवली. सहा कोटी दलितांना त्यांनीं सांगितलें, 'तुम्ही दिव्याप्रमाणें स्वयंप्रकाशित व्हा.' हें कशासाठीं? आमच्या हिंदुधर्मांत जो भयानक अंधःकार माजला आहे तो उजळण्यासाठींच हे सहा कोटी दिवे त्यांनीं पेटवले. हिंदुधर्मांत व बौद्ध धर्मांत अंतर नाहीं. नव्हे बुद्ध हिंदूच आहेत असा युक्तिवाद या धर्मांतरानंतर सुरू केला गेला. पण सहा कोटी दलित आमच्या धर्मावर थुंकल्यानंतर सुचलेलें हें शहाणपण आहे. गांवोगांव बुद्धमंदिरें बांधून बुद्धपूजा सुरू केल्या म्हणून एक विद्वान म्हणाले, 'मूर्तिपूजेविरुद्ध बंड केलेल्या बुद्धाचें हें केवढें विडंबन?' आम्हांला त्यांच्या विद्वत्तेचें कौतुक वाटलें. एकच प्रश्न त्यांच्या सुपीक मेंदूला गप्प करण्यासाठीं आम्हीं विचारला. 'हरिजन मुसलमान होऊन गांवोगांव मशिदी बांधून गोवध करूं लागले असते तर असेच कुत्सित विचार सुचले असते का तुम्हांला?' या प्रश्नाला कल्पनेनें उत्तर देण्याचेंहि धैर्य त्या बुद्रुकाजवळ नव्हतें. कुणाजवळहि नाहीं.

नवबुद्धांनीं हलकीं कामें करण्याचें नाकारलें म्हणून त्यांचा छळ करणारे 'वीर' अजून आहेत. याचा अर्थ अजूनहि आम्ही जागे झालों नाहीं, हा आहे. बौद्धधर्म हा हिंदुधर्माचाच भाग आहे. बुद्ध हा विष्णूचाच अवतार होता, हा युक्तिवाद करणाऱ्यांनीं केवळ शाब्दिक आतषबाजी करण्यापेक्षां प्रत्यक्ष व्यवहारांत आपलें शहाणपण उतरवावें. नवबुद्ध ही नवी समस्या होण्यापूर्वीच आपल्या आचरणानें दलितांना, नवबुद्धांना या समाजांत मानाचें स्थान आहे, मानानें जगण्याचा हक्क आहे हें आपण सिद्ध केलें पाहिजे. हें व्हावें एवढीच बाबासाहेबांची व त्यांच्या धर्मांतरामागची इच्छा आहे.

आपल्या अलौकिक विद्वत्तेनें आणि झुंजार जीवनानें बाबासाहेबांनीं साऱ्या दलित-समाजाला नवीं क्षितिजें निर्माण करून दिलीं आहेत. भारताची घटना करणारा, हिंदुकोड बिल सांगणारा मनुष्य हा दलित होता ही भावनाच एवढी स्फूर्तिदायक, आशादायक आहे कीं, कुणाहि दलिताचें दलितत्व, अस्पृश्याचें

अस्पृश्यत्व या भावनेपुढें उभें राहूं शकत नाहीं. आंबेडकरांचें हें कर्तृत्व त्यांच्या दलित समाजासाठीं आहे आणि त्यांचें धर्मांतर हें आमच्यासाठीं आहे; आमच्या चुकीमुळेंच सहा कोटी दलितांनीं आमचा धर्म सोडून बौद्ध धर्म घेतला याचें सतत दुःख व्हावें, पण त्यांनीं जबरीनें बाटवाबाटवी करणारा धर्म स्वीकारला नाही हें जाणून नवबौद्ध हे आमचे भाऊच आहेत असें प्रेम वाटावें अशी युक्ति बाबासाहेबांनीं करून ठेवली आहे. धर्मांतराचें हें अंजन त्यांनीं आमच्या डोळ्यांत घातलें आहे. पण आमची दृष्टि साफ व्हावी, दलितांचीं दुःखें पाहून त्या डोळ्यांत अश्रु यावेत एवढ्यासाठींच हें त्यांनीं केलें आहे. "ह्या देशाच्या इतिहासांत विध्वंसक म्हणून स्वतःच्या नांवाची नोंद करून घेण्याची मला मुळींच इच्छा नाहीं" या आपल्या वचनाप्रमाणें त्यांनीं आपलें जीवन घालवलें आहे. जो खरा भारतीय आहे, त्याला भारताच्या या तेजस्वी महापुरुषाबद्दल सदैव आदरच वाटेल.

आंबेडकरांच्या जीवनांत लोकशाही समाजवादी मूल्यांना असलेलें स्थान लक्षांत घेतल्याखेरीज त्यांच्या जीवनाचें मूल्यमापन पूर्ण होणार नाहीं. लोकशाही-प्रधान भारताची घटनाच त्यांनीं निर्माण केली असल्यानें त्यांच्या लोकशाही निष्ठेवर आणखी चर्चा करण्याचें कारण नाहीं. तरीहि घटना-समितींत त्यांनीं केलेल्या भाषणांचा इथें उल्लेख करायला हरकत नाहीं. ते म्हणाले, 'सामाजिक व आर्थिक न्याय मिळविण्यासाठीं आपण नेहमीं घटनात्मक व शांततापूर्ण मार्गांचाच वापर केला पाहिजे; तरच देशांतील लोकशाही स्थिर पायावर राहील. व्यक्तिमाहात्म्य हा लोकशाहीला फार धोका आहे, तो हुकूमशाहीचाच मार्ग आहे, हें आपण विसरतां कामा नये.' याचप्रमाणें समाजवादावर देखील त्यांची आत्यंतिक निष्ठा होती. प्राण गेला तरी कम्युनिस्टांशीं हातमिळवणी करणार नाहीं, असा त्यांचा निश्चय होता. बौद्ध धर्माचा स्वीकार करतांना त्यांनीं जे उद्गार काढले आहेत त्यांतहि समाज-वादाला ते विसरूं शकले नाहींत. 'बुद्ध हा माझ्या मतें सर्वांत मोठा बुद्धिप्रामाण्यवादी व सर्वांत मोठा समाजवादी होता. दलित, पीडित, अस्पृश्य, श्रमजीवि, आदिवासी सर्वांनाच बुद्धानें जवळ केलें.' घटनेनें प्रस्थापित केलेली समता चिरंतन राहावी म्हणून त्यांनी भारतीय जनतेला सांगितलें, 'आर्थिक व सामाजिक विषमता आपण जर लवकरांत लवकर नाहींशी केली

नाहीं तर, या विषमतेमुळें ज्यांची पिळवणूक होते ते लोक घटना समितीनें मोठ्या कष्टानें प्रस्थापित केलेली समताहि उधळून देतील.' बाबासाहेब हे निष्ठावंत लोकशाही समाजवादी होते हेंच त्यांच्या अशा अनेक वचनांतून स्पष्ट होतें.

बाबासाहेब आपल्यांतून गेले आहेत. नाहीं, स्मृतिकार मनूच आपलें कार्य संपवून पुन्हा परमेश्वराकडे गेला आहे. काय सांगणार आहे तो परमेश्वराला? पुनर्जन्मानें समाधान झालें म्हणून सांगणार आहे? का माझ्या शक्तीबाहेर मानव गेला आहे, तेव्हां परमेश्वरा, तूंच आतां बारावा अवतार घेऊन 'चौदाव्या रत्नानें' मानवाला सुधार असें सांगणार आहे? प्रत्येक मानवानें आपलें कर्तृत्व तपासूनच या गोष्टीची कल्पना करायची आहे.

* * *



# त्या आत्म्याला शांति मिळालेली नाहीं

भरो विश्वांत आनंद । शांति नांदो चराचरीं ।
म्हणून जळती संत । महात्मे भास्करापरी ॥

माझ्या दारीं कल्पवृक्ष असता तर मी त्याच्या खालीं बसून फक्त एकच इच्छा केली असती, 'गुरुजी सजीव होऊं देत.' आज महाराष्ट्र पोरका झाला आहे. ममतेनें पाठीवरून हात फिरविणारें महाराष्ट्राला कुणीच उरलेलें नाहीं. पांडुरंगाला सांकडें घालून जनताजनार्दनाच्या अंतःकरणाला पाझर फोडणारा आज कुणीहि उरलेला नाहीं, याची जाणीव जेव्हां जेव्हां होते तेव्हां तेव्हां गुरुजींची आठवण होऊन काळजांतून अश्रु फुटतात.

'गुरुजी हवे होते' हे तीन शब्द आजवर अनेकांच्या ओठांतून अनेकवार बाहेर पडलेले आहेत. मरण सर्वांनाच आहे. सर्वांनाच एकदां येथून कायमचें जायचें आहे. आजवर अनेकजण असे गेले आहेत. पण काळजाची तात सतत छेडून आपली आठवण देणारे गुरुजी हे एकमात्र आहेत. गुरुजींच्या जीवनाचें हेंच वैशिष्ट्य आहे. लोकमान्यांसारखे गुरुजी असामान्य व्यक्तित्वाचे पुरुष खास नव्हते. लोकमान्यांची करडी नजर, करारी चेहरा, वनराज सिंहाला जशी आयाळ तशा भासणाऱ्या भरघोस मिशा, त्यांच्याबद्दल प्रथमदर्शनीच आदर, थोडें भय निर्माण करीत. गुरुजींजवळ ना करारी चेहरा ना नजरेचें सामर्थ्य, ना मिशांचा मागमूस. महात्माजींसारखा तेजःपुंज हंसरा सात्विक चेहराहि त्यांच्याजवळ नव्हता. गुरुजींजवळ जें कांहीं होतें तें अगदीं सामान्य होतें. संकोचानें सदैव अवघडलेला आंखूडसा बांधा, त्यावर गबाळेपणांत जमा होणारी जाड्याभरड्या खादीचीं वस्त्रें, डोक्यावर चुरगळलेली गांधी टोपी आणि चेहऱ्यावर सदैव दिसणारें, परंतु तें हास्य आहे कां काळजांतली वेदना लपवणारा अवघड अभिनय आहे असा संशय वाटायला लावणारें रडवेलें हसुं. या साऱ्यांची बेरीज केली तर तिचा ठसा पडण्याइतपत आकर्षकता, भव्यता गुरुजींच्याजवळ नव्हती.

मात्र गुरुजींजवळ कांहींतरी वेगळी गोष्ट निश्चितपणें होती. लोकमान्यांजवळ जायला मोठीं माणसेंसुद्धां दबकत. तेजोमणि भास्करच तो. वर नजर करून बघायला देखील डोळे कांकू करीत. गांधीजी बालकांमध्यें रमत. परंतु गुरुजींसारखे ते स्वतः बालक बनत नसत. स्वतःचें सारें अस्तित्व विसरून दुसऱ्याशीं एकरूप होणें गुरुजींना मात्र अत्यंत सहजसुलभ होतें. पारिजातक उमलतांच त्याचा गंध कसा वातावरणांत मिसळून जातो त्याप्रमाणें मुलें दिसतांच गुरुजी नखशिखान्त फुलत. त्यांचा त्यांना विसर पडे आणि चिमण्या चिमण्या मुलांचे हात हातांत घेऊन तासन्तास ते त्यांच्याशीं एकरूप होऊन बोलत बसत. मातेच्या स्तनाला बिलगलेलें बालक जसें दूर व्हायला राजी नसतें, तसें गुरुजींच्याजवळ असलेल्या मुलांचें होई. मातेपेक्षां कांकणभर जास्त ममता असलेला हा पुरुष आहे असा विश्वास त्या मुलांना वाटे. केवढी ही महनता. मातृप्रेमाचाहि विसर पडायला लावूं शकणारें केवढें मोठें हें प्रेम! गुरुजींना हें कसें जमत होतें हें कळत नाहीं. मात्र एखादा भ्रमर जितक्या सहजपणें फुलांचें चुंबन घेतो, त्यांच्या अंतरंगाचा ठाव घेतो; मग तें काळें जांभळें कृष्णकमळ असो वा गेंदगुलाबी गुलाब असो. त्याप्रमाणें मुलांच्या मनाच्या अगदीं आंतल्या कप्प्यांत गुरुजी जाऊन बसत. केवळ गोड गोड बोलून, मुलांना कुरवाळून त्यांना हें जमलें होतें असें नाहीं. तितक्या उथळ मनाचा हा पुरुषच नव्हता. गुरुजींचें सारें जीवन ' आईच्या श्रद्धामय राहणीनें भारावून गेलें होतें. ' आईचें हृदय ज्याच्याजवळ आहे त्यालाच साऱ्या विश्वाची वेदना समजेल, अशी त्यांची श्रद्धा होती. म्हणुनच गुरुजींचा हात पाठीवरून फिरूं लागला कीं, गाईची जीभ पाठीवरून फिरूं लागतांच गोऱ्हा ज्याप्रमाणें तिच्या कासेला प्रेमळ ढुसण्या देऊं लागतो त्याप्रमाणें मुलें गुरुजींच्या कुशींत शिरत. गुरुजी खरोखरच ' आई ' होते. ३५-३६ सालची गोष्ट आहे. सनदशीर राजकारणाचे वारे देशांत वाहूं लागले होते. निवडणुकांची धामधूम उठली व बसली होती. पण या साऱ्या धांवपळींत गुरुजींचा पत्ता लागेना. ते कुठें होते? बऱ्याच शोधानंतर पुण्यांत पेरूगेटाजवळ एका घरीं ते आहेत असें समजलें. तिथें गेल्यानंतर हा महापुरुष पंचा नेसून स्वयंपाकाचीं भांडीं उतरवत असलेला दिसला.

' गुरुजी, येथें तुम्ही काय करितां ? किती ठिकाणीं शोधलें तुम्हांला ?'

'मुलांची आई होऊन इथें राहतों आहें.' गुरुजी म्हणाले.

'मुलांची आई?'

'हो' आमच्या अंमळनेरचे कांहीं गरीब विद्यार्थी येथल्या कॉलेजांत शिकत आहेत. ते गेले आहेत सायन्सच्या वर्गाला. तेव्हां त्यांचा स्वयंपाक करून ठेवीत आहें. त्यांची ही चिंता दूर केली म्हणजे त्यांना अभ्यास करायला वेळ सांपडतो. स्वयंपाक करून जो वेळ मिळतो तो लेखनांत घालवतों. गुरुजींनीं शांतपणें उत्तर दिलें.

गुरुजींच्या जीवनाचा सारा अर्थ या प्रसंगांत भरला आहे. आईवेगळ्या लेंकरांना छाया देण्यासाठीं ते नेहमींच पुढें येत. पांडुरंग जनीला दळायला मदत करीत असे, एकनाथांकडे पाणी भरत असे, या गोष्टी आम्हांला इतके दिवस खोट्या वाटायच्या, पण या '**पांडुरंगाची**' ही कृति पाहून आमची खात्री झाली; प्रत्यक्ष पंढरीच्या विटेवरचा पांडुरंग जनीकडे वा एकनाथांकडे गेला नसला तरी गुरुजींसारखा कुणी पांडुरंग निश्चितपणें त्यांच्या मदतीला धांवला असला पाहिजे. शिक्षणाची आंस असलेल्या, स्वतःचें घर सोडून दूर येऊन पडलेल्या मुलांच्या पोटांत वेळच्या वेळीं दोन घास अन्न पडावें म्हणून गुरुजी त्यांचे स्वयंपाकी बनले. युवकांना गुरुजींबद्दल जो विश्वास वाटला तो यामुळेंच. गुरुजींनीं आपलें सारें आयुष्य युवकांना मदत करण्यांत, त्यांच्या जीवनांत प्रकाश पडावा म्हणून जाळून घेण्यांत घालवलें. हारतुरे घालून ते मिरवले नाहींत, सभा व संमेलनें गाजवून नाचले नाहींत अथवा कुठल्या मानाच्या जागा लुबाडण्यासाठीं धांवले नाहींत. गर्दीपासून ते दूरदूरच राहिले. आपण होऊन गुरुजी एका गोष्टीमागें धांवले. ती म्हणजे 'सेवा.' सेवेची संधि आली कीं, गुरुजी तिथें धांवलेच. अंमळनेरच्या शाळेंत असतांना तिथल्या वसतिगृहांत गोपाळ नांवाचा एक गडी होता. तो विषमज्वरानें आजारी पडला. गरीब बिचारा. ना कुणी त्याला औषध द्यायला ना कुणी धीर द्यायला. गुरुजी त्याची आई झाले. त्याच्या सेवेसाठीं पुढें झाले. त्याच्या विष्ठेला भयंकर दुर्गंधी यायची. पण गुरुजींनीं कधीं नाक धरलें नाहीं. ते त्याची

विष्ठा काढत, कपडे धुवत. अशा सेवेमधूनच गुरुजींबद्दलचा अपार आदर निर्माण झाला. अशा सेवेंतूनच महाराष्ट्राला गुरुजींचें जीवन समजलें. दुसऱ्याला दुःखी पाहून गुरुजी दुःखी होत. त्याचें दुःख स्वतःचेंच दुःख समजून ते कष्टी होत. त्यांच्या या सहृदयतेची बरीच टिंगल झाली. रडके-नेभळे म्हणून त्यांचा उपहास झाला. परंतु या साऱ्या उपहासापलीकडे गुरुजींची जीवन-सरिता वाहत होती. अपरंपार प्रेमानें भरलेल्या त्यांच्या काळजाला या टीकेचें, या उपहासाचें कांहींच वाटलें नाहीं. कारण गुरुजींच्या जीवनांत श्रद्धेला आणि भावनेला फार महत्त्व होतें. साऱ्याच गोष्टी बुद्धिवादाचा निकष लावून बघायच्या नसतात. तसें जर असतें तर लहान मुलाला स्तनाला लावण्याआधीं मातेनें विचार केला असता : 'याला मी पाजूं का नको. कदाचित् हा कुळाला कलंक लावणाराहि निघेल. मग याला वाढवायचा कशाला ?' पण असा विचार करण्याची मातेला कधीं जरूरीच वाटत नाहीं. त्या सानुल्याला पाजणें, न्हाऊंमाखूं घालणें, वाढवणें हें ती स्वताचें पवित्र कर्तव्य समजते. गुरुजी मातेसारखे होते. महाराष्ट्रांतल्या मुलांना आणि जनतेला त्यांनीं प्रेमाचें तत्त्वज्ञान पाजलें. त्यासाठीं त्यांनीं प्रथम आपलें जीवन प्रेममय करून घेतलें. कुणाबद्दल द्वेष नाहीं. कुणाचा दुस्वास नाहीं. बोलण्यांत देखील कठोरता नाहीं.

**कठोर हृदयें मृदु नवनीतें ।**
**करतिल माझीं नवीन गीतें ॥**

ह्या जिद्दीनें गुरुजी जीवन जगले. महाराष्ट्रांत ही गोष्ट फारच कठीण होती. कारण दगडांचा देश हा. इथें पुरुषार्थ मिशांच्या आंकड्यावर तोलला जाणार. गुरुजींसारख्या प्रेमाच्या भुकेलेल्याला इथें उपासमारच घडायची. परंतु गुरुजींनीं या महाराष्ट्राला प्रेममय करून टाकलें. मराठी मिशीच्या आंकड्यांतली 'अक्कडबाजी' दूर सारून त्यांनीं त्या मिशींतली 'मी' पणाची 'शी' घालवली. मराठी माणसाला त्यांनीं पुरुषार्थाचें दुसरें रूप दाखविलें. हें गुरुजींखेरीज दुसऱ्या कुणाला जमलें नव्हतें.

गुरुजींना हें जमलें. कारण, गुरुजींचें जीवन प्राजक्ताच्या फुलांसारखें पवित्र आणि सुगंधित होतें. खरें म्हणजे गुरुजी हे एक मानवी रूपांत वावरणारे

देवदूतच होते. या रांगड्या महाराष्ट्राला, या दगडांफुलांच्या महाराष्ट्राला, या कोरड्या ठणठणीत महाराष्ट्राला गुरुजींनीं आपल्या त्यागमय जीवनानें अपरंपार प्रेममय करून टाकलें, स्फुंदून स्फुंदून रडायला शिकविलें. खऱ्या वीर पुरुषांचें वर्णन हिंदींतल्या दिनकर कवींनीं—

**एक नयन संजीवन जिनका**
**एक नयन था हालाहल**
**जितना कठिण खड्ग था करमे**
**उतनाही अंतर कोमल**

असें केलें आहे. महाराष्ट्राला खरा वीर बनवण्याचें काम गुरुजींनीं केलें. गुरुजींची उपेक्षा आणि हेटाळणीहि झाली. 'रडकें वाङ्मय प्रसवणारा नेभळट लेखक' म्हणूनहि त्यांचा उद्धार झाला. पण 'श्यामची आई' लिहून गुरुजींनीं महाराष्ट्रांतल्या हरएक चिमण्यांच्या चिमुकल्या हृदयांत मातृप्रेमाची जी महान् मंगल ज्योत लावली आहे तिच्या पवित्र तेजापुढें साऱ्या टीकाकारांचीं तोंडें काजळासारखीं काळवंडतील यांत शंका नाहीं. लहान मुलांच्या हातांत देण्याजोगें इतकें सुरेख पुस्तक जगांतल्या कुठल्याहि भाषेंत झालें नसेल. गुरुजी म्हणजे 'श्यामची आई', गुरुजी म्हणजे 'गोड गोष्टी', गुरुजी म्हणजे 'सोनसाखळी'. महाराष्ट्रांतल्या चिमण्यांना सद्-विचारांचा चारा भरवणारे गुरुजी हे 'रडकें वाङ्मय प्रसवणारे नेभळट लेखक' असतील तरच मुलाला ठेंच लागतांच डोळ्यांत पाणी येणारी 'आई' देखील रडकी, नेभळी म्हणायला पाहिजे. गुरुजींनीं फसवें लिहिलें नाहीं. गुरुजींनीं जें भोगलें तेंच लिहिलें. जें जीवन ते जगले त्याचेच पडसाद त्यांच्या साहित्यांत उमटले. आपलें हृदय त्यांनीं महाराष्ट्रासमोर मोकळें केलें. लिखाण हा गुरुजींचा धंदा नव्हता. त्यांच्या कोमल मनाचा तो हुंकार होता. त्यांच्या श्रद्धाळु, त्यागी, प्रेमळ, पवित्र हृदयाचें प्रतिबिंब म्हणजेच त्यांचें वाङ्मय होतें.

गुरुजी म्हणजे भावनांचा सागर. म्हणूनच त्यावर अनंत लाटांचें सतत नर्तन चालू असायचें. फुलें–मुलें पाहतांच वितळून जाणारे गुरुजी, दलितांचीं दुःखें पाहून तळमळणारे गुरुजी, हरिजनांना देव भेटावा म्हणून आत्मबलिदान

विष्ठा काढत, कपडे धुवत. अशा सेवेमधूनच गुरुजींबद्दलचा अपार आदर निर्माण झाला. अशा सेवेंतूनच महाराष्ट्राला गुरुजींचें जीवन समजलें. दुसऱ्याला दुःखी पाहून गुरुजी दुःखी होत. त्याचें दुःख स्वतःचेंच दुःख समजून ते कष्टी होत. त्यांच्या या सहृदयतेची बरीच टिंगल झाली. रडके-नेभळे म्हणून त्यांचा उपहास झाला. परंतु या साऱ्या उपहासापलीकडे गुरुजींची जीवन-सरिता वाहत होती. अपरंपार प्रेमानें भरलेल्या त्यांच्या काळजाला या टीकेचें, या उपहासाचें कांहींच वाटलें नाहीं. कारण गुरुजींच्या जीवनांत श्रद्धेला आणि भावनेला फार महत्त्व होतें. साऱ्याच गोष्टी बुद्धिवादाचा निकष लावून बघायच्या नसतात. तसें जर असतें तर लहान मुलाला स्तनाला लावण्याआधीं मातेनें विचार केला असता : 'याला मी पाजूं का नको. कदाचित् हा कुळाला कलंक लावणाराहि निघेल. मग याला वाढवायचा कशाला ?' पण असा विचार करण्याची मातेला कधीं जरूरीच वाटत नाहीं. त्या सानुल्याला पाजणें, न्हाऊंमाखूं घालणें, वाढवणें हें ती स्वताचें पवित्र कर्तव्य समजतें. गुरुजी मातेसारखे होते. महाराष्ट्रांतल्या मुलांना आणि जनतेला त्यांनीं प्रेमाचें तत्त्वज्ञान पाजलें. त्यासाठीं त्यांनीं प्रथम आपलें जीवन प्रेममय करून घेतलें. कुणाबद्दल द्वेष नाहीं. कुणाचा दुस्वास नाहीं. बोलण्यांत देखील कठोरता नाहीं.

**कठोर हृदयें मृदु नवनीतें ।**
**करतिल माझीं नवीन गीतें ॥**

ह्या जिद्दीनें गुरुजी जीवन जगले. महाराष्ट्रांत ही गोष्ट फारच कठीण होती. कारण दगडांचा देश हा. इथें पुरुषार्थ मिशांच्या आंकड्यावर तोलला जाणार. गुरुजींसारख्या प्रेमाच्या भुकेलेल्याला इथें उपासमारच घडायची. परंतु गुरुजींनीं या महाराष्ट्राला प्रेममय करून टाकलें. मराठी मिशीच्या आंकड्यांतली 'अक्कडबाजी' दूर सारून त्यांनीं त्या मिशींतली 'मी' पणाची 'शी' घालवली. मराठी माणसाला त्यांनीं पुरुषार्थाचें दुसरें रूप दाखविलें. हें गुरुजींखेरीज दुसऱ्या कुणाला जमलें नव्हतें.

गुरुजींना हें जमलें. कारण, गुरुजींचें जीवन प्राजक्ताच्या फुलांसारखें पवित्र आणि सुगंधित होतें. खरें म्हणजे गुरुजी हे एक मानवी रूपांत वावरणारे

देवदूतच होते. या रांगड्या महाराष्ट्राला, या दगडांफुलांच्या महाराष्ट्राला, या कोरड्या ठणठणीत महाराष्ट्राला गुरुजींनीं आपल्या त्यागमय जीवनानें अपरंपार प्रेममय करून टाकलें, स्फुंदून स्फुंदून रडायला शिकविलें. खऱ्या वीर पुरुषांचें वर्णन हिंदींतल्या दिनकर कवींनीं—

**एक नयन संजीवन जिनका**
**एक नयन था हालाहल**
**जितना कठिण खड्ग था करमे**
**उतनाही अंतर कोमल**

असें केलें आहे. महाराष्ट्राला खरा वीर बनवण्याचें काम गुरुजींनीं केलें. गुरुजींची उपेक्षा आणि हेटाळणीहि झाली. 'रडकें वाङ्मय प्रसवणारा नेभळट लेखक' म्हणूनहि त्यांचा उद्धार झाला. पण 'श्यामची आई' लिहून गुरुजींनीं महाराष्ट्रांतल्या हरएक चिमण्यांच्या चिमुकल्या हृदयांत मातृप्रेमाची जी महान् मंगल ज्योत लावली आहे तिच्या पवित्र तेजापुढें साऱ्या टीकाकारांचीं तोंडें काजळासारखीं काळवंडतील यांत शंका नाहीं. लहान मुलांच्या हातांत देण्याजोगें इतकें सुरेख पुस्तक जगांतल्या कुठल्याहि भाषेंत झालें नसेल. गुरुजी म्हणजे 'श्यामची आई', गुरुजी म्हणजे 'गोड गोष्टी', गुरुजी म्हणजे 'सोनसाखळी'. महाराष्ट्रांतल्या चिमण्यांना सद्-विचारांचा चारा भरवणारे गुरुजी हे 'रडकें वाङ्मय प्रसवणारे नेभळट लेखक' असतील तरच मुलाला ठेंच लागतांच डोळ्यांत पाणी येणारी 'आई' देखील रडकी, नेभळी म्हणायला पाहिजे. गुरुजींनीं फसवें लिहिलें नाहीं. गुरुजींनीं जें भोगलें तेंच लिहिलें. जें जीवन ते जगले त्याचेच पडसाद त्यांच्या साहित्यांत उमटले. आपलें हृदय त्यांनीं महाराष्ट्रासमोर मोकळें केलें. लिखाण हा गुरुजींचा धंदा नव्हता. त्यांच्या कोमल मनाचा तो हुंकार होता. त्यांच्या श्रद्धाळु, त्यागी, प्रेमळ, पवित्र हृदयाचें प्रतिबिंब म्हणजेच त्यांचें वाङ्मय होतें.

गुरुजी म्हणजे भावनांचा सागर. म्हणूनच त्यावर अनंत लाटांचें सतत नर्तन चालू असायचें. फुलें—मुलें पाहतांच वितळून जाणारे गुरुजी, दलितांचीं दुःखें पाहून तळमळणारे गुरुजी, हरिजनांना देव भेटावा म्हणून आत्मबलिदान

करण्यास तयार झालेले गुरुजी, स्वातंत्र्याचा जयघोष करीत बेहोष होऊन नाचणारे गुरुजी आणि अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठीं सौदामिनी-सारखे तळपणारे गुरुजी हीं एकाच माणसाचीं अनेक रूपें पाहिल्यानंतर खरोखर आश्चर्य वाटतें. अर्थातच हीं रूपें अनेक भासलीं तरी त्या सर्वांच्या मुळाशीं जी भावना आहे ती एकच आहे. ती म्हणजे ‘ प्रेम ’. गुरुजींनीं मुलांवर प्रेम केलें, दलितांवर प्रेम केलें, स्वदेशावर प्रेम केलें. त्या प्रेमाची तीव्रता निरनिराळ्या प्रसंगांतून प्रकट झाली. मुलांवरचें त्यांचें प्रेम सर्वांनाच ठाऊक होतें, परंतु हरिजनांना मंदिरें खुलीं व्हावींत म्हणून पंढरीच्या पांडुरंगासमोर ते आत्मसमर्पण करण्यासाठीं ठाण मांडून बसले, तेव्हां साऱ्या दलित बंधूंचीं अंतःकरणें उचंबळून आलीं. त्या उपवासाचे वेळीं गुरुजीनीं जें सांगितलें त्यामधून अनंत काळ त्यांच्या हृदयांत जी वेदना होती तिचें अल्पसें दर्शन झालें. गुरुजींना त्यावेळीं कुणीतरी प्रश्न केला ‘ तुम्हांला अस्पृश्यता निवारणाचा आजच एकाएकीं पुळका कां आला ? आजच कां एकदम उपवासावर येऊन ठेपलांत ? गुरुजींनीं या प्रश्नाला उत्तर दिलें, “ मी माझें अंतःकरण तुम्हांस कसें दाखवूं ? आणि कोणी कालपर्यंत मरायला उभा राहिला नाहीं म्हणून त्यानें आज उभें राहूं नये का ? कालपर्यंत देशासाठीं मेला नाहीं म्हणून आज मरूं नये का ? कालपर्यंत वाईट होतों म्हणून आज चांगलें होणें कां पाप ? कालपर्यंत शिकलों नाहीं नि आज शिकायला लागलों तर का कोणी म्हणावें आजच शिकण्याचा पुळका कां आला ? प्रत्येकाच्या जीवनांत विशिष्ट क्षण येतात. त्या त्या वेळेस सर्वस्व अर्पण करायला तो उभा राहत जातो. भूकंपाचा धक्का एकदम बसला तरी पृथ्वीच्या पोटांत कधींपासूनच हालचाल सुरू झालेली असते. ती हालचाल आपणास माहीत नसते. आपणास स्फोट तेवढा दिसतो. माझ्या मनांतील अनेक वर्षांच्या तळमळींतूनच हा उपवास बाहेर पडला. हा आकस्मिक पुळका नव्हे. ही क्षणिक वेदना नव्हे. तात्पुरती लाट नव्हे. परंतु ह्या गोष्टी माझ्या निकटवर्ती मित्रांस, तरुणांस, विद्यार्थ्यांस माहीत आहेत. कोणी कुटाळकी केली तरी देवाला सारें माहीत आहे. ”

गुरुजींचें म्हणणें खरें होतें. गुरुजी काय आहेत हें महाराष्ट्राला माहीत होतें. म्हणूनच पंढरपूरच्या देवळाचें दार हरिजनांसाठीं उघडलें गेलें. गुरुजींच्या

आत्मसमर्पणाच्या निश्चयानें जणूं मराठी मनाचें दार मोकळें झालें. हरिजन बांधवांना आपल्या हृदयांत घेण्यासाठीं महाराष्ट्र तयार झाला.

आकाशांतली नक्षत्रें पाहून गुरुजी म्हणत, "देवाघरचा हा प्राजक्त तर कोणी हलविला नसेल?" परंतु गुरुजी स्वतःच देवाघरचे प्राजक्त होते. वेड्या-वाकड्या खपल्याखपल्यांचा बुंधा असलेला, खरबरीत पानांचा प्राजक्त पण त्याचीं फुलें म्हणजे त्याच्या साऱ्या साधेपणांतून, सोज्ज्वळपणांतून उमटलेले पवित्र हुंकारच. साधेभोळे गुरुजी आणि त्यांनीं निर्मिलेलें सुंदर वाङ्मय यांचा संबंध असाच आहे. प्राजक्ताला गदगदा हालवून त्यावरचें फूल न फूल रोजच्या रोज लोक हिरावून घेतात, पण रात्रींच्या शांत वातावरणांत मनाचीं कवाडें खोलून, पहाटेच्या वेळीं लोकांचें स्वागत करण्यासाठीं प्राजक्त पुन्हां शेंकडों फुलें फुलवून तयार असतो. गुरुजींच्या जीवनांत हा प्रकार रोजच होता. समाजांतील दुष्ट प्रवृत्तीनें केलेली टीका, उपहास आणि हितचिंतकांनीं आपलेपणानें दिलेला त्रास गिळून गुरुजी सदैव फुलत राहिले. त्यांना स्वतःला फुलण्याचा हव्यास नव्हता अथवा त्या फुलण्यांतून कसला लाभहि नव्हता, पण 'येऊं देत मुलें, नेऊं देत फुलें' या इच्छेनें ते सतत वागले. सारें जीवन त्यांनीं प्राजक्ताच्या फुलांसारखें निर्मळ, सुगंधी, सुकुमार केलें.

गुरुजी दुर्बल होते, नेभळे होते, रडके होते असा बकवा मऊमऊ गादीवर बसून पान चघळत टीकालेख लिहिणारे करतात. परंतु या दुर्बल, नेभळ्या, रडक्या माणसाच्या फाटक्या शरीरांत जें काळीज होतें त्याची ओळख या बुद्रुक टीकाकारांना झालेली नव्हती. गुरुजी धुळ्याच्या तुरुंगांत होते तेव्हांची गोष्ट आहे. त्यांच्या शरीरिक बळाच्या दसपटीनें कामें गुरुजी तेथें करत. हें बळ कोठून येई? राष्ट्रावरील प्रेमाच्या अथांगतेमधूनच ही शक्ति त्यांना मिळे. माझ्या देशाच्या मुक्ततेआड येणाऱ्या शक्तींना मी भरडीत आहें अशा आवेशानें गुरुजी चक्की पिसत. रोज २५ ते ३० पौंड दळण गुरुजी भराभर दळून टाकत. खेरीज इतरांच्या मदतीला जात. आणि हें सगळें करून पुन्हां विनोबाजींच्या बौद्धिकाला जाऊन बसत. त्यांचीं मनोमन टिपणें घेत. १९३२ अखेरीस गुरुजींना नाशिकच्या तुरुंगांत हलवलें. तेथें 'रोच' नांवाचा अत्यंत तापट, करडा, अधिकारी होता. देशभक्तांना छळण्यासाठीं तो नव्या नव्या युक्त्या अवलंबी. रोज सकाळीं 'गिनतीच्या वेळीं' गुडघ्यांत मान घालूनच

बसलें पाहिजे असा त्यांचा हुकूम होता. गुरुजींना ही अपमानास्पद पद्धत पटली नाहीं. त्यांनीं विरोध केला. मान ताठ ठेवून ते गिनतीला बसले. दंडुकें बसून डोकें रक्तबंबाळ झालें तरी गुरुजींनीं मान वाकवली नाहीं. ही प्रचंड सहनशीलता कुठून आली या दुबळ्या, रडक्या, नेभळ्या माणसांत? याचा विचार टीकाकारांनीं करावा. आत्यंतिक राष्ट्रप्रेम ही भावना त्यांना अपार क्लेश सहन करण्याची शक्ति देत होती. त्यांच्या शरीरांत अपूर्व तेज ओतत होती. ' देह जावो अथवा राहो ' या निश्चयानें गुरुजी अशा वेळीं वागत. फैजपूर कॉंग्रेसचे वेळीं त्यांनीं अशा निश्चयानेंच काम केलें. खेडोपाडीं ते हिंडले. एस्. एम्. जोशींसारखी जिवाला जीव देणारी मंडळी त्यांच्या-बरोबर होती.

**भारतमाता माझी लावण्याची खाण**
**गाइन तिचें गान, मी गाइन तिचें गान**
**मांडिन निर्भय ठाण, मी देईन माझे प्राण**

अशा सोप्या सोप्या स्वतः रचलेल्या गाण्यांतून गुरुजी खेड्यांतल्या जनतेशीं बोलत. ' महात्मा गांधीकी जय ' या घोषानें ते जनतेला जाग आणीत. कॉंग्रेसचें तत्त्वज्ञान त्यांना समजेल अशा रीतीनें सांगत.

गुरुजींनी कॉंग्रेसला खेडोपाडीं नेऊन पोहोंचवलें. महाराष्ट्रांतल्या रामा, शिवा, गोविंदाला महात्माजींचा संदेश शिकवला. स्वातंत्र्याचें मोल मातीमोल म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गांवढळांना पटवून दिलें. " अरे उठा, तुमच्या मातेची हांक ऐका, कॉंग्रेसची हांक ऐका, स्वातंत्र्यलढ्यांत सामील व्हा. " असें सांगत गुरुजी वाऱ्यासारखे हिंडले. कधीं वादळासारखे ते घोंघावत गेले. कधीं हळूच काळजाला हात घालणाऱ्या झुळुकेसारखे ते गेले आणि गुरुजींच्या या खटाटोपामुळेंच

**' स्वातंत्र्याचे आम्ही शिपाई**
**सुखवूं प्रियतम भारत माई '**

अशी प्रतिज्ञा करणारे हजारों सैनिक तयार झाले.

स्वातंत्र्य या भावनेचा गुरुजींनीं जेवढा आदर केला तेवढा कुणी केला नसेल. जिथें स्वातंत्र्याची प्रचीति दिसेल तिथें त्यांची मान नम्र व्हावयाची. १९४४ सालीं गुरुजी नंदुरबारला गेले असतांना ज्या ज्या मातांचीं बालकें आंदोलनांत धारातीर्थीं पडलीं त्या त्या मातांच्या पायांवर लोटांगण घालीत ते म्हणाले : "तुम्ही माता धन्य—तुम्हीं देशाकरतां आपले पुत्र दिले!" ज्या ठिकाणीं तीं मुलें धारातीर्थीं पडलीं तेथील रजःकण उचलून गुरुजींनीं कपाळावर लावले. केवढी ही त्यागाची पूजा! केवढा हा स्वातंत्र्याबद्दलचा आदर! गुरुजींनीं ज्याच्यासाठीं एवढें केलें तें स्वातंत्र्य आलें, मात्र काँग्रेस-कडून त्यांच्या अपेक्षा पूर्ण झाल्या नाहींत. हळुवार मनाच्या या महात्म्याच्या काळजाला त्यामुळेंच तडा गेला. गुरुजी काँग्रेसबाहेर पडले. लोकशाही समाजवादासाठीं त्यांनीं आपला देह झिजविण्याचा निर्धार केला. त्यांचें सारें आयुष्य एखाद्या दीपकासारखें होतें. स्वतः जळून त्यांनीं दुसऱ्यांना मार्ग दाखवला.

'माऊली' म्हणून ज्या काँग्रेसचा गुरुजींनीं गौरव केला ती काँग्रेस तुम्हीं कां सोडली असें गुरुजींना कुणी तरी विचारलें. गुरुजींनीं त्याला फार समर्पक उत्तर दिलें. ते म्हणाले, "कैकयी भरताची माता होती तशी रामाचीहि होती. पण ज्या वेळीं कैकयीनें रामावर अन्याय केला तेव्हां भरत कैकयीला म्हणाला 'माता न तूं वैरीणी' तूं आई म्हणून मला मेलीस. जनतारूपी रामावर काँग्रेस अन्याय करूं लागली तेव्हां काँग्रेस माऊली मेली. काँग्रेस माझी माऊली राहिली नाहीं."

गुरुजींना मृत्यूची ओढ सदैवच होती. 'मी केवळ मरून जावें' असें ते अनेकदां म्हणत. 'हें देहाचें मोटलें कोठें तरी शेवटीं अर्पावें हाच एक मला ध्यास आहे.' असें ते म्हणत. 'कुठल्यातरी सत्कार्यांत हें मडकें फुटावें ही एक मला इच्छा आहे' असें ते सांगत. या सांगण्यांत समर्पणाची भावना अधिक होती. जगाला विटून हे बोल त्यांच्या मुखांतून निघाले नव्हते. पण देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ज्या काँग्रेसला 'माऊली' म्हणून गुरुजींनीं मानलें त्या माऊलीचें स्वरूप पाहून गुरुजींना चरका बसला. मातेचें महन् मंगलगीत त्यांनीं आयुष्य-भर गायिलें त्यालाच धक्का बसला. काँग्रेस 'माऊली' नाहीं हें त्यांना कळून आलें. ही चूक सुधारण्याइतपत शक्ति आपल्यांत नाहीं हें देखील त्यांना

समजून आलें. स्वतःचें मोठ्यांतलें मोठें असें जें लेखणीचें व वाणीचें सामर्थ्य तें देखील इथें निष्प्रभ ठरत आहे, हें पाहून ते अधिकच कष्टी झाले. पिचलेल्या मनांचे हुंकार, दुःखी जनांच्या किंकाळ्या त्यांना ऐकवेनात.

आणि एक दिवस गुरुजींनीं स्वतः होऊनच आपल्याला संपवून घेतलें. एका रात्रीं महाराष्ट्राची माऊली मूकपणें मृत्यूच्या मेण्यांतून गेली. खडकाळ महाराष्ट्राच्या काळजांतून उमटलेला हा कोमल हुंकार अपुरा असतांनाच अस्तंगत झाला. महाराष्ट्र पोरका झाला. स्फुंदून स्फुंदून रडायला शिकलेला महाराष्ट्र ढसढसा रडला. गुरुजी गेले. महाराष्ट्रांतलें चैतन्य गेलें. सुन्न झाला सारा महाराष्ट्र! गुरुजींचें जीवन आणि मरण सारेंच महान्. त्यांची कृति महान्. त्यांची स्मृति महान्.

गुरुजींच्या जीवनांत नसेल येवढा अर्थ त्यांच्या मरणांत आहे. ज्या युवकांना संतुष्ट करण्यासाठीं, त्यांना मार्ग दाखवण्यासाठीं त्यांनीं आपलें आयुष्य वेंचलें त्या युवकांसाठीं स्वातंत्र्यानंतर कांहीं करणें त्यांना अशक्य झालें. आयुष्यांत मार्ग दाखवा, जीवन कसें जगूं हें सांगा, असें विचारत अनेक तरुण त्यांचेकडे येत. त्यांच्या मनांत विश्वास असे, गुरुजी मार्ग दाखवतील. पण गुरुजींच्या शक्तीपलीकडची ही गोष्ट होती. मार्ग दिसेना म्हणून तडफडणारे हजारों युवक गुरुजींनीं पाहिले आणि ‘ दीपस्तंभ ’ म्हणून हे युवक आपल्याकडे बघतात हेंहि त्यांना समजलें. भोंवतालीं पसरलेल्या अंधारांत प्रकाश पाडावा येवढें आपलें तेज नाहीं. उलट, आपल्या अल्प प्रकाशानें या अंधाराला जास्त भयाणताच प्राप्त होते आहे हें ध्यानांत येतांच गुरुजींनीं ताडकन् स्वतःला मालवून घेतलें. आपल्या जीवनज्योतीवर स्वतःच फुंकर मारून घेतला. दीप विझला. गुरुजी गेले. पण ती तडफड संपली असेल का? ज्या वेदनेनें गुरुजींना कासावीस केलें होतें, ती वेदना सरली असेल का? ज्यामुळें गुरुजी बेचैन झाले होते ती बेचैनी विरली असेल का? ती संपणें, ती सरणें, ती विरणें अशक्य आहे. कारण ती तडफड, ती वेदना, ती बेचैनी गुरुजींच्या शरीराची नव्हती. ती गुरुजींच्या आत्म्याची तडफड होती, आत्म्याची वेदना होती, आत्म्याची बेचैनी होती. **आणि आत्मा तर अमर असतो.** शरीर मेलें पण आत्मा नाहीं ना मेला? गुरुजी तुम्ही फसलांत! ज्यासाठीं तुम्हीं आत्मनाश करून घेतला, देहाचें मडकें फोडून घेतलेंत तें तुम्हांला साधलें नाहीं. गुरुजी

तुमची तडफड, तुमची बेचैनी, तुमची वेदना संपली नाहीं. तुमचें शरीर संपलें म्हणून ज्यांनीं अश्रू ढाळले तेहि फसले. तुमच्या शरीराबरोबर तुमची तडफड संपली, या दुष्ट जगांतून एका साधुपुरुषाची मुक्तता झाली म्हणून त्यांनीं समाधानाचा निश्वासहि टाकला पण ते सारे फसले.


त्या तडफडींतून, त्या वेदनेंतून, त्या बेचैनींतून गुरुजींची अजूनहि सुटका झालेली नाहीं. अजून त्यांचा आत्मा व्याकुळ होऊन फिरतो आहे, साऱ्या भारतांत आतां फिरतो आहे, आतुर नजरेनें बघतो आहे, शोधतो आहे कुणी आहे का ? असा कोणी दीप आहे का, जो युवकांना प्रकाश दाखवील ? तसा दीपस्तंभ जोंवर त्यांना दिसत नाहीं, तोंवर त्यांच्या आत्म्याला शांति नाहीं. ज्यांना गुरुजींबद्दल आदर आहे, त्यांच्या ओढवून घेतलेल्या मृत्यूबद्दल हळहळ आहे, त्या सर्वांनींच, त्यांच्या त्या वेदनेनें तडफडणाऱ्या आत्म्याला शांति मिळावी म्हणून या भारतभूच्या साऱ्या बालकांना सुख-समृद्धि व शांति मिळण्यासाठीं धडपडलें पाहिजे. सर्वांनींच 'धडपडणारीं मुलें' बनलें पाहिजे.

* * *

# अज्ञानाच्या अंधाराशीं झगडलेला ज्ञानराज भाऊ

महाराष्ट्राचा मराठा हाडाचा लढाऊ, वृत्तीचा कष्टाळू आणि मनाचा मायाळू म्हणून प्रसिद्ध आहे. परंतु या लढाऊ, कष्टाळु, मायाळु माणसाला लक्ष्मी आणि सरस्वतीचा फारसा वरदहस्त नाहीं. पैकीं लक्ष्मीचा वरदहस्त असावाच असा आग्रह नाहीं. पण सरस्वतीचा मात्र असायला हवा. मराठी माणूस आणि अज्ञान याची फार पुरातन दोस्ती. महाराष्ट्र बुद्धिवादी म्हणून ओळखला गेला तरी ज्ञानाची ओळख इथें फार मर्यादित लोकांशींच झालेली. आमच्या मराठी शेतकऱ्याला तुकारामाची गाथा किंवा ज्ञानेश्वराची ज्ञानेश्वरी तोंडपाठ पण ज्ञानेश्वरांतला 'ज्ञ' कोणता हें मात्र सांगतां येणार नाहीं, अशी विचित्र परिस्थिति. त्यामुळेंच बिचाऱ्याच्या नशिबांत अंगठ्याला फार महत्त्व आलें. सहीनिशाणी अंगठा हें आमच्या मराठमोळ्या माणसाचें वैशिष्ट्य. अज्ञानाच्या अंधकारांत ठेंचकळणाऱ्या या जीवांना प्रकाशाचा किरण दाखवणारे कर्मवीर भाऊराव पाटील हे देखील फारसे शिकलेले नव्हते. परंतु जीवनांत ज्ञानाचें महत्त्व किती आहे हें त्यांनीं जाणलें आणि या लढाऊ माणसानें अज्ञानाच्या अंधकाराविरुद्ध जीवनभर लढा दिला.

पुराणांत मयासुराची एक कथा आहे. ह्या असुरानें अत्यंत तप केलें. देव प्रसन्न झाल्यावर वर काय मागावा याचा त्याला विचार पडला. कारण मयासुराला कसलीच इच्छा नव्हती. तेव्हां पृथ्वीवरील लोकांचें कल्याण व्हावें म्हणून त्यानें वर मागितला कीं 'माझें दर्शन घेणाऱ्यांचीं पापें जळून जावोत.' परमेश्वरानें 'तथास्तु' म्हटलें आणि मग पृथ्वीवरचे धूर्त लोक पापें करण्यास चटावले. पापें करायचीं आणि मयासूराचें दर्शन घेऊन पापमुक्त व्हायचें. हें पाहून परमेश्वरानें मयासुरालाच नष्ट करण्याचा विचार केला. मयासुराकडे येऊन परमेश्वरानें यज्ञाला पवित्र जागा मागितली. मयासुरानें अनेक जागा दाखवल्या. पण परमेश्वराला त्या पवित्र वाटेनात. शेवटीं परमेश्वरानें 'सर्वांत पवित्र जागा तुझी पाठ आहे तेव्हां मला तुझ्या पाठीवर यज्ञ करूं दे' असें म्हटलें. दुसऱ्याच्या चांगल्यासाठीं तळमळणाऱ्या मयासुरानें



आनंदानें ती मागणी पूर्ण केली. एकवीस दिवस त्याच्या पाठीवर यज्ञकुंड पेटत होतें. आणि शेवटीं यज्ञांत मयासुराचीच पूर्णाहुति पडली. भाऊरावांचें जीवन पाहिल्यावर मयासुराची कथा आठवली. मराठमोळ्या जनतेला ज्ञान प्राप्त करून देण्यासाठीं भाऊरावांनीं आपल्या जीवनांत ज्ञानयज्ञ पेटवला आणि त्या यज्ञांतच त्यांची पूर्णाहुति पडली. भाऊरावांची तुलना एका असुराबरोबर केली म्हणून कांहीं लोक रागावतीलहि. पण आम्हीं ती मुद्दाम केली आहे. देवांत देवत्व असायचेंच तें नसलें तरच नवल! पण असुरांत जेव्हां देवत्व दिसतें तेव्हां तें नवल असतें. असामान्य कौतुकास्पद असतें.

भाऊरावांच्याजवळ ज्ञानाची जी लालसा होती, समाजासाठीं जीवनभर व्रतस्थ राहण्याची जी तळमळ होती, विधायक कार्य हातीं घेऊन तें यशस्वी करण्याची जी निष्ठा होती ती अपूर्व, अतुलनीय म्हणूनच गौरवास्पद होती. भाऊराव विद्वान् नव्हते, जन्मानें मोठेंपण प्राप्त होणाऱ्या समाजांत जन्मले नव्हते. त्यांचा जन्म साताऱ्याच्या दक्षिण भागांत असलेल्या ऐतवडें गांवच्या पाटील घराण्यांत झाला. जन्मानें ते जैन होते, ही गोष्ट महाराष्ट्र विसरला. माणसाची जात पाहणाऱ्या महाराष्ट्राला ‘आपली जात’ विसरायला लावण्याचें कर्तृत्व गाजवणारे भाऊराव हे एकमेव पुरुष म्हटले पाहिजेत. भाऊरावांचें तरुणपण साताऱ्याच्या परिसरांत गेलें. तरुणपणींचे भाऊराव सत्यशोधक समाजाच्या गरम वातावरणांत वावरत होते. तत्कालीन ब्राह्मण समाजाकडून होणाऱ्या अन्यायाविरुद्ध त्यांनीं बऱ्याच वेळां लढा दिला. औदुंबर येथें दत्त-जयंतीला होणाऱ्या उत्सवांत ब्राह्मण–ब्राह्मणेतर यांच्यामध्यें प्रसाद वांटपाबद्दल जो फरक दाखवला जायचा, त्यामुळें भाऊंच्या तरुण रक्ताला ताव आला. ब्राह्मण भिक्षुकांच्या पंक्ति उठेपर्यंत उन्हांत तिष्ठणाऱ्या भोळ्याभाबड्या शेतकऱ्यांना पाहून त्यांचा जीव कासावीस झाला आणि त्यांनीं प्रसादासाठीं जमलेल्या धान्यावरच बैठक मारली. नंतर त्याचें अन्न शिजवलें आणि भेदाभेद न करतां सर्वांना एका वेळींच वांटून टाकलें. हाच प्रकार सज्जन-गडच्या यात्रेंतहि घडला. अशी बंडखोरी भाऊरावांच्यामध्यें होती हें विशेष, कारण, भाऊराव ज्या जैन समाजांत जन्मले तो समाज जातिभेद, सोंवळें-ओवळें या गोष्टींत अत्यंत कर्मठ. अनेक जैन लोक ब्राह्मणांना देखील अस्पृश्या-समान वागवतात. जैनेतरांच्या हातचें पाणीहि हे लोक पीत नाहींत. त्यांचीं

देवळें, धर्मपीठें फक्त जैनांसाठीं व त्यांतल्याहि विशिष्ट पंथासाठींच खुलीं असतात. अशा कर्मठ समाजांत जन्मून देखील भाऊराव वृत्तीनें सुधारक बंडखोर झाले हें विशेष आहे. एकदां हरिजन मित्राला स्पृश्य सार्वजनिक विहिरीवर पाणी पिऊं देत ना म्हणून विहिरीचा रहाटच त्यांनीं मोडून टाकला. लहानपणीं अस्पृश्यता पाळत नाहींत म्हणून वसतिगृहांतून त्यांची हकालपट्टीहि झाली. या सर्व गोष्टी आज आवर्जून सांगायच्या याचें कारण पुढील जीवनांत भाऊरावांनीं जें अलौकिक कार्य केलें तें आहे.

मनुष्य मोठा झाला कीं, त्याच्या बालपणांत डोकावून मूळापासूनच ह्या माणसांत हें मोठेपण होतें असें दाखवण्याचा अट्टाहास अनेकजण करतात. त्याप्रमाणेंच भाऊरावांच्या जीवनांत डोकावून ते बालपणापासूनच थोर वृत्तीचे असामान्य पुरुष होते, असा शोध आम्हांला लावायचा नाहीं. उलट, तरुणपणीचे-बालपणीचे भाऊराव आणि तदनंतरचे भाऊराव या दोन मनःप्रवृत्तींमधली पराकाष्ठेची भिन्नताच आम्हांला दाखवायची आहे. भाऊराव ही अशी एक व्यक्ति या महाराष्ट्रांत होऊन गेली आहे कीं, तिचा आदर्श नेहमीं डोळ्यापुढें ठेवला जावा. महाराष्ट्रांत ते जन्मले परंतु खरोखर ते कर्नाटकाचेच. कारण, बहुतांशीं या समाजाची वस्ती तिकडेच, त्यांची मातृभाषाहि कानडी. तरीहि भाऊरावांनीं या महाराष्ट्रावर, या मराठी भाषेवर व येथल्या मराठी माणसांवर आत्यंतिक प्रेम केलें हा त्यांचा पहिला विशेष. अल्पशिक्षण मिळालें असतांना 'अर्ध्या हळकुंडानें पिवळें होऊन' आपल्याला जें जमत नाहीं तें सारें तुच्छ, टाकाऊ अशी भावना त्यांनीं ठेवली नाहीं. उलट, आपणाला जमलें नाहीं तरी शिक्षणाचें महत्त्व फार आहे हें जाणून गोरगरीब खेडुतांना शिक्षण मिळवून देण्याची त्यांनीं सोय केली, हा त्यांचा दुसरा विशेष. राजकारणांत मिळालेल्या लोकप्रियतेनें फुगून न जातां राजकारणाचा त्याग करून समाजकारणाला त्यांनी जीवन अर्पण केलें हा त्यांचा तिसरा विशेष.

भाऊरावांनीं *लहानपणीं हूडपणा* केला व तोच कित्ता तरुणपणीं चालू ठेवला. फक्त तरुणपणीं त्यांच्या त्या हूडपणाला थोडीशी सामाजिक पार्श्वभूमि मिळाली. वसतिगृहामध्यें अवेळीं दाढी करण्यांत अधर्म नाहीं अथवा सोवळ्या-ऐवजीं धोतर नेसून जेवायला बसण्यांत काय चुकतें, असें विचारणाऱ्या भाऊंमध्यें आणि कऱ्हाडला ब्राह्मणांच्या विहिरीवर पाणी मिळेना म्हणून अस्पृश्यांकरवीं

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत

अनुक्रम ............ वि: .. ... ..........

त्या विहिरीं[illegible]ळून टाकणाऱ्या भाऊंमध्यें विधायक दृष्टिकोनापेक्षां विध्वंसक दृष्टिकोनच होता अथवा बंडखोरी होती असेंच म्हटलें पाहिजे. थोडीशी धिटाई, थोडासा अविचार आणि तरुण वय ज्यांच्याजवळ आहे, अशांना हें अशक्य नसतें. उलट, अशी बंडखोरी, अशी विध्वंसक अथवा विरोधीवृत्ति प्रत्येक तरुणांतच असते. कालान्तरानें ती नष्ट होते आणि बंडखोर तरुणाचा तक्रारखोर वा कामचुकार कारकून होतो. परंतु तारुण्यांतल्या विध्वंसक बंडखोरवृत्तीचें परिवर्तन जे विधायक बंडखोरींत करतात ते खरे थोर असतात. त्यांच्या मनाचा पिंड हा खराखुरा बंडखोर असतो. त्यांच्या तरुणपणीं बंडखोरींत 'तारुण्याच्या मस्तीचा वा उर्मींचा' अंश कमी असतो, असें म्हणायला हवें.

भाऊराव अशा व्यक्तींपैकीं होते. त्यांची बंडखोरी ही त्यांच्या तळमळणाऱ्या मनांतून स्फुरली होती. भाऊरावांनीं पुढें जें केलें तें केलें नसतें तर समाजानें, कऱ्हाडला विहिरी विटाळणाऱ्या अथवा औदुंबरला ब्राह्मणभोजन बंद पाडणाऱ्या भाऊरावांची स्मृति ठेवली नसती. असे 'टेंपररी बंडखोर' दर काळांत, दर आंदोलनांत अनेक होतात. त्यांचें कौतुक तेवढ्यापुरतें होतें. पण काळाचें एक पाऊल पुढें पडतांच अशा बंडखोरांची आठवण पुसली जाते. भाऊराव बंडखोर होते, परंतु त्यांच्या मनाची बैठक विधायक होती. त्यामुळें तारुण्यांत उठलेली बंडखोरीची वावटळ ओसरतांच त्यांच्या मनांतील विधायक प्रवृत्तींनीं कामाला सुरुवात केली. १९११ च्या सुमारास दुधगांव येथें त्यांनीं भाऊसाहेब कुदळे व मध्वाण्णा मास्तर यांच्या साहाय्यानें एक शिक्षणसंस्था स्थापन केली. त्याचप्रमाणें विद्यार्थ्यांसाठीं एक वसतिगृह स्थापन केलें. अर्थातच ही शाळा व वसतिगृह जातिभेदापासून अलीप्त होतीं. भाऊरावांच्या नव्या जीवनाची व विधायक कामगिरीची मुहूर्तमेढ हीच.

या नंतर नर्ले व काले येथेंहि अशींच वसतिगृहें काढण्यांत आलीं. भाऊरावांचें नांव ज्या रयत शिक्षण संस्थेमुळें साऱ्या भारतभर झालें, त्या संस्थेची स्थापना काले येथेंच १९१९ मध्यें झाली. यानंतर भाऊसाहेबांवर लठ्ठे प्रकरणामुळें संकट गुदरलें. खोटी साक्ष मिळवण्यासाठीं त्यांचा अतोनात छळहि झाला. त्या यमयातनांतून सुटका व्हावी म्हणून तीन वेळां आत्महत्येचा प्रयत्नहि त्यांनीं केला, पण खोटी साक्ष देण्याचें पाप केलें नाहीं. या अग्नि-

दिव्यांतून भाऊराव पार पडले. त्यानंतर त्यांनीं कांहीं दिवस नोकरी केली. ओगले, किर्लोस्कर व कूपर या तिन्ही कारखान्यांना नांवारूपास आणण्यास भाऊरावांचे कष्ट कारणीभूत आहेत. प्रारंभींच्या काळांत माल खपवण्यासाठीं भाऊरावांनीं केलेल्या प्रामाणिक प्रयत्नांमुळेंच या कारखान्यांना स्थिर होतां आलें आहे. पुढें या नोकऱ्यांत भाऊरावांना पुरुषार्थ वाटेना. त्यांनीं सत्यशोधक समाजाचें अनुयायित्व पत्करलें. सत्यशोधक जलसा आणि भाऊरावांचें दणदणीत व्याख्यान अशा कार्यक्रमानें सातारा जिल्हा दूमदुमून गेला. हेंच भाऊरावांचें राजकीय कर्तृत्व व जीवन. या काळांत ते अगदीं दरबारी थाटांत राहात. परीटघडी सुरवार, दरबारी शेरवानी आणि कोल्हापुरी शेमला सोडून ते मिरवत. भाऊराव हे त्यावेळीं पुरेपूर राजकारणी पुढारी होते.

१९१९ साल भारतीय इतिहासांत गाजलें आहे. याच काळांत मॉटफर्ड सुधारणांचा भोपळा फुटला आणि असहकाराची चळवळ सुरू झाली. याच सालीं जालीयनवाला बागेंतील हत्याकांड झालें. याच काळांत गांधीजींच्या जीवनाचा आणि तत्त्वज्ञानाचा परिणाम होऊन अनेक बंडखोर युवकांना समाज-सेवेचा व राष्ट्रोन्नतीचा खरा मार्ग दिसला. भाऊराव गांधींच्या जीवनाच्या व तत्त्वज्ञानाच्या दर्शनानेंच कर्मवीर झाले. मुंबईस भरलेल्या ‘ प्रिन्स ऑफ वेल्स ’ निषेधाच्या सभेस भाऊराव हजर होते. तेथें गांधीजींचा अर्धनग्न देह त्यांनीं प्रथम पाहिला आणि त्यांचें भाषणहि ऐकलें. अंतःकरणांतल्या सत्प्रवृत्तींना जाग आली. इतके दिवस जें केलें त्यापेक्षां हें कांहीं वेगळें आहे, याची मनाला खात्री पटली. महात्म्याच्या दर्शनानें एका संवेदनशील अंतःकरणांत ज्योत पेटली. भाऊरावांनीं स्वतःच्या पोशाखाकडे पाहिलें. आजवरच्या कर्तृत्वाकडेहि पाहिलें आणि निर्णय घेतला. शेमलेदार पटका, सुरवार, शेरवानी त्यांनीं अग्नि-नारायणाला अर्पण केली आणि शुद्ध खादी वापरण्याची शपथ घेतली. केवळ कपडे बदलून भाऊराव थांबले नाहींत, आपली जीवननिष्ठाहि त्यांनीं बदलली. १९१० सालीं दूधगांवला एक शाळा व वसतिगृह त्यांनीं स्थापन केलें होतें, पण पुढें ‘ सत्यशोधक समाजाच्या व सवंग लोकप्रियतेच्या लाटेवर ते स्वार झाले आणि दूधगांवला विसरले. महात्मा गांधींच्या दर्शनानें पुनः त्या पवित्र कार्याकडे त्यांचें मन वळलें. १९१९ सालीं सत्यशोधक समाजाच्या अधिवेशनांत काले येथें त्यांनीं सर्व जाती-जमातीच्या विद्यार्थ्यांसाठीं एक

वसतिगृह स्थापन करण्याची घोषणा केली होती व ती पुरीहि केली. या कार्याला खरी सुरुवात मात्र १९२४ सालच्या दसऱ्याला झाली. सातारा शहरांत एक अस्पृश्य मुलगा घेऊन रयत शिक्षण संस्थेला खरी सुरुवात झाली. दोन तीन वर्षे चिकाटीनें प्रयत्न करून भाऊंनीं ही संस्था नांवारूपाला आणली आणि १९२७ सालीं गांधीजींच्या हस्तेंच तिचें नामकरण झालें.

येथून पुढें भाऊरावांचें जीवन म्हणजे ग्रामीण भागांतील महाराष्ट्रानें अज्ञानमय अंधकाराशीं केलेल्या ज्ञानयुद्धाचाच इतिहास आहे. भाऊरावांनीं जो कार्यक्रम आंखला तो खेडुत गरीब जनतेसाठीं व विशेषतः त्यांतील नव्या पिढीसाठीं म्हणजे विद्यार्थ्यांसाठीं होता. गरिबांतल्या गरीब विद्यार्थ्यालाहि शिक्षण मिळालें पाहिजे ही भाऊरावांची तळमळ. आणि हें शिक्षण, त्या विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करणारें असावें ही त्यांची निष्ठा. म्हणूनच स्पृश्यास्पृश्य विद्यार्थ्यांनीं एका वसतिगृहांत राहावें आणि स्वावलंबनानें व कष्टानें शिक्षण प्राप्त करून घ्यावें हा त्यांच्या संस्थेचा नियम होता. पालकांना शक्य होईल तेवढी मदत त्यांनीं करावी असा भाऊरावांचा आग्रह असे. कारण, आपल्या संस्थेमार्फत जो खरा नाडलेला आहे, गरजू आहे त्यालाच मदत व्हावी हा त्यांचा कटाक्ष होता. पालकांनीं करावयाची मदत केवळ पैशांचे रूपानेंच असावी असा आग्रह नव्हता. कपडे, धान्य वगैरेहि स्वीकारलीं जात. ज्यांना हेंहि शक्य नसे त्यांच्याकडून फक्त सदिच्छांचीच अपेक्षा केली जाई.

कूपर, किर्लोस्कर, ओगले या कारखानदारांकडे नोकरी करतांना अथवा सत्यशोधक समाजाचा प्रचार करतांना भाऊंनीं जेवढे कष्ट घेतले, जेवढी आत्मीयता दाखवली, तेवढीच आत्मीयता या रचनात्मक कार्यांतहि दाखवली. प्रामाणिकपणें कष्ट, प्रामाणिकपणें प्रयत्न करणें हें त्यांचें स्वभाववैशिष्ट्य होतें. त्यामुळें लढाऊ वृत्ति असूनहि शिक्षणासारखें, ज्यामध्यें ताबडतोब परिणाम दिसत नाहीं असें चेंगट काम त्यांनीं उत्साहानें केलें. आपल्या पत्नीच्या गळ्यांतील मंगळसूत्र विकून वसतिगृहांतील विद्यार्थ्यांना अन्न घालण्याचा प्रसंगहि त्यांच्यावर आला, पण भाऊराव डगमगले नाहींत. प्रत्येक अडचणींतून मार्ग काढण्याची त्यांची तयारी असे. ते व्यवहारवादी ध्येयनिष्ठ होते. आपल्या संस्थांमधून शिक्षणाचा नवा प्रयोग त्यांनीं सुरू केला. इतके दिवस जें शिक्षण दिलें जाई तें इंग्रजांनीं घालून दिलेल्या पठडींतलें असे. भाऊरावांना

या शिक्षणाचें तंत्र पटेना. खेड्यांतील युवकांसाठीं वेगळी शिक्षणपद्धति असली पाहिजे. त्या पद्धतींत स्वावलंबनाला, कष्टांना आणि व्यवहाराला जास्त वाव असला पाहिजे असें त्यांना वाटलें. आपल्या संस्थांतून त्यांनीं आपल्या विचारांना मूर्तस्वरूप दिलें. त्यांच्या संस्था सर्वसाधारणपणें शेती करतां येईल अशा जागीं असत. त्यामुळें बांधबंदिस्ती करणें, जमीन साफ करणें आणि पिकें काढणें हीं कामें विद्यार्थी करीत. एवढेंच नव्हे तर दुष्काळ पडला असतां खडी फोडण्याचे कामावरहि विद्यार्थी रुजू होत. शिक्षण शक्य तितकें विद्यार्थ्यांच्या स्वावलंबी प्रयत्नांनीं व्हावें व शारीरिक श्रमांची त्याला संवय व्हावी या हेतूनें ही पद्धति सुरू झाली होती.

भाऊरावांच्या कार्याला हळूहळू चालना मिळाली आणि प्राथमिक शाळांचें जाळें खेडोपाडीं विणलें गेलें. मराठींत एक म्हण आहे. ‘ गांव करील तें राव करणार नाहीं. ’ पण ही म्हण भाऊरावांनीं खोटी करून दाखवली. जें सरकारी यंत्रणेला करणें अशक्य आहे असें कार्य भाऊरावांनीं करून दाखवलें. याच वेळीं मुंबई प्रांतांत ‘ व्हालंटरी शाळा ’ योजना सुरू झाली. भाऊरावां-मधल्या व्यवहारवाद्यानें या योजनेचें महत्त्व ओळखलें आणि या नव्या संधीचा त्यांनीं पुरेपूर उपयोग करून घेतला. अत्यंत मागासलेल्या उपेक्षित अशा खेड्यांत त्यांनीं शिक्षणाची गंगा नेऊन सोडली. यानंतर भाऊरावांनीं अभिनव कार्याचा दुसरा हप्ता सुरू केला. प्राथमिक शाळांनंतर उच्च प्राथमिक, माध्यमिक शिक्षण देण्याची सोय त्यांनीं उपलब्ध करून दिली.

भाऊरावांचें हें कार्य अत्यंत महत्त्वाचें, मोलाचें आहे. नव्या पिढीला जातीयतेच्या घाणींत लडबडूं देणें अनिष्ट आहे हें ओळखून त्यांनीं खेड्यांतील युवकांना स्पृशास्पृश्य भेद विसरायला लावलें. आपली जात विसरून त्यांना जातीपेक्षां महत्त्वाच्या अनेक गोष्टी या जगांत आहेत हें दाखवून दिलें. प्राथमिक शिक्षणापासून महाविद्यालयीन शिक्षणापर्यंत शिक्षण-घेण्याची संधि सामान्यांतल्या सामान्य युवकाला प्राप्त करून दिली आणि खेड्यांतल्या युवकाला शिक्षण घेण्यासाठीं आपलें गांव सोडावें लागूं नये, आपल्या गांवाबद्दलची त्याची आपुलकी शिक्षणामुळें दूर होऊं नये याची काळजी भाऊरावांनीं करून ठेवली आणि शिक्षणामुळें शारीरिक श्रमाचें महत्त्व कमी होत नाहीं हेंहि दाखवून दिलें. या तिन्ही गोष्टी आमच्या पोशाखी

शिक्षणांत नव्हत्या. खेरीज या तिन्ही गोष्टी सात लाख खेडीं असलेल्या या भारताच्या दृष्टीनें फार महत्त्वाच्या आहेत. म्हणूनच भाऊरावांनीं हें एक राष्ट्रीय कार्य केलें आहे यांत संशय नाहीं.

भाऊरावांनीं स्थापन केलेल्या संस्थांचा आणि कार्याचा अपार विस्तार झाला. त्यांच्या कार्याचा भारत सरकारनें गौरव केलाच खेरीज शिक्षण अर्धवट सोडून दिलेल्या या शिक्षण महर्षीला डॉक्टरेट ही पदवी अर्पण करून पुणें विद्यापीठानें त्यांच्या कार्याचें कौतुक केलें. भाऊरावांनीं आपलें कार्य करतांना या गोष्टींची अपेक्षा धरली नव्हती. त्यांच्या उरांत एकच आस होती. हा महाराष्ट्र ज्ञानमय होवो, इथल्या साऱ्या युवकांना ज्ञान मिळो, इथल्या जातीभेदाला मूठमाती मिळो आणि या कार्यासाठीं भाऊराव तिळतिळ तुटले. त्यांच्या धिप्पाड देहालाहि त्यांची धडपड सहन झाली नाहीं. त्यांचें काळीज दुभंगलें. हृदयविकारानें भाऊरावांना घायाळ केलें, पण भाऊरावांना चैन पडेना. रुग्णशय्येवरून ते नव्यानव्या योजनांचे आराखडे तयार करीत. नगर जिल्ह्यांत शंभर शाळा सुरू करण्याचा संकल्प तर मरणाआधीं दोन दिवस त्यांनीं सोडला होता. दुभंगलेल्या काळजाचा हा दुर्दम्य आत्मविश्वास पाहिल्यानंतर मृत्यूलाहि हा माणूस वांकवणार असें वाटलें होतें. भाऊरावांची नजर नव्या नव्या क्षितिजांवर झेपावत होती. नव्या कल्पना गुंफल्या जात होत्या, पण मृत्यूनें त्यांना थांबवलें.

मराठमोळ्या जनतेला अस्सल मऱ्हाटींतून गीतेचें तत्त्वज्ञान सांगून देव-भाषेची कोंडी फोडणाऱ्या ज्ञानेश्वरांनीं समाधि घेतल्यानंतर मराठी माणसाच्या काळजाला ज्या वेदना झाल्या असतील त्याची कल्पना त्या दिवशीं आम्हांला आली. महाराष्ट्राच्या झोपडीझोपडींत ज्ञानाचा दीप लावण्याची मनीषा बाळ-गणारा ज्ञानराज निजधामास गेल्याची वार्ता ऐकली आणि क्षणभर आम्हीं सुन्नच झालों. विश्वामित्राच्या तपश्चर्येची ज्यानें आठवण करून दिली असा हा महर्षि ७३ व्या वर्षी मृत्यूच्या मिठींत शिरला.

मृत्यूचें आम्हांला सदैवच आकर्षण आहे. मृत्यूचा सोहळा व्हावा असें कांहीं लोक म्हणतात. आम्हीं मात्र त्यांच्याशीं सहमत नाही. आम्हांला वाटतें फुलपांखरांचे पंख लावून मृत्यु यावा आणि आळवाच्या पानावरून घरंगळ-

णाऱ्या पाण्याच्या थेंबाप्रमाणें हें जीवन अलगद काळाच्या जबड्यांत घरंगळावें. प्राजक्ताचीं फुलें कशीं कुणाच्या नकळत, पहांटेच्या मंद धुंद वातावरणांत गळून पडतात तसें हें जीवन अलगदपणें गळून जावें आणि मागें उरावी फक्त वेदना. कर्तृत्वाच्या स्मृतींचा गहिरा गंध. जो गंध घेतांच सारें शरीर पुलकित व्हावें आणि हें होत असतांनाच काळजांत मात्र वेदना सलावी. भाऊरावांना असा मृत्यु आला. इतक्या नकळत मृत्यूनें त्यांना मिठींत घेतलें कीं, साऱ्यांनाच धक्का बसला. कुणाचाच विश्वास बसेना या वार्तेवर. काल होते, आज नाहींत—

पण असेंहि म्हणून चालणार नाहीं, भाऊराव काल व्यक्ति होते आज शक्ति होऊन साऱ्या महाराष्ट्रांत भरले आहेत. केवढी त्यांची जीद्द, केवढा त्यांचा जोम, केवढी त्यांची चिकाटी. हा दगडांचा देश. इथल्या पहाडाला आपल्या चिकाटीनें त्यांनीं तडा पाडला आणि त्यांत ज्ञानवृक्षाचें बीज पेरलें. रक्ताचें पाणी घालून त्या बीजाला पोसलें, देहाची पाखर घालून त्या चिमण्या अंकुराचें जतन केलें आणि त्या बीजाचा हा महाप्रचंड वृक्ष झाला तेव्हां मात्र भाऊराव आमच्यांत राहिले नाहींत. ऋषीमुनींच्या कथा आपण वाचतों. संतांच्या कहाण्या ऐकतों, तसाच हा आपल्या काळांत झालेला संत. खेड्यापाड्यांतल्या गरीब मराठमोळ्या युवकांना ज्ञान मिळवून देण्याचें महान कार्य करणारा हा महर्षि. पुढची पिढी पुस्तकांतून वाचील, 'कर्मवीर भाऊराव पाटील हे एक फार मोठे गृहस्थ होऊन गेले. महाराष्ट्रांतल्या खेडोपाडीं त्यांनीं शाळा स्थापन करून महाराष्ट्राला ज्ञानमय करण्याचें कार्य केलें.' पण आपण केवढे भाग्यवान, ह्याची देहीं ह्याची डोळां आपण भाऊरावांना पाहिलें. त्यांच्या कार्याचा वृक्ष फोंफावतांना आपण हयात आहोंत, पण आपल्यावर फार मोठी जबाबदारी आहे. संतमुनींच्या काळांत वावरणारे लोक भाग्यवान असले तरी त्यांच्यावर फार जबाबदारी असते. तुकाराममहाराजांचे काळींच मंबाजीबुवाहि होते. ज्ञानेश्वरांच्या काळांतच त्यांना 'संन्याशाचीं पोरें' म्हणून हिणवणारे—छळणारे ब्राह्मण होते. कर्मवीरांच्या काळांत आपण आहोंत. आपल्याला आपण कुठें आहोंत हें तपासलें पाहिजे.

कर्मवीरांनीं खेडोपाडीं शिक्षणसंस्था स्थापन केल्या. मराठी माणूस निरक्षर राहूं नये, त्याच्या बुद्धीला गंज चढूं नये म्हणूनच भाऊरावांनीं हें व्रत

अंगीकारिलें होतें. त्यांच्या शाळांतून व कॉलेजांतून शिक्षण घेऊन अनेकांनीं स्वतःचा उद्धार करून घेतला. पण त्यांतल्या किती जणांनीं भाऊरावांच्या तत्त्वज्ञानाचा, त्यांच्या निष्ठेचा, त्यांच्या तळमळीचा अंगीकार केला हा महत्त्वाचा प्रश्न आहे. पदवी मिळाली कीं, शहरांतच रमणारे युवक भाऊरावांचे वारस नव्हेत. भाऊरावांच्या मृत्यूनें त्यांचे—युवकांचे नेत्र ओलावले तर तें फक्त 'भाऊराव' या व्यक्तीवरील प्रेमामुळेंच, असेंच आम्ही म्हणूं. पण भाऊराव ही व्यक्ति नाहीं वा नव्हती, तें एक तत्त्वज्ञान होतें. 'सारा महाराष्ट्र साक्षर करूं' असा निश्चय केलेली ती शक्ति होती. त्या निष्ठेवर ज्यांचें प्रेम आहे ते भाऊरावांच्यासाठीं अश्रु ढाळून हातरुमाल भिजवणार नाहींत. ते म्हणतील असा अश्रूंनीं हातरुमाल भिजवण्यांत त्या रुमालाचें वा अश्रूंचें मोल नाहीं. रयत शिक्षण संस्थेंत शिकणाऱ्या एखाद्या चिमुकल्या गरीब मुलाची पाटी पुसण्यासाठीं हा हातरुमाल जर 'बोळा' झाला तर त्याचें खरें मोल आहे.

महाराष्ट्र गरीबांचा आहे. जीर्ण लंगोटी लावून हातांत पाटी घेऊन शाळेंत जाणारे असंख्य रामा-शिवा-गोविंदा इथें आहेत. त्यांना मार्ग दाखवायचा आहे. आठ दिवसांच्या भाकरी गांठोड्यांत बांधून बोर्डिंगमध्यें येणारीं हिम्मतबाज मुलें इथें आहेत. त्यांच्या उरांत जिद्द आहे, ईर्षा आहे, शिकण्याची इच्छा आहे. अशा मुलांसाठीं भाऊरावांनीं स्वतःचा देह जाळला. महाराष्ट्राच्या युवकांना प्रकाश दिसावा म्हणून ते स्वतः जळणारे दिपक बनले. त्या पोरक्या मुलांना पुन्हा प्रकाश दाखवण्यासाठीं कोण पुढें येणार आहे? खेडोपाडीं जाऊन शिक्षक होण्याची कुणाची तयारी आहे? भाऊरावांच्या जीवनाचा अर्थ ज्याला समजला आहे त्याच्या खेरीज इतरांच्या हातून हें काम होणार नाहीं. महात्मा फुले यांचा वारसा घेऊन भाऊराव पुढें आले. स्वतःची जात विसरले. नव्हे, साऱ्या चिकित्सक महाराष्ट्राला त्यांनीं आपली जात विसरायला लावलें. भाऊरावां-खेरीज कुणाला हें जमलें नाहीं. कर्तृत्वाच्या प्रचंड प्रकाशस्रोतामुळेंच हें शक्य झालें. ती हिम्मत पुन्हा दिसणें नाहीं.

भाऊराव गेले, महाराष्ट्राचा ज्ञानराज गेला.—ओंठाजवळ नेलेला घांस तसाच ठेऊन सारा महाराष्ट्र त्यांच्या शेवटल्या दर्शनासाठीं साताऱ्याकडे निघाला. अनवाणी पायांनीं, रखरखीत उन्हाचे चटके सहन करीत चिमणीं-चिमणीं मराठी मुलें भाऊंना पहायला आलीं. काळजांत दाटलेल्या हुंदक्यांनीं



# विधवांच्या वासुदेवा अन् महिलांच्या माधवा

" माझ्या मनानें पसंत केलेल्या या राष्ट्रीय उद्योगासाठीं माझ्या जीवांत जीव आहे तोंपर्यंत परमात्म्यानें मला या संस्थेंत काम करण्याची बुद्धि व सवड द्यावी. माझ्या कल्पनासृष्टींतील चित्र या जन्मींच जडसृष्टींत पाहण्याचें भाग्य जर मला लाभलें नाहीं आणि पुनर्जन्माच्या कल्पनेंत सत्य असलें, तर या वासनेनें युक्त अशा माझ्या जीवात्म्यानें नवशरीर धारण करून प्रारब्धकर्म संपूर्ण करावें, व नंतरच जड शरीराचा त्याग करून परमात्मस्वरूपीं लीन व्हावें. "

मी अगदीं लहान होतों त्यावेळीं माझ्या आजीकडे धनुष्यासारखी वांकलेली एक बाई आणि उंसाच्या चिपाडासारखा पातळ असा एक पुरुष अनेक वेळां यायचा. आल्यावर आजीच्या पलंगावर ती वांकलेली बाई बसायची आणि तो पुरुष पलंगाशेजारीं खुर्ची टाकून बसायचा. बराच वेळ-पर्यंत त्या तिघांच्या गप्पा रंगायच्या. मी मधेंमधें लडबुडत असायचों. गेंगण्या आवाजांत तो पुरुष आजीला विचारायचा हा 'गजाननचा मुलगा ना ?' आणि मग उगीच थांबून घसरणारी चड्डी सांवरत मी त्या माणसाला न्याहळायचों. तीं दोघें जायला निघालीं कीं, आजी नेहमींच एखाद दोन रुपये त्यांच्या हातावर ठेवायची. लगेच तो पुरुष तत्परतेनें पावती फाडून द्यायचा. दर महिन्याला येऊन माझ्या चिकट आजीकडून पैसे काढणारा हा माणूस करतो काय याचें मला नेहमींच कोडें असायचें.

तीं दोघें गेल्यावर मी आजीला म्हणायचों 'हे कोण ग ?' आजी सांगायची, तो 'धोंडू कर्वा' आणि ती त्याची बायको 'बाया कर्वी'. त्या वेळीं मला उंसाचे करवे आणि हे कर्वे असे दोनच कर्वे माहीत होते. या माणसांचा व आपला संबंध काय, असें मी माझ्या आत्याबाईला विचारायचों. ती जें सांगायची तें पेलण्याइतपत माझा मेंदू तेव्हां वाढलेला नव्हता. ती सांगायची, " हे कर्वे सुधारक आहेत. त्यांनीं बायकांसाठीं आश्रम चालवला आहे आणि ती जी बाया कर्वी आहे, ती आपल्या 'बायाजी' सारखी

गदगदलेल्या चेहऱ्यांनीं, आसवांनीं डबडबलेल्या डोळ्यांनीं, मराठी मुलें भाऊंचें शेवटचें दर्शन घेण्यासाठीं जमलीं. त्यांना माणूस बनवणारा महात्मा सोडून गेला होता. पोरकीं झालीं तीं सारीं लेकरें. त्यांच्या चेहऱ्यावर दुःखाची आर्तता होतीच, पण साऱ्या महाराष्ट्राला टाकलेला प्रश्नहि त्यांच्या नजरेंत दिसत होता. भाऊरावांची परंपरा कोण चालवणार ? त्यांचे चिमुकले खांदे जेव्हां समर्थ होतील तेव्हां ते निश्चितच हा भार उचलतील, पण तोंवर कोण ? सर्व सुखांचा त्याग करून हा योग कोण चालवणार ? महाराष्ट्राला ज्ञानमय करण्यासाठीं भाऊरावांनीं सुरू केलेल्या ह्या यज्ञांत सर्वस्वाचें बलिदान कोण करणार ? भाऊरावांच्या निधनामुळें तीव्रतेनें आम्हांला एकच जाणीव झाली. एखादें कार्य ही निष्ठा मानून तिच्यासाठीं सारें जीवन वेचणारीं माणसें कमी कमी होत आहेत. आपल्यापुरतें पाहणाऱ्यांचा वर्ग वाढत आहे. सर्वांसाठीं ' मी ' हें तत्त्वज्ञान लोप पावत आहे. मिशनरी निष्ठेनें कार्य करणारे, पायांतले दगड होण्याची तयारी ठेवणारे आणि जीवन तृणवत् मानून काम करणारे युवक आज दिसत नाहींत. भाऊराव गेले. क्षणभर अश्रू ढाळून का त्यांची उणीव भरून निघणार आहे ? भाऊराव गेले. व्यक्ति म्हणून संपले, परंतु भाऊरावांची तडफ, निष्ठा, चिकाटी आणि कार्य आपल्यासमोर आहे. ज्ञानाचा प्रकाश देण्यासाठीं भाऊरावांनीं ज्ञानदीप पेटवला. सारें आयुष्य त्यासाठीं वेंचलें. तो दीप विझू न देण्यासाठीं स्वतः जळण्याची तयारी असलेले कार्यकर्ते पुढें आले पाहिजेत. भाऊरावांच्या ऋणांतून मुक्त होण्याचा हाच एक मार्ग आहे.

* * *

सोंवळी होती. ( बायाजी माझ्या आजीची बहीण. ती ११ व्या वर्षापासून विकेशा होती व त्याच स्थितींत वयाच्या ९० व्या वर्षी तिचें हें तापसी जीवन संपलें. ) पण कर्व्यांनीं तिच्याशीं लग्न केलें. लग्नांत आमच्या मामांनीं ( माझ्या आजीचे भाऊ श्री. रामभाऊ जोशी यांनीं ) पुढाकार घेतला आणि मोठ्या आईनें ( माझी आजी ) लग्नाचे होमास गृह्याग्नि दिला. कर्वे मोठ्या आईला व आमच्या मामांना आपली बहीण-भाऊ मानतात. " हें ऐकल्यावर मी पुन्हां विचारायचों 'मग बाया कर्वेसारखें बायाजीचें लग्न कां केलें नाहीं ?' त्यावर आत्या सांगायची, "लग्न लावायचेंहि त्या बहीणभावांच्या मनांत होतें. तुझ्या आजीची दुसरी एक कृष्णी नांवाची बहीण होती. तिचा पुनर्विवाह आमच्या मामांनीं ( रामभाऊ जोशी यांनीं ) व मोठ्या आईनीं लावून दिला. म्हणूनच बायाजीला तिच्या सासऱ्यानें या बहीण-भावांकडे येऊं दिलें नाहीं."

हें सगळें ऐकल्यावर त्यांतला अर्थ समजला नाहीं तरी माझ्या लक्षांत येवढें मात्र यायचें कीं, माझी आजी आणि तिच्याकडे येणारी ती पोकीबाई आणि तो चिपाडासारखा माणूस हीं कुणी तरी फार मोठीं माणसें आहेत. आज माझी आजी आणि ती धनुष्यासारखी वांकलेली बाया नाहीं. पण तो त्यावेळीं चिपाडासारखा शुष्क दिसणारा माणूस मात्र, काळाच्या कराल पाशांना स्पर्श करायला भीति वाटावी, असें तेजस्वी जीवन अजून जगतो आहे. महर्षि कर्वे यांची पायधूळ माझ्या घरांत पडली आहे, माझ्या दाराचा उंबरठा त्यामुळें स्वर्गाच्या दाराच्या उंबरठ्याहून पावन झाला आहे, वंदनीय झाला आहे. 'पुंडलीका भेटी परब्रह्म' आलेलें पाहून जो आनंद पुंडलीकाला वाटला असेल, तो आनंद महर्षी माझ्या घरीं आले होते हें जाणून मला अजून होत आहे. ते केवळ माझ्या घरीं आले नव्हते तर माझ्या आजीला त्यांनीं बहीण मानलें होतें. या विधवांच्या वासुदेवाशीं, महिलांच्या माधवाशीं मानलेल्या नात्यानें कां होईना, आपला संबंध लागतो या भावनेंत जी स्फूर्ति आहे, या भावनेंत जें पावित्र्य आहे, त्यामधूनच जीवनाच्या वाटचालींत दोन पावलें टाकण्याइतका उत्साह मला मिळाला आहे.

साऱ्या स्त्री-जातीनें तुळसीवृंदावनाऐवजीं ज्याची रोज पूजा करावी, घराघरांतून ज्याच्या नांवाच्या भूपाळ्या गायल्या जाव्यात अशा अमोल कर्तृत्वाचा हा पुरुष आहे. महाराष्ट्राची ही भूमि महाभाग्यवान् आहे. चम-

चमणाऱ्या ताऱ्यांनीं भरलेल्या आकाशासारखी, फुलांनीं डंवरलेल्या बगीच्या-सारखी ही भूमि आहे. इथें स्वतेजानें चमचमणारीं आणि कीर्तिसुगंधाचा घमघमाट येणारीं अनेक ‘ नक्षत्रफुलें ’ उमललीं आणि कोमेजलींहि. त्यांच्या कीर्तीचा सुगंध अजून इथें रेंगाळतो आहे. आमच्या मस्तकांत शिरून आम्हांला बेहोष करतो आहे. त्यांच्या तेजस्वी जीवनाची झगमग पाहून ‘ नवलाख ’ दिवे उजळले कीं, काय शोभा दिसत असेल याची कल्पना करणें आम्हांला शक्य झालें आहे. स्वतःच्या जीवनाची ज्योत पेटवून अनेक महापुरुषांनीं हा सारा महाराष्ट्र प्रकाशमय करून टाकला आहे म्हणूनच इथें नकलीं नाणीं चालूं शकत नाहींत. त्यांचें बनावट स्वरूप इथें झटकन् उघड होतें. महाराष्ट्रांत परीस नसतील ( कुठेंच नसतात ते ), पण सोन्याचा कस ओळखणारे निकष इथें भरपूर आहेत. त्यामुळें इथल्या प्रत्येक समाजपुरुषाला आपलें जीवन सदैव अग्नि-परीक्षेसाठीं सिद्ध ठेवावें लागतें. आमच्या पुराणांत राजा श्रियाळाची गोष्ट आहे. शंकरानें त्याची जशी परीक्षा घेतली तशी इथल्या साऱ्या समाजपुरुषांची परीक्षा घेतली गेली. शंकर श्रियाळाला म्हणाला, ‘ तुझ्या पोटच्या पोराला तूं आणि तुझ्या बायकोनें उखळांत घालून कुटायचें आणि त्याच्या मांसाचें भोजन माझ्याबरोबर तूंहि ग्रहण करायचेंस व हें करीत असतांना तूं अथवा तुझ्या बायकोनें दुःखाची एखादीहि छटा मनांत येऊं द्यायची नाहीं. तुमच्या डोळ्यांत अश्रु दिसला तर मी अन्नग्रहण न करतां निघून जाईन. ’ श्रियाळ व चांगुणेनें हें दिव्य केलें. स्वतःच्या मुलाला आनंदानें गाणें गात त्यांनीं उखळांत कुटलें. त्याचें सुरेख भोजन शिजवलें आणि पानें मांडल्यानंतर योगीरूपांत आलेल्या शंकरानें सांगितलें, “ अरे श्रियाळा, आतां तूं निपुत्रिक झालास तेव्हां निपुत्रिकाच्या घरीं अन्न घेऊं नये, असा शास्त्रार्थ असल्यानें मी तुझ्याकडे जेवूं शकत नाहीं. ” हें ऐकूनहि श्रियाळानें शांति ढळूं दिली नाहीं. म्हणूनच भगवान् शंकर त्याला प्रसन्न झाले. महा-राष्ट्रांतली जनता ‘ शिवशक्ति ’ नांवानें ओळखली जाते; म्हणूनच इथल्या महापुरुषांची सत्त्वपरीक्षा तिनें अनेक वेळां घेतली असावी, असें आम्हांला वाटतें.

पुराणांतल्या कथा खऱ्याखोट्या कशाहि असोत, त्यांमधून अलौकिक निश्चयाचे, अलौकिक शांति, निष्ठा असलेले जे तपस्वी दाखवले आहेत, तसे निश्चयाचे महामेरू आजहि बघायला सांपडतात. आगरकर, आंबेडकर, फुले

सोंवळी होती. ( बायाजी माझ्या आजीची बहीण. ती ११ व्या वर्षापासून विकेशा होती व त्याच स्थितींत वयाच्या ९० व्या वर्षी तिचें हें तापसी जीवन संपलें. ) पण कर्व्यांनीं तिच्याशीं लग्न केलें. लग्नांत आमच्या मामांनीं ( माझ्या आजीचे भाऊ श्री. रामभाऊ जोशी यांनीं ) पुढाकार घेतला आणि मोठ्या आईनें ( माझी आजी ) लग्नाचे होमास गृह्याग्नि दिला. कर्वे मोठ्या आईला व आमच्या मामांना आपली बहीण-भाऊ मानतात. '' हें ऐकल्यावर मी पुन्हां विचारायचों ' मग बाया कर्वेसारखें बायाजीचें लग्न कां केलें नाहीं ? ' त्यावर आत्या सांगायची, ''लग्न लावायचेंहि त्या बहीणभावांच्या मनांत होतें. तुझ्या आजीची दुसरी एक कृष्णी नांवाची बहीण होती. तिचा पुनर्विवाह आमच्या मामांनीं ( रामभाऊ जोशी यांनीं ) व मोठ्या आईनीं लावून दिला. म्हणूनच बायाजीला तिच्या सासऱ्यानें या बहीण-भावांकडे येऊं दिलें नाहीं.''

हें सगळें ऐकल्यावर त्यांतला अर्थ समजला नाहीं तरी माझ्या लक्षांत येवढें मात्र यायचें कीं, माझी आजी आणि तिच्याकडे येणारी ती पोकीबाई आणि तो चिपाडासारखा माणूस हीं कुणी तरी फार मोठीं माणसें आहेत. आज माझी आजी आणि ती धनुष्यासारखी वांकलेली बाया नाहीं. पण तो त्यावेळीं चिपाडासारखा शुष्क दिसणारा माणूस मात्र, काळाच्या कराल पाशांना स्पर्श करायला भीति वाटावी, असें तेजस्वी जीवन अजून जगतो आहे. महर्षि कर्वे यांची पायधूळ माझ्या घरांत पडली आहे, माझ्या दाराचा उंबरठा त्यामुळें स्वर्गाच्या दाराच्या उंबरठ्याहून पावन झाला आहे, वंदनीय झाला आहे. ' पुंडलीका भेटी परब्रह्म ' आलेलें पाहून जो आनंद पुंडलीकाला वाटला असेल, तो आनंद महर्षी माझ्या घरीं आले होते हें जाणून मला अजून होत आहे. ते केवळ माझ्या घरीं आले नव्हते तर माझ्या आजीला त्यांनीं बहीण मानलें होतें. या विधवांच्या वासुदेवाशीं, महिलांच्या माधवाशीं मानलेल्या नात्यानें कां होईना, आपला संबंध लागतो या भावनेंत जी स्फूर्ति आहे, या भावनेंत जें पावित्र्य आहे, त्यामधूनच जीवनाच्या वाटचालींत दोन पावलें टाकण्याइतका उत्साह मला मिळाला आहे.

साऱ्या स्त्री-जातीनें तुळसीवृंदावनाऐवजीं ज्याची रोज पूजा करावी, घराघरांतून ज्याच्या नांवाच्या भूपाळ्या गायल्या जाव्यात अशा अमोल कर्तृत्वाचा हा पुरुष आहे. महाराष्ट्राची ही भूमि महाभाग्यवान् आहे. चम-

चमणाऱ्या ताऱ्यांनीं भरलेल्या आकाशासारखी, फुलांनीं डंवरलेल्या बगीच्या-सारखी ही भूमि आहे. इथें स्वतेजानें चमचमणारीं आणि कीर्तिसुगंधाचा घमघमाट येणारीं अनेक ' नक्षत्रफुलें ' उमललीं आणि कोमेजलींहि. त्यांच्या कीर्तीचा सुगंध अजून इथें रेंगाळतो आहे. आमच्या मस्तकांत शिरून आम्हांला बेहोष करतो आहे. त्यांच्या तेजस्वी जीवनाची झगमग पाहून ' नवलाख ' दिवे उजळले कीं, काय शोभा दिसत असेल याची कल्पना करणें आम्हांला शक्य झालें आहे. स्वतःच्या जीवनाची ज्योत पेटवून अनेक महापुरुषांनीं हा सारा महाराष्ट्र प्रकाशमय करून टाकला आहे म्हणूनच इथें नकलीं नाणीं चालूं शकत नाहींत. त्यांचें बनावट स्वरूप इथें झटकन् उघड होतें. महाराष्ट्रांत परीस नसतील ( कुठेंच नसतात ते ), पण सोन्याचा कस ओळखणारे निकष इथें भरपूर आहेत. त्यामुळें इथल्या प्रत्येक समाजपुरुषाला आपलें जीवन सदैव अग्नि-परीक्षेसाठीं सिद्ध ठेवावें लागतें. आमच्या पुराणांत राजा श्रियाळाची गोष्ट आहे. शंकरानें त्याची जशी परीक्षा घेतली तशी इथल्या साऱ्या समाजपुरुषांची परीक्षा घेतली गेली. शंकर श्रियाळाला म्हणाला, ' तुझ्या पोटच्या पोराला तूं आणि तुझ्या बायकोनें उखळांत घालून कुटायचें आणि त्याच्या मांसाचें भोजन माझ्याबरोबर तूंहि ग्रहण करायचेंस व हें करीत असतांना तूं अथवा तुझ्या बायकोनें दुःखाची एखादीहि छटा मनांत येऊं द्यायची नाहीं. तुमच्या डोळ्यांत अश्रु दिसला तर मी अन्नग्रहण न करतां निघून जाईन. ' श्रियाळ व चांगुणेनें हें दिव्य केलें. स्वतःच्या मुलाला आनंदानें गाणें गात त्यांनीं उखळांत कुटलें. त्याचें सुरेख भोजन शिजवलें आणि पानें मांडल्यानंतर योगीरूपांत आलेल्या शंकरानें सांगितलें, " अरे श्रियाळा, आतां तूं निपुत्रिक झालास तेव्हां निपुत्रिकाच्या घरीं अन्न घेऊं नये, असा शास्त्रार्थ असल्यानें मी तुझ्याकडे जेवूं शकत नाहीं. " हें ऐकूनहि श्रियाळानें शांति ढळूं दिली नाहीं. म्हणूनच भगवान् शंकर त्याला प्रसन्न झाले. महा-राष्ट्रांतली जनता ' शिवशक्ति ' नांवानें ओळखली जाते; म्हणूनच इथल्या महापुरुषांची सत्त्वपरीक्षा तिनें अनेक वेळां घेतली असावी, असें आम्हांला वाटतें.

पुराणांतल्या कथा खऱ्याखोट्या कशाहि असोत, त्यांमधून अलौकिक निश्चयाचे, अलौकिक शांति, निष्ठा असलेले जे तपस्वी दाखवले आहेत, तसे निश्चयाचे महामेरू आजहि बघायला सांपडतात. आगरकर, आंबेडकर, फुले

हे असे पुरुष होते आणि महर्षि कर्वे यांच्या आजवरच्या जीवनाकडे पाहिलें कीं कळून येतें, महर्षि कर्वे हेहि पुराणांतल्या तपस्वी पुरुषांसारखें जीवन जगणारे, अलौकिक पुरुष आहेत. समाजानें घेतलेल्या सत्त्वपरीक्षेस ते उतरले एवढेंच नव्हे तर, त्यांनीं ज्या इच्छा, आकांक्षा उराशीं बाळगल्या, जें ध्येय, जी निष्ठा आचरली त्या इच्छा तृप्त झाल्या, त्या आकांक्षा सफल झाल्या, तें ध्येय साध्य झालें, ती निष्ठा सार्थ ठरली. हें भाग्य फार थोड्यांना लाभतें. कर्व्यांनीं 'असाध्य तें साध्य' करून दाखवलें आणि हें साध्य होण्यासाठीं जीवनभर त्यांनीं समाजाशीं झगडा दिला.

महर्षींनीं समाजाशीं जो झगडा दिला त्या झगड्याचें स्वरूप अत्यंत वेगळें होतें. महात्मा गांधींनीं शांततापूर्ण सत्याग्रह चळवळ राजकारणांत सुरू करून एक नवी खेळी हिंदी राजकारणांत आणली. अर्थात्, महाराष्ट्रांतल्या समाजपुरुषांना हा आत्मक्लेशाचा मार्ग नवा नव्हता. आमच्या संतांनीं ह्याच मार्गांनीं वाटचाल केली होती. आगरकर, फुले, लोकहीतवादी यांनीं मात्र समाजाला धक्के देऊन जागें केलें. कर्वे यांच्यांत ती वृत्ति, पाहिजे तर धमक म्हणा, नव्हती. त्यांनीं आगरकरादि सुधारकांचीच पताका खांद्यावर घेतली, परंतु त्यांचा मार्ग मात्र पत्करला नाहीं. महर्षींनीं आपली दिंडी या लढाऊ 'वारींतून' बाहेर काढली. या वारींतले धक्केबुक्के सहन करण्याइतकी शारीरिक कुवत आपल्यांत नाहीं, या जाणीवेनेंच त्यांनीं हा मार्ग स्वीकारला असें म्हणवत नाहीं. कारण, महर्षींच्या मानसिक व शारीरिक शक्तीची ओळख आज तरी सर्व महाराष्ट्राला होऊन चुकली आहे. आगरकर, फुले यांनीं घेतलेली पताका ध्येयमंदिरावर नेऊन लावायची हें महर्षींनीं निश्चित केलें. सुधारक विरुद्ध सनातनी यांच्या लठ्ठालठ्ठींत महाराष्ट्राच्या प्रचंड शक्तीचा अपव्यय होत आहे, हें त्यांनीं ओळखलें आणि मग "हें करा तें करा" हें भजन गाणाऱ्या वाचिक माळकऱ्यांच्या माळेतून महर्षि हळूच सटकले. 'आधीं केलें मग सांगितलें' हें व्रत घेऊन विरोध होऊं लागल्यास लठ्ठालठ्ठी न करतां विरोध होणाऱ्या तत्त्वाला प्रसंगीं थोडीं मुरड घालून शेवटीं आपल्या कार्याला त्यांनीं यश मिळवून दिलेंच. महर्षींच्या वाटेवर अनेक धोंडे आडवे पडले परंतु धोंडे तसेच ठेवून हा 'धोंडो' पुढें पुढेंच जात राहिला.

हें सारें महर्षींना साधण्याचें कारण ते खरेखुरे ' योगी पुरुष ' आहेत. योगी पुरुष ही पदवी, आजकाल डोक्याला लावायचीं तेलें बनवणारे आणि राख अंगाला फासून कुठल्याहि धर्मशाळेंत वा देवळांत चिलीम फुंकत बसणारे दीडदमडीचे लोकहि लावतात. त्यामुळें ' योगी पुरुष ' या पदवीची महत्ता थोडी कमी झाल्यासारखी भासते, परंतु भगवद्गीतेच्या सहाव्या अध्यायांत बत्तीसाव्या श्लोकांत योगी पुरुषाचें जें लक्षण सांगितलें आहे. त्या महान् अर्थानें आम्ही महर्षींना योगी पुरुष म्हणत आहोंत.

आत्मौपम्येन सर्वत्र समं पश्यति योऽर्जुन ।
सुखं वा यदि वा दुःखं स योगी परमो मतः ॥

जो दुसऱ्यांना स्वतःचे ठाईं पाहतो आणि दुसऱ्यांच्या सुखदुःखांशीं समरस होतो तोच खरा योगी पुरुष असतो. हें तत्त्व सांगणारे अनेक आहेत. पण ज्या थोड्यांनीं या तत्त्वाला आचरणांत आणलें अशांपैकीं कर्वे एक आहेत. कर्वे यांचें जीवन सरितेसारखें आहे. आजवर अनेक वेळां ही उपमा वापरून झिझवट झाली आहे. परंतु या उपमेला इतकी सार्थता यापूर्वीं प्राप्त झाली नसेल. एक किरकोळ प्रकृतीचा, घुमा, सामान्य बुद्धीचा तरुण. ज्याच्या अस्तित्वाची जाणीवहि कुणाला होणार नाहीं, इतका गुळगुळीत वागणुकीचा. उगमापाशीं सरितेंचें स्वरूप याहून काय वेगळें असतें ? बोटभर जाडीचा तो ओघळ फूटभर टेकाड आलें तरी आपला मार्ग बदलायलाहि त्याची तयारी. पण पुढें जायची, सतत पुढें जायची ओढ. कर्वे यांच्या जीवनांतहि हेंच आपण पाहतों. अत्यंत संथपणें, कुणाच्या लक्षांत, मुद्दाम लक्ष घातल्याखेरीज येणार नाहीं असें त्यांचें कार्य. पण सतत पुढें जाण्याच्या आणि सातत्यानें कार्यरत राहण्याच्या स्वभावामुळेंच आजचें यश ते मिळवूं शकले.

कर्वे ह्या व्यक्तीची मराठी माणसांना जाणीव झाली तो दिवस ११ मार्च १८९३ हा होता. महर्षींचा त्या दिवशीं पुनर्विवाह झाला. निमंत्रण पत्रिकेवर सुधारकाचार्य गो. ग. आगरकर आणि माझ्या वडिलांचे मामा रामभाऊ जोशी यांची सही होती. कर्वे हे खेरखुरे सुशिक्षित होते. जें वाचलें, अभ्यासिलें त्याचा व्यवहारांत उपयोग करावयाचा असतो, हें त्यांनीं जाणलें होतें. म्हणूनच त्याकाळीं जे विचार वृत्तपत्रांतून मांडले जात, त्या विचारांना मूर्तस्वरूप देण्यास ते तयार झाले. या कृश देहाच्या पुरुषांत जी प्रचंड शक्ति व

संवेदनशील अंतःकरण होतें, त्याचें दर्शन त्यावेळीं झालें. आज ही गोष्ट अत्यंत सोपी भासते, परंतु न्या. रानड्यांसारख्या प्रचंड विचारपुरुषालाहि जें आचरणांत आणायची छाती झाली नाहीं, तें कर्व्यांनीं त्यावेळीं करून दाखवलें. कर्वे यांच्यामध्यें एवढें धैर्य, एवढी मानसिक शक्ति कुठून आली, हें पाहायला त्यांच्या यापूर्वींच्या आयुष्यांत थोडी नजर फेंकावी लागेल. यापूर्वींचें कर्वे यांचें आयुष्य समाजाच्या दृष्टीआड होतें, परंतु कर्वे या काळांतच भावी आयुष्यासाठीं लागणारी सामुग्री गोळा करीत होते. मुरुडफंड ही कर्वे यांची एक लहानशी परंतु नमुनेदार आदर्श कामगिरी म्हणतां येईल. मॅट्रिकच्या वर्गांत असतांनाच कर्वे यांना ह्या फंडाची कल्पना सुचली. कोकण हा प्रांत असा आहे कीं, इथली बहुतेक कर्ती मंडळी बाहेर असतात. अशा मंडळींच्या आर्थिक साहाय्यानें त्यांच्याच गांवाचा विकास करतां येईल अशी कर्वे यांची कल्पना. ही कल्पना त्यांनीं आपल्याच गांवाच्यापासून मूर्त स्वरूपांत आणायचें ठरवलें. त्यासाठीं दामले नांवाच्या आपल्या मित्राचे मदतीनें कर्वे यांनीं इतरत्र गेलेल्या मुरुडकरांना पत्रें लिहून आपली कल्पना कळविली. परंतु या पत्रांची, 'पोरासोरांचे उद्योग' अशी संभावना झाली. कर्वे यांच्या कल्पनेला कुणाचाच पाठिंबा मिळाला नाहीं. निराश न होतां थोडा काळ थांबून चार वर्षांनीं पुन्हां आपल्या दोन मित्रांसह त्यांनीं या कार्याला हात घातला. या वेळीं मात्र त्यांच्या प्रयत्नांस यश आलें. मुरुडांतून बाहेर पडलेल्या आणि इतरत्र कारकून, मास्तर, गुमास्ते अशीं सामान्य कामें करणाऱ्या ब्राह्मण मंडळींनीं रुपयाला एक पै याप्रमाणें वर्गणी देऊन आजवर हा 'फंड' जमवला. या फंडांतून मुरुड गांवांत अनेक सुधारणा घडवून आणणें सहज शक्य झालें. धर्मशाळा, पिण्याच्या पाण्याची सोय, अशीं कित्येक कामें या फंडांतून केलीं गेलीं. या फंडाचा आंकडा आज हजाराच्या संख्येंत सांगितला जातो. परंतु कर्वे यांनीं ज्यावेळीं ह्या फंडाची कल्पना मांडली व तो सुरू केला तेव्हां 'पै फंड' म्हणून आजूबाजूच्या गांवकऱ्यांनीं त्यांची टिंगल केली होती. 'मुरुडफंड' हें खेड्यापाड्यांतून शहरांत येणाऱ्या अनेक कामगारांना आदर्श म्हणून सांगतां येण्याजोगें कार्य आहे. अल्प वर्गणींतून सहज सुलभतेनें आपल्या गांवाचा विकास घडवण्यास मदत करणारा हा मार्ग अनुकरणीय आहे. महर्षि कर्वे यांच्या सूक्ष्म दृष्टीचें हा फंड हें एक

उत्तम उदाहरण आहे. याच धर्तीवर छोटीं छोटीं पण कर्वे यांच्या धडपडीचें व तळमळीचें दर्शन घडविणारीं अनेक कामें दाखवितां येतील. मुरुडचें शालागृह, दुर्गादेवीच्या मंदिराची व्यवस्था, स्नेहवर्धक मंडळी अशा कामांतूनच कर्वे यांच्या व्यक्तित्वाचा विकास होत गेला.

जन्मतांच सूर्यमंडळाचा ग्रास घेण्यासाठीं उड्डाण ठोकणारे हनुमंत आणि अगदीं बाळपणापासून स्वतःच्या व्यक्तित्वानें इतरांना दिपवून टाकणारे महाभाग फार थोडे असतात व त्यांचें कौतुक करायचेंहि कारण पडत नाहीं. कारण, त्यांना ती देणगीच मिळालेली असते. ईश्वरदत्त अथवा जन्मदत्त गोष्टींचें कौतुक तें कसलें करायचें? तिचें कौतुक ज्याला ती प्राप्त होते त्यानेंच करावें. परंतु जो आपल्या सामान्य जीवनाचा स्वप्रयत्नानें विकास करून त्याला असामान्यत्व प्राप्त करून देतो त्याचें कौतुक करायलाच हवें. महर्षी कर्वे हे दुसऱ्या प्रकारांत मोडणारे पुरुष आहेत. त्यांनीं स्वतःच्या जीवनाचा स्वतःच्या प्रयत्नांनीं विकास करून घेतला आहे. सामान्य माणसांतून त्यांचें असामान्य व्यक्तित्व उमललें. आपल्या कार्यावर विश्वास ठेवून अविश्रांत चिकाटीनें व अविचलित निष्ठेनें ते झटत राहिले. तसा विश्वास, तशी चिकाटी, तशी निष्ठा अत्यंत दुर्मिळपणें पाहायला सांपडते. १८९३ सालीं कर्वे यांनीं पुनर्विवाह केला; त्या वेळींच त्यांनीं आपल्या पुढील जीवनाचें ध्येय ठरवून टाकलें होतें. 'जें मला पटलें तें मीं केलें. ज्याला पटेल त्यानें करावें, न पटेल त्यांनीं करूं नये.' अशी धीमी पण खंबीर वृत्ति कर्वे यांचेजवळ होती. त्यांनीं आपल्या पुनर्विवाहाचें स्तोम माजवलें नाहीं अथवा विरोधकांच्या कोल्हेकुईला उत्तर देण्याचे भानगडींतहि ते पडले नाहींत. "खऱ्या ब्रह्मबीजा ब्राह्मण बच्चाकडून असें कधींहि व्हावयाचें नाहीं." इथपर्यंत कुजकट टीका वृत्तपत्रांतून झाली. पण कर्वे यांनीं चिखलांत दगड टाकला नाहीं. त्यांच्या कृत्याबद्दल त्यांना पूर्णपणें खात्री होती आणि भवितव्याबद्दल त्यांच्या मनांत निश्चित कल्पना होती. कर्वे यांचा या विवाहानंतर जो छळ झाला त्याची कल्पना केली तरीहि जीव कासावीस होतो. कर्वे यांनीं तो सारा छळ सोसला आणि शांतपणें सर्व समाजाच्या रागाला तोंड दिलें. त्या वेळीं केसरींत एक स्फुट प्रसिद्ध झालें. त्यांत असें म्हटलें होतें:—

" वस्तुतः पुनर्विवाहासारखें वरेंवाईट कृत्य करण्याला मोठेसें धैर्य लागतें असें नाहीं; तर तें करून गेल्यानंतर समाजाकडून होणारा त्रास, मनाची समता व शांतता न ढळूं देतां निमुटपणें सोसण्यांतच सुधारकांच्या नीतिधैर्याची खरी परीक्षा व्हावयाची असते. टाकीचे घाव सोसल्याखेरीज देवपण येत नाहीं. त्याचप्रमाणें सुधारणेप्रीत्यर्थ वर्तमानपत्रांत पोकळ बडबड केल्यानें किंवा एखादा पुनर्विवाह लावल्यानें सुधारक म्हणविण्याची पात्रता येत नाहीं; तर पुढील हालअपेष्टांतून न डगमगतां जो पार पडेल, त्याचेंच आम्ही अभिनंदन करूं. प्रो. कर्वे यांची सुधारणेची कळकळ कसोटीस लागण्याचा प्रसंग अजून पुढेंच आहे. त्यांतून ते बिनधोक पार पडल्यास इतर समानशीलांपेक्षां त्यांना आम्ही वरच्या पायरीस बसवूं. परंतु तशी खात्री होईपर्यंत मौन धरणेंच आम्हांस बरें वाटतें."

केसरीकारांनीं ज्यासाठीं हें धूर्त मौन त्यावेळीं स्वीकारलें होतें ती कसोटी महर्षींनीं दिली, येवढेंच नव्हे तर कर्वे हे खरेखुरे सुधारक आहेत आणि ते 'भारतरत्न' आहेत हें पाहण्याचें व छापण्याचें 'भाग्यहि' केसरीला लाभलें.

केसरीसारख्या महाराष्ट्राच्या ज्येष्ठ पत्रानें कर्वे यांच्यापासून फार मोठी अपेक्षा बाळगली आणि तत्कालीन समाजानें त्यांचा छळ करून त्यांच्या कार्यावरील त्यांची निष्ठा प्रखर केली म्हणूनच त्यांना आपलें कार्य तडीस नेण्याची जिद्द प्राप्त झाली. आपल्या आत्मचरित्रांत पुनर्विवाहानंतर मनांत आलेले विचार सांगतांना कर्व्यांनीं असें म्हटलें आहे कीं, " मी अतिशय मोठी जबाबदारीची गोष्ट केली आहे व आतां मला आयुष्याचा उपयोग, ही जबाबदारी ओळखून केला पाहिजे, असे विचार माझ्या मनांत येऊं लागले. जी गोष्ट मीं केली, तिनें मी कृतकृत्य झालों नसून माझ्या कार्याला केवळ प्रारंभ झाला आहे, असें मला वाटूं लागलें. ज्या महत्कार्याशीं मी निगडित झालों आहें, त्याला उज्ज्वल स्वरूप येईल, असें माझ्या हातून कांहीं तरी घडावें, अशी इच्छा मला उत्पन्न झाली." मोठेपणा प्राप्त झाल्यानंतर जबाबदारीची जाणीव विसरणारे अनेकजण असतात. परंतु कर्वे यांच्या मनावर जे संस्कार झाले होते त्यामुळें त्यांनीं आपल्यावरील जबाबदारी ओळखली. आपला हा पुनर्विवाह यशस्वी होण्यावर या समाजांतील सुधारणेची फार

मोठी भिस्त आहे ही टोंचणी लागली, तशीच टोंचणी बाया तथा आनंदीबाईंनाहि होती हें महाराष्ट्राचें भाग्य.

महर्षि कर्वे यांनीं यानंतर पुनर्विवाहाच्या प्रश्नावर जनमत जागृत करण्यासाठीं कांहीं वर्षें कार्य केलें. हें कार्य करीत असतांना त्यांच्या लक्षांत एक गोष्ट येऊन चुकली कीं, ' सुशिक्षण व नीतिमत्ता यांची समाजांत–विशेषतः स्त्रीसमाजांत-वाढ झाल्यावांचून कुठल्याहि सुधारणेची प्रगति होणार नाहीं. ' पुनर्विवाहाच्या प्रश्नाशीं झगडत राहून जितक्या विधवांना कष्टमय जीवनांतून बाहेर काढतां येणें शक्य आहे, त्यापेक्षां शिक्षणाचा प्रश्न हातीं घेतला असतां किती तरी पट अधिक विधवांना कष्टमय जीवनांतून वर काढतां येईल याची त्यांना खात्री पटली आणि हें पटतांच कर्वे यांनीं विधवा शिक्षणाचें कार्य हातीं घेतलें. यापूर्वींच पंडिता रमाबाईनीं शारदाश्रम सुरू केला होता, परंतु शारदाश्रमद्वारां खिश्चनधर्म प्रसाराची चळवळ चालवली जाऊं लागतांच महाराष्ट्रांत प्रचंड वावटळ उठली. पंडिता रमाबाई व खिस्ती मिशनऱ्यांना शिव्याशाप दिले गेले परंतु त्यांनीं स्त्रीशिक्षणाचें जें कार्य चालवलें होतें, तशा प्रकारचें कार्य करण्याची जरुरी कुणाला वाटली नाहीं. कर्वे यांना मात्र पंडिता रमाबाईंच्या कार्याची महत्ता पटली होती, म्हणूनच महर्षींनीं १३ एप्रिल १८९५ रोजीं ' विधवा विवाह प्रतिबंध मंडळाचे ' आश्रयाखालींच विधवांना शिक्षण देण्यासाठीं ' विधवागृह ' काढण्याचा ठराव करून घेतला. पुढें १४ जून १८९६ रोजीं सोळा गृहस्थांचे उपस्थितींत ' अनाथबालिकाश्रमाची मंडळी ' स्थापन करण्यांत आली. ह्या कार्यासाठीं दुसऱ्यापुढें हात पसरावे लागणार होते. स्वतः कांहीं केल्यावांचून दुसऱ्याजवळ वर्गणी मागण्याचा आपणाला हक्क उत्पन्न होत नाहीं अशी कर्वे यांची विचारसरणी असल्याकारणानें आपली आजवरची सर्व शिल्लक त्यांनीं या कार्यासाठीं देऊन टाकली. या वृत्तीमुळेंच कर्वे यांनीं कुणापुढें संस्थेसाठीं हात पसरला आणि तो वायां गेला असें झालें नाहीं. आपल्या संस्थेला स्थैर्य प्राप्त करून देण्यासाठीं महर्षींनीं प्रचंड पायपीट केली आणि या गरीब महाराष्ट्राच्या श्रीमंत मनांची गुंफण करून आपल्या आश्रमाची आर्थिक बाजू भरभक्कम केली. प्रथम आश्रम सदाशिव पेठेंत होता, पण १८९९ सालांत प्लेग सुरू झाल्यानें तो हिंगणें येथें हालवण्यांत आला. रा. ब. गोखले नांवाच्या

" वस्तुतः पुनर्विवाहासारखें बरेंवाईट कृत्य करण्याला मोठेसें धैर्य लागतें असें नाहीं; तर तें करून गेल्यानंतर समाजाकडून होणारा त्रास, मनाची समता व शांतता न ढळूं देतां निमुटपणें सोसण्यांतच सुधारकांच्या नीतिधैर्याची खरी परीक्षा व्हावयाची असते. टाकीचे घाव सोसल्याखेरीज देवपण येत नाहीं. त्याचप्रमाणें सुधारणेप्रीत्यर्थ वर्तमानपत्रांत पोकळ बडबड केल्यानें किंवा एखादा पुनर्विवाह लावल्यानें सुधारक म्हणविण्याची पात्रता येत नाहीं; तर पुढील हालअपेष्टांतून न डगमगतां जो पार पडेल, त्याचेंच आम्ही अभिनंदन करूं. प्रो. कर्वे यांची सुधारणेची कळकळ कसोटीस लागण्याचा प्रसंग अजून पुढेंच आहे. त्यांतून ते बिनधोक पार पडल्यास इतर समानशीलांपेक्षां त्यांना आम्ही वरच्या पायरीस बसवूं. परंतु तशी खात्री होईपर्यंत मौन धरणेंच आम्हांस बरें वाटतें. "

केसरीकारांनीं ज्यासाठीं हें धूर्त मौन त्यावेळीं स्वीकारलें होतें ती कसोटी महर्षींनीं दिली, येवढेंच नव्हे तर कर्वे हे खरेखुरे सुधारक आहेत आणि ते 'भारतरत्न' आहेत हें पाहण्याचें व छापण्याचें 'भाग्यहि' केसरीला लाभलें.

केसरीसारख्या महाराष्ट्राच्या ज्येष्ठ पत्रानें कर्वे यांच्यापासून फार मोठी अपेक्षा बाळगली आणि तत्कालीन समाजानें त्यांचा छळ करून त्यांच्या कार्यावरील त्यांची निष्ठा प्रखर केली म्हणूनच त्यांना आपलें कार्य तडीस नेण्याची जिद्द प्राप्त झाली. आपल्या आत्मचरित्रांत पुनर्विवाहानंतर मनांत आलेले विचार सांगतांना कर्व्यांनीं असें म्हटलें आहे कीं, " मी अतिशय मोठी जबाबदारीची गोष्ट केली आहे व आतां मला आयुष्याचा उपयोग, ही जबाबदारी ओळखून केला पाहिजे, असे विचार माझ्या मनांत येऊं लागले. जी गोष्ट मीं केली, तिनें मी कृतकृत्य झालों नसून माझ्या कार्याला केवळ प्रारंभ झाला आहे, असें मला वाटूं लागलें. ज्या महत्कार्याशीं मी निगडित झालों आहें, त्याला उज्ज्वल स्वरूप येईल, असें माझ्या हातून कांहीं तरी घडावें, अशी इच्छा मला उत्पन्न झाली. " मोठेपणा प्राप्त झाल्यानंतर जबाबदारीची जाणीव विसरणारे अनेकजण असतात. परंतु कर्वे यांच्या मनावर जे संस्कार झाले होते त्यामुळें त्यांनीं आपल्यावरील जबाबदारी ओळखली. आपला हा पुनर्विवाह यशस्वी होण्यावर या समाजांतील सुधारणेची फार

मोठी भिस्त आहे ही टोंचणी लागली, तशीच टोंचणी बाया तथा आनंदीबाईनाहि होती हें महाराष्ट्राचें भाग्य.

महर्षि कर्वे यांनीं यानंतर पुनर्विवाहाच्या प्रश्नावर जनमत जागृत करण्यासाठीं कांहीं वर्षे कार्य केलें. हें कार्य करीत असतांना त्यांच्या लक्षांत एक गोष्ट येऊन चुकली कीं, 'सुशिक्षण व नीतिमत्ता यांची समाजांत—विशेषतः स्त्री-समाजांत-वाढ झाल्यावांचून कुठल्याहि सुधारणेची प्रगति होणार नाहीं.' पुनर्विवाहाच्या प्रश्नाशीं झगडत राहून जितक्या विधवांना कष्टमय जीवनांतून बाहेर काढतां येणें शक्य आहे, त्यापेक्षां शिक्षणाचा प्रश्न हातीं घेतला असतां किती तरी पट अधिक विधवांना कष्टमय जीवनांतून वर काढतां येईल याची त्यांना खात्री पटली आणि हें पटतांच कर्वे यांनीं विधवा शिक्षणाचें कार्य हातीं घेतलें. यापूर्वींच पंडिता रमाबाईनीं शारदाश्रम सुरू केला होता, परंतु शारदाश्रमद्वारां ख्रिश्चनधर्म प्रसाराची चळवळ चालवली जाऊं लागतांच महाराष्ट्रांत प्रचंड वावटळ उठली. पंडिता रमाबाई व ख्रिस्ती मिशनऱ्यांना शिव्याशाप दिले गेले परंतु त्यांनीं स्त्रीशिक्षणाचें जें कार्य चालवलें होतें, तशा प्रकारचें कार्य करण्याची जरुरी कुणाला वाटली नाहीं. कर्वे यांना मात्र पंडिता रमाबाईच्या कार्याची महत्ता पटली होती, म्हणूनच महर्षींनीं १३ एप्रिल १८९५ रोजीं 'विधवा विवाह प्रतिबंध मंडळाचे' आश्रयाखालींच विधवांना शिक्षण देण्यासाठीं 'विधवागृह' काढण्याचा ठराव करून घेतला. पुढें १४ जून १८९६ रोजीं सोळा गृहस्थांचे उपस्थितींत 'अनाथबालिकाश्रमाची मंडळी' स्थापन करण्यांत आली. ह्या कार्यासाठीं दुसऱ्यापुढें हात पसरावे लागणार होते. स्वतः कांहीं केल्यावांचून दुसऱ्याजवळ वर्गणी मागण्याचा आपणाला हक्क उत्पन्न होत नाहीं अशी कर्वे यांची विचारसरणी असल्याकारणानें आपली आजवरची सर्व शिल्लक त्यांनीं या कार्यासाठीं देऊन टाकली. या वृत्तीमुळेंच कर्वे यांनीं कुणापुढें संस्थेसाठीं हात पसरला आणि तो वायां गेला असें झालें नाहीं. आपल्या संस्थेला स्थैर्य प्राप्त करून देण्यासाठीं महर्षींनीं प्रचंड पायपीट केली आणि या गरीब महाराष्ट्राच्या श्रीमंत मनांची गुंफण करून आपल्या आश्रमाची आर्थिक बाजू भरभक्कम केली. प्रथम आश्रम सदाशिव पेठेंत होता, पण १८९९ सालांत प्लेग सुरू झाल्यानें तो हिंगणें येथें हालवण्यांत आला. रा. ब. गोखले नांवाच्या

एका दिलदार माणसानें ही जागा दिली होती. या जागेंत आल्यापासून आश्रमाची प्रगति होत गेली. कारण, आपल्या मुलांबाळांवर अण्णांनीं जेवढें प्रेम केलें नसेल तेवढें आपल्या संस्थांवर केलें.

हिंगण्याला आश्रम गेल्यानंतर दररोज कॉलेजांतलें काम आटपून संध्या-काळीं ते आश्रमांत जात व रात्रभर तेथें राहून पहांटेच वरच्या वर्गांतील मुलींचे वर्ग घेऊन पुन्हां पुण्यास येत. थंडी, वारा, पाऊस यांची तमा न करतां हा नियम ते पाळीत असत. घरांत बायको, अगर मुलांपैकीं कुणी आजारी असलें तरी घरच्या मंडळींना तसेंच सोडून त्यांना हिंगण्याला जावें लागे. अशा वेळीं त्यांचें अंतःकरण भरून येई, डोळ्यांतून अश्रू गळूं लागत, पाय जड होत, पण कठोर वृत्तीनें पावलें हिंगण्याचे आश्रमाकडेच पडत. ‘ माझ्या संस्था मला आप्ताहून अगर प्राणांहूनहि प्रिय वाटतात ’ असं अण्णा म्हणत. संस्थांवर येवढें प्रेम करणारीं माणसें सांपडणार नाहींत. या दरिद्री महाराष्ट्रांत अनेक नामवंत संस्था मोठ्या मानानें मिरवतांना दिसतात, त्याचें कारण हेंच आहे. मराठी माणसाचा हा विशेष आहे. घरादाराकडे, बायकापोरांकडे आणि स्वसुखाकडे पूर्ण दुर्लक्ष करून आपल्याला प्रिय असलेल्या संस्थेच्या हिताची देखभाल करण्यांत धन्यता मानणारे पुरुष या भूमींत फार मोठ्या प्रमाणांत पैदास होतात हें आम्हांला भूषण आहे. ‘ अनाथ बालिकाश्रम ’ स्वतंत्रपणें कार्य करूं लागल्या-नंतर आठ वर्षांनीं कर्वे यांनीं महिलांना शिक्षण देण्यासाठीं आश्रमाच्या धर्ती-वरच परंतु आश्रमापासून निराळी अशी ‘ महिला विद्यालय ’ ही संस्था सुरू केली. इतर संस्थांसाठीं कर्वे यांनीं ज्याप्रमाणें हाडाचीं काडें करून कष्ट केले तसेंच या संस्थेसाठींहि केले. म्हणूनच ही संस्था देखील नांवारूपाला आली. पुढें या विद्यालयाचीहि हिंगण्याला आश्रमाशेजारींच प्रस्थापना करण्यांत आली. यानंतर ‘ निष्काम कर्ममठ ’ नांवाची ‘ करवेल तेवढा स्वार्थत्याग ’ ही मुख्य कल्पना असलेली एक संस्था कर्वे यांनीं स्थापन केली. संस्था स्थापन करणें, त्यासाठीं देह झिजवून ती नांवारूपाला आणणें हा कर्वे यांचा छंद आहे, असें वाटावें इतक्या संस्था त्यांनीं स्थापन केल्या आहेत. मात्र कर्वे यांनीं स्थापन केलेलें ‘महिला विद्यापीठ’ हें या महाराष्ट्राचेंच नव्हे तर, साऱ्या भारताचेंच भूषण आहे. हें विद्यापीठ स्थापन करण्याची कल्पना त्यांना जपानमधील विद्यापीठावरून सुचली. महाराष्ट्रांत अशा तऱ्हेचें विद्यापीठ

स्थापन करण्याचा निश्चय महर्षींनीं केला त्यावेळीं ते पूर्वीसारखे तरुण नव्हते. उलट आयुष्याच्या उतरणीलाच सुरुवात झाली होती, परंतु अण्णा हे ध्येयनिष्ठ होते. अशीं माणसें भवितव्याच्या अंधारांत बेधडकपणें उडी घेतात. अनेक मित्रांचा विरोध असतांनाहि महर्षींनीं आपल्या कल्पनेला मूर्त स्वरूप आणून देण्यासाठीं कंबर कसली. कांहि करून, कुठलाहि धोका पत्करून महिला विद्यापीठाच्या कल्पनेला मूर्त स्वरूप आणण्याचा निश्चय केला. कदाचित त्यांचे पदरीं अपयश देखील आलें असतें, परंतु प्रामाणिक प्रयत्न करूनहि अपयश आलें तर तें सहर्ष स्वीकारायला ते तयार झाले. सामाजिक परिषदेच्या व्यासपीठावरून त्यांनीं या प्रश्नाचा विचार करण्यासाठीं कांहीं मंडळींची बैठक बोलावली. रँगलर परांजपे, प्रो. के. रा. कानिटकर, हरिभाऊ आपटे वगैरे मंडळी यांत होती. या बैठकींत महाराष्ट्रास मराठींतून शिक्षण देणारें महिला विद्यापीठ स्थापन करण्याचें निश्चित झालें. दादासाहेब कानिटकरांनीं या कार्यासाठीं ताबडतोब ३०० रुपये देणगी देऊन टाकली. महर्षींच्या कार्याला चालना मिळाली. अनेकजणांना ते भेटले. महात्मा गांधींचीहि त्यांनीं भेट घेतली. त्यांच्या अविरत प्रयत्नामुळें आणि आत्यंतिक निष्ठेमुळेंच महिला विद्यापीठ उभें राहिलें. ९ महिन्यांपूर्वी जी केवळ कल्पना होती आणि जिच्या फोलपणाबद्दल सर्वांची खात्री पटली होती त्या महिला विद्यापीठाच्या सिनेटची पहिली बैठक ३ जून १९१६ रोजीं पुण्याला झाली आणि महाराष्ट्राचें मानचिन्ह म्हणून गणलें जाणारें, मातृभाषेंतून शिक्षण देणारें भारतांतलें पहिलें महिला विद्यापीठ निर्माण झालें. कर्वे यांच्या कार्याला नवें क्षितीज मिळालें. खेडोपाडीं घराघरांतून साठीच्या घरांत आलेला हा पिळदार म्हातारा हिंडला. मराठी माणसांनीं या दारीं आलेल्या योगीराजाचें स्वागत केलें. कर्वे यांच्यावर देणग्यांची बरसात झाली. महिला विद्यापीठाच्या पहिल्या सालअखेरीच्या ताळेबंदामध्यें शिल्लक खातीं २१६०४१–१०–५ इतकी रक्कम दाखवली गेली. कर्वे यांच्या कार्यशक्तीचाच हा प्रचंड विजय होता. एकुलता एक माणूसदेखील किती काम करून दाखवूं शकतो याचें हें मूर्त उदाहरण होतें.

कर्वे यांचें कार्य पाहिल्यानंतर मुंग्यांनीं माणसाच्या उंचीएवढीं वारुळें बांधल्याचें देखील अम्हांला कौतुक वाटेनासें झालें आहे. कर्वे ही एक मानवी मुंगीच आहे. मुंग्या ज्याप्रमाणें मचमच न करतां नुसत्या क्षणभर एकमेकीला

भेटतात आणि सातत्यानें काम करीत राहतात, तसेंच काम महर्षींनीं केलें. लेखनांत, भाषणांत आणि पत्रकें-खुलासे करण्यांत त्यांनीं आयुष्य दवडलें नाहीं. ते माणसामाणसाला भेटले, आपले विचार त्यांनीं एकेकाला गांठून सांगितले आणि त्यांचें हृदय जिंकून आपल्या कार्याला मदत मिळविली. आमच्या मतें महर्षींइतका ‘ पर्सनल कॉंटॅक्ट ’ महाराष्ट्रांत तरी दुसऱ्या कुणीं केला नसेल. महाराष्ट्रांतलीं अनेक प्रकारचीं, अनेक विचारांचीं, अनेक वयांचीं माणसें त्यांनीं पाहिलीं. त्यांचे विचार त्यांनीं समजावून घेतले. म्हणूनच ‘ मराठी माणसाचें मन ’ त्यांना समजलें आहे. नुकतेंच पं त नेहरूंना त्यांनीं जें महाराष्ट्राचें मनोगत ऐकवलें त्यावरून तर हें उघडच झालें आहे. कर्वे यांच्या महाराष्ट्रप्रेमाचें, स्पष्टवक्तेपणाचें आणि धैर्याचें त्यांत दर्शन झालेंच झालें, पण महाराष्ट्राच्या या वयोवृद्ध, तपोवृद्ध, कर्मवीराला आपल्यावरील जबाबदारीचा अजून विसर पडलेला नाहीं हेंहि त्या वेळीं स्पष्ट झालें.

कर्वे यांची तळमळ, त्यांत रंगून जाण्याचा स्वभाव पाहिल्यानंतर आर्कीमिडीज अथवा पाणिनींच्या जीवनाची आठवण होते. अशीं माणसें आपल्याभोंवतीं स्वतःचें वेगळेंच विश्व तयार करतात. जीवनभर त्या वेगळ्या विश्वांतच ते वावरत असतात. आर्कीमिडीज शत्रूचे सैनिक कत्तली करीत असतांनाहि भूमितींतील आकृती वाळूंत सोडवत बसला होता आणि त्या तल्लीन अवस्थेंतच त्याचें जीवन संपलें. पाणिनीची अशीच अवस्था झाली. आश्रमांत विद्यार्थ्यांना शब्दांची व्युत्पत्ती सांगतांना प्रत्यक्ष वाघच तिथें अवतरला. सारे शिष्य जीव घेऊन पळाले, पळतांना गुरूला सावध करण्यासाठीं ते वाघ-वाघ म्हणून ओरडलेहि. पण हा आपल्याच विश्वांत रमणारा विद्वान वाघ शब्दाचीच व्युत्पत्ती सांगूं लागला. समोरच्या वाघानें मात्र आपल्या भक्ष्याच्या या अवस्थेची दखल घेतली नाहीं. आपल्या कार्याशीं इतकी तल्लीनता प्राप्त होण्यासाठीं जी तळमळ लागते तिचें मोल शब्दांनीं करतां येणें कठिण आहे. या अवस्थेसारखी अवस्था कलावंतांचीहि असते. पण ती अल्पकालीन असते. गवई गातांना फक्त तल्लीन होतो, चित्रकार चित्र काढतांना तल्लीन होतो, नर्तकी नाचतांना तल्लीन होते, पण तेवढी वेळ संपली कीं पुन्हां कलेच्या आधीन होईपर्यंत ही सारी मंडळी तुमच्या आमच्या सारखींच साधीं माणसें असतात. मात्र पाणिनी वा आर्कीमिडीजसारख्या माणसांचें सारे

आयुष्य त्यांच्या कार्याशीं तल्लीन होऊन गेलें असतें. महर्षि अशा माणसांपैकीं आहेत. सर्व आयुष्यभर ते 'महिलांच्या उन्नतीच्या चळवळीशीं' तल्लीन झाले. जीवननिष्ठा म्हणतात ती हीच. जीवनदानाच्या घोषणा करून पुन्हां व्यवहाराच्या 'दे दान सुटे गिराण' रहाटगाडग्यांतून आपलें जीवन वाहवणारे वीर सध्या बरेच दिसूं लागले आहेत. पण जीवनभर अविचलित निष्ठेनें, प्रामाणिक तळमळीनें आणि प्रारंभा एवढ्याच उत्साहानें कर्वे यांच्यासारखीं काम करणारीं माणसें सांपडणें मुष्किल आहे.

अशीं ध्येयवेडीं माणसेंच समाजाचे आधार असतात. समाजाला दोन पावलें पुढें खेंचण्याची ताकत त्यांच्या त्या देहांत असते. कर्वे यांच्या ऐन उमेदींत या देशांत टिळकांच्या नेतृत्वाखालीं स्वराज्याची चळवळ चालली होती. सुशिक्षितांना आकर्षून घेणारी आणि मोठेंपण प्राप्त करून देणारी ही चळवळ चालू असतांना कर्वे मात्र तिकडे वळले नाहींत. त्यांनीं समाजापासून दूर राहून समाजाच्या उत्कर्षासाठीं आत्मयज्ञ सुरू केला. आपलें क्षेत्र ठरवून त्यांत स्वतःला गाडून घेणारीं अशीं माणसें ज्या वेळीं निर्माण होतात, तेव्हांच राष्ट्राचा नेत्रदीपक कायापालट होऊं शकतो. जनमनाच्या वावटळीवर स्वार होऊन जे मिरवतात ते वारा थांबल्यावर भिरभिरत खालीं येणाऱ्या पाना-प्रमाणेंच खालीं आदळतात. पण आपल्या त्यागमय जीवनानें आणि निष्ठामय कर्तृत्वानें राबून आपल्या कार्याला यश मिळवून देणाऱ्या व्यक्ति त्या कार्या-बरोबरच स्वतःच्या जीवनालाहि यशस्वी करीत असतात. महाराष्ट्रांत महर्षि जन्मले हें आमचें भाग्य. इथल्या महिलांना त्यामुळें नवें जीवन मिळालें. इथें शिळा होऊन पडलेल्या अहिल्यांना मुक्ति देण्यासाठींच हा राम इथें जन्मला. मनूच्या स्मृतिकारागृहांत अडकून पडलेल्या स्त्रियांना मुक्त करणारा हा 'महिलांचा माधव, विधवांचा वासुदेव!' या देशांत ताजमहाल बांधणारे शहाजहान झाले, कुतुबमिनार उभारणारे ऐबक झाले, विहिरी-धर्मशाळा बांधून गरीबांची सोय करणारे 'अशोक' झाले, पुरुषार्थ न गाजवतांहि पुरुषार्थ दाखवण्या-साठीं झनानखाने बाळगणारे 'शौकीन' तर अनेक झाले. पण महिलांना मुक्ति मिळावी म्हणून आश्रम बांधणारा महर्षि फक्त या महाराष्ट्रांतच झाला. महाराष्ट्राची मान ताठ राहावी म्हणून आपली मान देणाऱ्या मानकऱ्यांमध्यें बसण्याचा मान महर्षींना निश्चितपणें आहे. महर्षि हें महाराष्ट्राचें वैभव आहे.



* * *

# या युगाचा ध्रुवतारा विनोबा

मातीहुन तुम्ही माती असुनी हिमालयाहुन थोर तुम्ही ।
तुम्ही गवताचें पातें असुनी गगनदिव्याहुन दिव्य तुम्ही ।

अथांग सागर पसरला आहे. जिकडे पाहावें तिकडे पाणीच पाणी. निळेंशार आकाश निळेंभोर पाणी. काळजाचें पाणी व्हावें अशी ही अवस्था असते. पाण्याचा खळखळाट कानांत भरलेला असतो, पाण्याचाच उग्र दर्प नाकांत भरलेला असतो आणि पाण्यासारखाच गार वारा अंगाशीं झोंबत असतो. अशा वेळीं ध्रुवाच्या ताऱ्यावर नजर ठेवून खलाशी आपला मार्ग निश्चित करीत असतो. माणसांत सुद्धां असे ध्रुवाचे तारे असतात. दर पिढींत असे तारे असले तर सारें राष्ट्र त्यांच्यावर नजर ठेवून मार्गक्रमण करीत राहतें. सध्यांच्या पिढींतला ध्रुवाचा तारा विनोबाजी आहेत असें मी मानतों. माझ्या मनाला कसली टोंचणी लागली, आसवांच्या मिठींत न मावणाऱ्या अपरंपार दुःखानें मी तडफडूं लागलों किंवा अत्यंत आनंदानें सारें शरीर गुलाबाच्या फुलाप्रमाणें फूलून गेलें कीं, मी गीताई उघडतों आणि वाचत सुटतों. गीताई मला, मी माणूस आहें, याची जाणीव करून देते. विनोबांना मीं पाहिलेलें नाहीं, विनोबांचा शब्द झेलून माझ्या कानांचे शिंपले कृतार्थ झालेले नाहींत. पण मी गीताई वाचूं लागलों कीं, विनोबांच्या प्रेमळ स्पर्शानें माझें सर्वांग पवित्र झाल्याचा आनंद मला लाभतो.

पहाटेच्या प्रसन्न वातावरणांत अलगदपणें प्राजक्ताचीं फुलें जमिनीवर पडतात. सकाळीं कुणीतरी येतो आणि तीं फुलें गोळा करून घेऊन जातो. पण ज्या मातीवर तीं फुलें कांहीं काळ विसावलेलीं असतात ती माती देखील त्या फुलांनी सुगंधित करून ठेवलेली असते. महात्माजींसारख्या देवदूताच्या सहवासांत विनोबांचें बरेंच जीवन गेलें आणि विनोबाजींनीं महात्माजींना आपल्या काळजांत सामावून घेतलें. मातीला देखील गंधवती करणारीं तीं फुलें जशीं महान् तसेंच इथें घडलें. महात्माजींचें जीवन विनोबाजींनीं आपलें जीवन मानलें. त्यांचें कार्य आपलें कार्य मानलें. आज गांधीजींचें तत्त्वज्ञान



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत

अनुक्रम .. . ......... वि: .................
नों. दि: ...........

जगणारा आणि [illegible] विनोबाजी हा एकच मानव असेल. विनोबाजी माझ्या महाराष्ट्रांत जन्मले, माझ्या मराठींत त्यांनीं आयुष्यांतला पहिला शब्द उच्चारला. या दोन गोष्टींचा अभिमान प्रत्येक मराठी माणसाला असायला पाहिजे. आम्ही मराठी माणसें मुलखाचीं कूपमंडूक ! आमच्या भोंवतीं कुंपणें घालून आम्हीं वावरणार. कुणीं त्या कुंपणाला धक्का लावला तर आम्ही आकाश-पाताळ एक करून उठणार, पण विनोबांनीं हीं कुंपणें स्वतःभोंवतीं बांधलीं नाहींत. त्यांनीं स्वतःला क्षितीजासारखें सर्वस्पर्शी आणि क्षितीजासारखेंच अलिप्त बनवलें. ही किमया कुणालाच साधत नाहीं. कांहीं माणसें तर आकाशासारखींच विशाल होतात, पण आकाशाइतकींच अथांग आणि दूरदूर असतात. कुणीच त्यांना स्पर्श करूं शकत नाहीं. तींसुद्धां कुणालाच स्पर्श करीत नाहींत. अशा माणसांच्याबद्दल आदर वाटतो, पण आपुलकी वाटत नाहीं. कांहीं माणसें इतकीं मिसळतात कीं, पाण्यासारखें त्यांना स्वतःचें व्यक्तित्वच राहात नाहीं. ज्यांच्याशीं त्यांचा संयोग होतो, तेंच त्यांचें स्वरूप बनतें. पण विनोबाजी पाण्यासारखे सरमिसळे अथवा आकाशासारखे तुटक नाहींत. ते सर्वांजवळ आहेत आणि सर्वांपासून दूरहि आहेत. क्षितीज दुरून पाहिलें तर कुठेंतरी टेकलेलें वाटतें. तिथें जाऊन पाहावें तर दूर दूर पळतें आणि दुसरी-कडेच पृथ्वीच्या पाठीवर विसावलेलें असतें. विनोबाजी आम्हां मराठी माण-सांना ' आपलेच ' असे वाटतात, पण ते सर्वांनाच आपले वाटतात. आणि सर्वांपासून ते सारखेच दूर असतात. महान् माणसांचें असेंच असतें.

मात्र विनोबाजी निश्चितपणें कुणाचे तरी आहेत. भारतमातेचे ते सुपुत्र आहेत. या भूमीवर जे दीनदुबळे आहेत; श्रम करायची शक्ति आहे, पण ज्यांना काम मिळत नाहीं, असे जे असंख्य भूमिपुत्र आहेत, त्यांचे ते भक्त आहेत. आज त्यांच्या रूपानें या असंख्य लोकांचा त्राता इथें अवतरला आहे. धर्मचक्राला चालना देण्यासाठीं आपलें जीवनचक्र अविरत चालू ठेवणारा हा महामानव आहे. लहानपणापासून विनोबाजींनीं आपल्या आयुष्याचें ध्येय ठरवून टाकलें होतें. बारा वर्षांचे असतांना त्यांनीं ब्रह्मचारी राहाण्याची प्रतिज्ञा केली. आपल्या शब्दाप्रमाणें वागण्याची कडकनिष्ठा विनोबांजवळ लहानपणा-पासूनच. त्यामुळें वडिलांशीं त्यांचें पटत नसे. वडिलांना विनोबांचें वागणें विक्षिप्तपणाचें वाटे. त्यामुळें विनोबा घरीं फक्त जेवणापुरते व झोपण्यापुरते

येत. सबंध दिवस ते मित्रमंडळीच्या संगतींत व निरनिराळ्या विषयांवरचीं पुस्तकें वाचून काढण्यांत घालवीत असत. आपला मुलगा बुद्धिमान् आहे हें विनोबांच्या वडिलांना ठाऊक होतें. विनोबांना युरोपांत पाठवून संशोधक बनविण्याची त्यांची इच्छा होती म्हणून त्यांनीं विनोबांना फ्रेंच भाषा शिकणें भाग पाडलें; पण विनोबांचा ओढा संस्कृतकडे. त्यांनीं वडिलांच्यासाठीं फ्रेंच आत्मसात् केली व स्वतःसाठीं संस्कृत आत्मसात् केली. आज विनोबांना डझनभर भाषा चांगल्या प्रकारें येतात. विश्वभाषेसारखी तांत्रिक भाषाहि त्यांनीं नुकतीच आत्मसात् केली आहे. अत्यंत बुद्धिमत्ता हा विनोबांचा विशेष आहे.

विनोबांचें जीवन हें भारतीय संस्कृतीची ध्वजा आमरण फडकत ठेवणाऱ्या संतांचें जीवन आहे. महाराष्ट्रानें भारताला रामदास, तुकाराम, ज्ञानेश्वर, एकनाथ, असे महान् संत दिले. त्याच परंपरेंतील विनोबा हा आणखी एक पुरुष आहे. महात्माजींनीं राष्ट्राला राजकारण सांगितलें तसेंच समाजकारणहि सांगितलें. महात्माजी देखील एक संत होते परंतु राजकीय-गांधींइतके संत-गांधी यशस्वी झाले नाहीत. गांधींचे राजकीय प्रयोग यशस्वी झाले, परंतु सामाजिक प्रयोग यशस्वी होऊं शकले नाहींत. राजकीय-गांधींना अनेक अनुयायी मिळाले, पण संत-गांधींचा वारसा घेण्यास फारच थोडे लोक पुढें आले. विनोबाजी हे त्यांतले सर्वप्रथम, सर्वोत्तम म्हणायला हवेत. रामदासांचा कल्याण तसे महात्माजींचे विनोबा. महात्माजींनीं चरखा राष्ट्राला दिला तो केवळ स्वराज्याचा मार्ग म्हणून दिला नाहीं. 'चरखा फिराफिरा के लेंगे स्वराज्य लेंगे' अशी चरख्याची महती महात्माजींच्या राजकीय अनुयायांनी गायिली. परंतु चरखा हा सुराज्याचा मार्ग म्हणून महात्माजींनी मांडला. स्वराज्य मिळाल्यानंतर एका वर्षातच महात्माजी गेले आणि त्यांचे सामाजिक विचार कोसळून पडले, कारण या विचारांना निष्ठा म्हणून कोणी जवळ केलें नव्हतें. महात्माजींच्या समाधानासाठींच त्यांचे सामाजिक विचार त्यांच्या राजकीय अनुयायांनीं स्वीकारले होते. त्यामुळें हें असें घडलें. विनोबाजींनीं मात्र महात्माजींचें सर्व तत्त्वज्ञान हें स्वतःचें जीवन बनविलें होतें. त्यामुळें महात्माजींच्या पोरक्या झालेल्या सामाजिक विचारांना त्यांनीं उचलून धरलें. विनोबांसारखा समर्थ पुरुष हें कार्य करण्यास पुढें आला नसता तर कदाचित् महात्माजींचे हे विचार समाज विसरूनहि गेला असता.

११०१५



महात्माजींचा विनोबांच्यावर अत्यंत विश्वास होता. साबरमतीच्या आश्रमांत विनोबा घराचा त्याग करून दाखल झाले त्यावेळीं महात्माजींनीं विनोबांच्या घरीं चार ओळींचें एक पत्र पाठवलें. त्या पत्रांत त्यांनी लिहिलें आहे, "तुमचा विनोबा माझ्याजवळ आहे. इतक्या लहान वयांत तुमच्या मुलानें इतकी तेजस्विता व वैराग्य मिळविलें आहे कीं तसें वैराग्य अंगीं येण्यासाठीं मला कित्येक वर्षें धडपडावें लागेल." महात्माजींनीं या पत्रांतील शब्दाशब्दांमधून विनोबांचा गौरव केला आहे.

खरं म्हणजे यावेळपर्यंत विनोबा हे नुसते 'विनायक भावे' होते. महात्माजींनीं त्यांना प्रेमानें विनोबा लिहिलें आणि भारतानें 'विनोबा' हेंच नांव उचलून धरलें.

विनोबांनीं केवळ बौद्धिक तपस्याच केलेली नाहीं. विनोबांनीं स्वतःच्या शरीराला जितके क्लेश दिले आहेत तेवढे क्लेश दुसऱ्या कोणा पुरुषानें आपल्या शरीराला दिले असतील असें वाटत नाहीं. वाईच्या प्राज्ञपाठशाळेंत आचार्य नारायणशास्त्री मराठे यांचेजवळ विनोबा शांकरभाष्याचें अध्ययन करीत होते, तेव्हां फक्त एक वस्त्र वापरून राहायचे. पांघरायला कांहीं नाहीं. पाऊस असला तरी गंगेच्या घाटावर पडून राहायचे किंवा तळपत्या उन्हांत शरीराला भाजत बसून राहायचे प्रयोगहि त्यांनीं केले आहेत. खाण्याच्या बाबतींत-देखील हीच तऱ्हा. त्यांच्या एकुलत्या एका बहिणीचें लग्न झालें तरीदेखील या माणसानें गोडधोड खाल्लें नाहीं. पत्रावळीवर भातभाकरी घेऊन एका बाजूस जाऊन ते खात बसत. एकदां महात्माजींनीं सहज बोलतांना 'माणसाच्या आहारांत दुधाची काय आवश्यकता आहे?' असा प्रश्न केला. विनोबांनीं लगेच स्वतःवरच प्रयोग सुरू केला. एक थेंबभरहि दूध न घेतां त्यांनीं अनेक दिवस काढले, त्यांत त्यांची प्रकृति बरीच बिघडली. मग प्रकृति सुधारण्यासाठीं ते वाईला येऊन राहिले. तेथें रोज दीडशेर दूध, दोन भाकरी व थोडीं केळीं असा आहार त्यांनीं सुरू केला. त्यामुळें प्रकृति पुन्हां सुधारली. मग गांधीजींना विनोबांनीं कळविलें 'माणसाच्या आहारांत दूध आवश्यक आहे.'

विनोबा शरीरानें तसें दुर्बलच आहेत. पण तरीहि अत्यंत दुर्घट, कठिण गोष्टी ते करूं शकतात. दुर्दम्य इच्छाशक्तीचें अपार बळ आणि श्रद्धा विनोबां-जवळ आहे. विनोबा लहान होते त्या वेळेपासून त्यांची आई त्यांना गीतेचें

मराठी भाषांतर करावयास सांगायची. आई जिवंत होती तोंवर विनोबा हें करूं शकले नाहींत. विनोबांची आई वारली. आईच्या प्रेताजवळ बसून विनोबांनीं गीतापाठ म्हटला. या करड्या आणि शुष्क माणसाच्या जीवनांत मातृ-प्रेमाचा जो ओलावा होता तो नाहींसा झाला होता. आईची इच्छा आपण पुरी करूं शकलों नाहीं या जाणीवेच्या वेदनेनें या राकट माणसाच्या काळजांत घर केलें आणि मातृप्रेमाच्या तीव्र स्मृतींमधून अत्यंत सोपी प्रासादिक गीताई निर्माण झाली. मातेला दिलेला शब्द विनोबांनीं पुरा केला. गीता विनोबांना आईसारखीच असल्यानें त्यांनीं गीतेची गीताई बनविली. विनोबा म्हणतात, ‘आईच्या दुधावर मी पोसलों आहें, त्याप्रमाणेंच गीतेच्या दुधावर पोसलों आहें.’

‘गीताई माऊली माझी तिचा मी बाळ नेणता।
पडतां रडतां घेई उचलूनि कडेवरी ॥’

अशा भावनेंतून गीताईचा जन्म झाला म्हणूनच ती एवढी सुंदर, निर्मळ होऊं शकली.

धुळ्याच्या तुरुंगांत असतांना विनोबाजींनी गीतेच्या अठरा अध्यायांवर अठरा प्रवचनें दिलीं. हीं प्रवचनें सांगतांना कठोर, कोपिष्ट आणि उग्र भासणारे विनोबाजी वितळून जात. कधीं कधीं अक्षरशः स्फुंदूं लागत. नवव्या अध्यायावरील प्रवचनाचे वेळीं तर त्यांच्या डोळ्यांतून घळघळ अश्रुधारा वाहूं लागल्या. ज्ञानदेवांनीं समाधि घेतली त्या वेळेस हा अध्याय ते म्हणत होते. या अध्यायामध्यें हरिनामाची थोरवी सांगितली आहे. विनोबांच्या मुखांतून हीं प्रवचनें ऐकण्याचें भाग्य ज्यांना लाभलें असेल त्यांच्या चरणांची धूळ मी कपाळाला लावीन. गुरुजींनीं या प्रवचनांतला शब्दन् शब्द टिपून घेतला आणि त्यामुळेंच ‘गीता प्रवचनें’ हें मराठींतलें सर्वश्रेष्ठ पुस्तक निर्माण होऊं शकलें. हीं गीताप्रवचनें मीं अनेक वेळां वाचलीं आहेत. तीं कितीदां वाचलीं तरी समाधान होत नाहीं.

विनोबाजींचें नांव भारताला १९४० सालीं एकदम समजलें. तत्पूर्वीचें त्यांचें कार्य फार थोड्यांना ठाऊक होतें. विनोबाजींना १९४० सालीं महात्माजींनीं पहिला सत्याग्रही म्हणून जाहीर केलें. भारताला आश्चर्याचा धक्का बसला. हा कोण विनोबा? असा अनेकांना प्रश्न पडला, तेव्हां महादेव-

भाईनीं विनोबांवर एक सुंदर लेख लिहिला. त्यांत त्यांनीं लिहिलें "उत्तरोत्तर ज्याच्या जीवनांत विकास होत आहे अशी महात्माजींशिवाय दुसरी व्यक्ति मी पाहिली, ती विनोबाजींची." विनोबांबद्दल व्यक्त केलेलें हें मत आजहि खरें आहे. विनोबाजींची गाढी विद्वत्ता, प्रखर बुद्धिमत्ता, अपूर्व स्मरणशक्ति, दुर्दम्य ध्येयनिष्ठा, तेजस्वी वैराग्य, विनम्र सेवावृत्ति, ईश्वरपरायणता, साधुता, तपश्चर्या, अलोट इच्छाशक्ति, निर्भयता पाहिल्यानंतर ही परमेश्वराची अलौकिक कृति आहे असें म्हटल्याखेरीज राहवत नाहीं.

विनोबा बोलतात अत्यंत सुंदर. १९३२ सालीं झेंडा सत्याग्रहाच्या वेळीं धुळ्यास त्यांचें भर उन्हांत भाषण झालें. धगधगीत उन्हांत हजारों लोक हें भाषण ऐकत होते. क्षणभर त्यांना वाटलें प्रत्यक्ष सूर्यनारायण तर मनुष्यदेह धारण करून समोर उभा राहिला नाहीं ना! विनोबाजी त्या भाषणांत म्हणाले, "स्वराज्यासाठीं प्राण द्यावे लागतात. आपणास प्राण घ्यायचे नाहींत, तर द्यायचे आहेत. डोकीं लाठीमारापुढें करायचीं आहेत. स्वातंत्र्यदेवतेसमोर नारळ फुटायचे आहेत. अतःपर गुलामगिरींत तर नाहीं ना रहावयाचें! स्वतंत्र व्हायचें आपण ठरविलें आहे. जो हा झेंडा आपण उभारला आहे, तो आतां वांकतां कामा नये. राष्ट्र त्यागाची अपेक्षा करीत आहे. तुम्ही ती पूर्ण करा." धुळ्यासच राजवाडे संशोधन मंदिराच्या उद्घाटनाच्या वेळेस ते म्हणाले, "पाश्चिमात्य लोक हिंदुस्थानच्या इतिहासाविषयीं आदरानें लिहीत नाहींत असें आपण म्हणतों. परंतु ज्या इतिहासवृक्षाला आजच्या लोकांसारखीं शेंदाड फळें लागतात तो इतिहासवृक्ष सतेज आहे असें त्यांनीं कां म्हणावें? तुमचा इतिहास तुमच्या आजच्या कृतीनें उज्ज्वल होईल. तुम्ही जर उज्ज्वल कृति कराल तर तुमची परंपरा व तुमचा इतिहास थोर आहे असें जग म्हणेल. नुसतीं कागदपत्रें अग्निसंरक्षक भवनांत ठेवून इतिहास उज्ज्वल होत नाहीं. तुम्ही करंट्याप्रमाणें वागाल तर तुमचा इतिहास भस्म झाल्यासारखाच आहे". विनोबा भाषण करतांना आरंभ अगदीं हळू करतात. परंतु पुढें आवाज खूप उंच चढतो. विषयाशीं तन्मय होऊन ते बोलतात.

विनोबांचें तापसी जीवन आणि रसाळ वाणी यांमुळें ऐकणारा भारून जातो, तल्लीन होतो, स्वतःला विसरतो. महात्माजी गेले त्यावेळीं सेवाग्रामांत

विनोबा बोलायला उभे राहिले, तेव्हां त्यांच्या डोळ्यांतून अश्रूंच्या धारा वाहूं लागल्या. कोणी तरी म्हणालें, ' अरे विनोबा रडताहेत '. विनोबांनीं तें ऐकलें. ते म्हणाले, " होय मी रडतों आहें. ईश्वरानें मलाहि हृदय दिलें आहे. " मात्र विनोबा नुसते रडत बसले नाहींत. गांधीजींचें कार्य पुढें चालविण्यासाठीं त्यांनीं कंबर कसली. सेवाग्राम येथें त्यांच्या प्रेरणेनें ' सर्वोदय समाज ' स्थापन झाला.

या सर्वोदय समाजाचें संमेलन हैद्राबाद संस्थानांत शिवराम पल्ली येथें भरणार होतें. तेथपर्यंत पायीं जाण्याचा निर्णय विनोबांनीं घेतला. ३०१ मैलांचें हें अंतर तोडून जाण्यांत विनोबांचा आणखी एक हेतू होता. तेलंगणांत कम्युनिस्टांनीं शेतकरी क्रांतीचा धाडसी प्रयोग सुरू केला होता. जमीनदारांचे खून करून त्यांच्या जामिनी कम्युनिस्टांनीं शेतकऱ्यांत वांटून दिल्या होत्या. कम्युनिस्टांच्या बंदुका रात्रीं काम करीत आणि पोलीसांच्या दिवसा काम करीत. त्यामुळें तेलंगणांतली जनता अगदीं हैराण झाली होती. विनोबांना हें सारें नजरेंखालून घालायचें होतें. कांहीं मार्ग सांपडतो का बघायचें होतें. तेलंगणाचें नांव घेतांच मोठे मोठे नेते थरकांपत येवढें कम्युनिस्टांचें प्रस्थ तेथें वाढलें होतें. विनोबांनीं रामनवमीच्या पवित्र दिवशीं १५ एप्रिल १९५१ रोजीं तेलंगणांत पाऊल टाकलें.

तीन दिवसांनीं ते पोचमपल्ली या गांवीं येऊन पोंहचले. या गांवीं असलेल्या ३००० लोकांपैकीं २००० भूमिहीन होते. गांव एकंदर २५०० एकर शेतीउपयोगी जमिनीचें होतें. हरिजन शेतमजुरी करीत. अत्यंत अल्प मजुरी मिळे. त्यांना त्यावर वर्ष काय तीन महिनेहि जगणें शक्य होत नसे. हे लोक विनोबांकडे आले. त्यांची कहाणी ऐकून विनोबांच्या काळजाला असंख्य वेदना झाल्या. हे भूमिपुत्र उपाशी जीवन जगत असल्याचें पाहून विनोबा कासावीस झाले. देशांत असे कोट्यवधि जीव उपाशीं जगत असतील. दोन वेळेस पुरेसें अन्न नाहीं, अंगभर वस्त्र नाहीं. कसें यांना अन्न द्यायचें. देशाची ही सजीव शक्ति उपासमारीनें तडफडते आहे, तळमळते आहे. तिची तडफड, तळमळ कशी थांबवायची. विनोबांना कांहीं सुचेना. त्यांनीं त्यांनाच सवाल केला, तुम्हांला जमीन मिळाली तर तुमचा प्रश्न सुटेल ? हरिजनांनीं होकार दिला. किती जमीन हवी तुम्हांला ? विनोबांनीं विचारलें.

त्या मंडळींनीं विचार करून चाळीस एकर जिराईत व चाळीस एकर बागाईत जमिनीची मागणी केली.

विनोबा तरी कोठून देणार होते ही जमीन. त्यांच्याजवळ थोडीच जमीन होती! सरकारकडूनहि जमीन मिळेलच अशी खात्री नव्हती, पण विनोबांचा मनुष्याच्या चांगुलपणावर विश्वास होता. त्या दिवशीं सायंप्रार्थनेंत विनोबांनीं या दुःखी जिवांची साद घातली. यांना अन्न द्या, जीवन स्वाभिमानानें जगण्याचा मार्ग यांना दाखवा अशी हांक दिली आणि रामचंद्र रेड्डींच्या रूपानें परमेश्वरानें या सादेला प्रतिसाद दिली. रामचंद्र रेड्डी उभे राहिले आणि म्हणाले, " माझ्या स्वर्गस्थ पित्याच्या इच्छेप्रमाणें मी आणि माझे पांच भाऊ मिळून शंभर एकर जमीन आम्ही या लोकांना भेट म्हणून देण्यास तयार आहों. " हे उद्गार ऐकतांच अपार आनंदानें विनोबा नाचूं लागले. दीन-दलितांचें दुःख पाहून विरघळणारीं माणसें या भूमींत अजून आहेत हें पाहून त्यांच्या डोळ्यांतून आनंदाच्या अश्रुधारा वाहूं लागल्या. सुईच्या अग्रावर राहील एवढी मातीहि न देणाऱ्या दुर्योधनाचा वारसा चालविणारे जसे असतात त्याप्रमाणें देवाच्या कामासाठीं स्वप्राण त्यजून अस्थी देणारे दधिचीहि असतात हें आम्हीं पुराणांत वाचलें होतें. आज तें पुन्हां दिसलें. इकडचा बांध तिकडे सरकतांच कुऱ्हाडीनें मुंडकें तोडणाऱ्या या देशांत स्वतः होऊन दुसऱ्याला जमीन देणारीं माणसेंहि आहेत हें जगाला कळलें. भूदान-यज्ञाची कल्पना या दातृत्वांतूनच जन्म पावली. विनोबांनीं माणसाच्या मनांतल्या सद्भावनेला साद घालण्याचें ठरविलें आणि दोन महिन्यांच्या आंत जवळ जवळ १२००० एकर जमीन विनोबांना मिळाली. भू-क्रांतीचें नवें पर्व भारतांत सुरू झालें. ' सब भूमि है गोपालकी ' हा संदेश खेडोपाडीं जाऊन पोंहचला. विनोबांनीं सर्व देशभर पदयात्रा केली. शरीरानें अधू असलेला हा वृद्ध तापसी आपल्य पायांनीं चालत आमच्या दारीं आला. स्वतःसाठीं त्यानें कांहीं मागितलें नाहीं मात्र आमच्या मनांतल्या सद्भावनेची आम्हाला ओळख करून दिली.

विनोबा आज मध्यप्रदेशांतील दरोडेखोरीचें निर्मूलन करण्यासाठीं प्रयत्न करीत आहेत. दरोडेखोरहि माणसें आहेत; त्यांच्या मनांतहि सद्भावना आहे; तिला हांक घालण्याचें काम करण्यासाठीं विनोबा पुढें झाले आहेत. विनोबांना

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वक्रम.
२०६
अनुक्रम .............. वि: ..................
क्रमांक ........ नों: दि: ...............



यांत अपयश येईल असें कुणालाच वाटणार नाहीं. विनोबांना तर कधींच वाटणार नाहीं. कारण, विनोबांचा माणसाच्या चांगुलपणावर व स्वप्रयत्नांवर विश्वास आहे. ते म्हणतात, " यशापयश अनेक वेळां मिळेल. अपयश आलें म्हणून निराश होण्याचें कारण नाहीं. निराश होणें म्हणजे नास्तिक होणें. परमेश्वर पाठीराखा आहे. विश्वास ठेवा. मुलाला हिंमत यावी म्हणून आई त्याला इकडे तिकडे जाऊं देते; परंतु ती त्याला पडूं देत नाहीं तर हळूच येऊन उचलते. ईश्वरहि तुमच्याकडे पाहात आहे. तुमच्या जीवनाच्या पतंगाची दोरी त्याच्या हातांत आहे. पतंगाची दोरी कधीं तो तंग धरतो; कधीं सैल सोडतो. परंतु सूत्र त्याच्या हातांत आहे, ही खात्री बाळगा. परमेश्वर जीवनाची कला आपणास शिकवून राहिला आहे. "

विनोबांनीं या भावनेनें प्रत्येक कार्य हातांत घेतलें म्हणून ते यशस्वी झाले. विनोबा हा आमच्या डोळ्यासमोर वावरणारा, आमच्या काळांत जगत असलेला युगपुरुष आहे. विनोबांच्या अनेक गोष्टी आम्हांला रुचणार नाहींत, त्यांचे शब्द पटणार नाहींत, पण काळाला जिंकून जगणाऱ्या माणसांना जी दृष्टि लाभलेली असते, ती सर्वांनाच लाभत नाहीं. आम्हीं आजुबाजूच्या चिमुकल्या आवारालाच विश्व मानून जगत असतों. विनोबांसारख्या माणसांचें विश्व विशाल असतें. त्यांची दृष्टीहि विशाल असते. त्यामुळें त्यांना आज जें दिसतें, समजतें तें कांहीं वर्षांनंतर आम्हांला दिसेल, समजेल. मग त्यावेळीं आम्हीं म्हणूं, " अरेरे आम्हीं चुकलों आम्ही विनोबांचे मार्गानें जायला हवें होतें. "

इतिहासानें ही गोष्ट अनेकवार आम्हांला शिकवली आहे, पण तरीहि आम्हीं ती शिकलेलों नाहीं. विनोबांना हंसणारे, हिणविणारे आमच्यांत अजूनहि आहेत. विनोबांना अर्थातच—त्यांच्याबद्दलहि प्रेम आहे. कारण, विनोबा हे राग—द्वेषाच्या पलीकडे जाऊन पोंहचले आहेत. सतत कार्य करीत राहणें येवढीच एक भावना त्यांचेंपाशीं उरली आहे. ते म्हणतात, " अंतकाळीं- सुद्धां यज्ञाची ज्वाला पेटलेली पाहिजे, न्यायमूर्ति रानडे म्हणतात तसे ' सारखें कर्तव्य करीत असतां मरण आलें तर तें धन्य होय.' कांहीं तरी वाचीत आहें, लिहीत आहें, कर्म करीत आहें, असें काम करतां करतां मला मरण आलें म्हणजे पुरे. " माझ्याहि मनांत विनोबांनीं सांगितलेल्या मृत्यु-

विषयक एका कल्पनेनें घर करून ठेवलें आहे. तसें मरण यावें अशी माझी इच्छा आहे. विनोबा म्हणतात, "शेवटच्या श्वासोच्छ्वासापर्यंत हातून सेवा होऊन राहिली आहे. भावनांची पौर्णिमा फुलली आहे, हृदयाकाशांत यत्किंचितहि आसक्ति नाहीं, बुद्धि सतेज आहे, अशा प्रकारें ज्याला मरण येईल तो परमात्म्यांत मिळाला. असा परम मंगल शेवट होण्यास रात्रंदिवस दक्ष राहून लढत राहिलें पाहिजे. क्षणभरसुद्धां अशुद्ध संस्कार मनावर उमटूं देतां कामा नये. आणि असें बळ मिळावें म्हणून त्या परमेश्वराची प्रार्थना करीत राहिलें पाहिजे. नामस्मरण, तवस्मरण पुन्हा पुन्हा केलं पाहिजे." महात्माजींना असा मृत्यु मिळाला. त्यांचा आत्मा परमात्म्यांत मिळाला आणि त्यांचें कार्य करण्यासाठीं विनोबाजी पुढें आले. गांधीजींच्या कार्यांत खंड पडला नाहीं. परंतु विनोबा किती दिवस ही ज्योत तेवत ठेवणार आहेत! त्यांच्या देहालाहि मृत्यूची मर्यादा आहे. त्यांचें कार्य पुढें चालविण्यास कोण येणार? मराठी माणसांपुढें हें फार मोठें आव्हान आहे. राष्ट्राला महाराष्ट्रानें देवासारखीं माणसें पुरविलीं आहेत. माझा देश ही परंपरा पुढें चालविणारा एखादा समर्थ पुरुष, राष्ट्राला देणारच नाहीं असें मात्र मला वाटत नाहीं. महाराष्ट्रानें राष्ट्राला ज्ञानोबा दिले, तुकोबा दिले, छत्रपति दिले, लोकमान्य दिले, महात्मा फुले दिले, नवबुद्ध आंबेडकर दिले, महर्षि कर्वे दिले, विनोबाजी दिले तसाच कोणी युगपुरुष महाराष्ट्र अजूनहि राष्ट्राला देऊं शकेल अशी मला आशा वाटते.

* * *

११०७५
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
क्रमांक ................ दि: ................
............................ नों. दि: ..............

REFBK 0011016

REFBK-0011016